# करिंथकरांस दुसरे पत्र

2 Corinthians [with Study Notes)

# पौलाचे करिंथकरास दुसरे पत्र-अध्ययन

## 1

[1]पौलातर्फे जो परमेश्वराच्या इच्छेने* येशू ख्रिस्तांचा प्रेषित* आहे, तसेच आपला भाऊ तीमथ्य* याच्याकडून, परमेश्वराच्या चर्चच्या नांवे जे करिंथात आहे आणि संपूर्ण अखयातील* पवित्र लोकांच्या नांवे. [2]*आपला पिता परमेश्वर आणि प्रभू येशू ख्रिस्तांकडून तुम्हांला अनुग्रह व शांति असो.
[3]**आपले प्रभू येशू ख्रिस्त यांचा परमेश्वर व पिता जो करूणेचा* पिता आणि सर्व प्रकारच्या शांतीचा* परमेश्वर आहे त्याला धन्यवाद असो. [4]परमेश्वर आपल्या सर्व संकटात* आपल्याला सांत्वना देतो, केवळ यासाठीच, की जे कोणी ज्या संकटांचा सामना

---

*\ *“परमेश्वराच्या इच्छेने”*- पौल येथे आणि संपूर्ण पत्रात आपल्या प्रेषितपणाचे सत्य लोकांना पटवून देत आहे, तो ‘परमेश्वराच्या इच्छेने’ प्रेषित झालेला आहे, या गोष्टीवर तो भर देतो आहे. असे तो केवळ याकरताच करतो, कारण करिंथातील काही लोक या प्रेषितपणाच्या पाचारणाविषयी त्याच्यावर सतत आक्रमण व वैचारिक हल्ले करीत होते.

*\ **1:1** *“प्रेषित”*- रोम 1:1; 1 करिं 1:1; मत्त 10:2.

*\ *“तीमथ्य”*- वचन 19, प्रेषि 16:1-3; 1 तीम 1:2.

*\ *“अखयातील”*- ते क्षेत्र (ग्रीस) जेथे करिंथ वसलेले होते.

*\ **1:2** रोम 1:7.

*\ **1:3-11** या पत्रात दोन महत्वाच्या - वैशिष्टयपूर्ण विषयांची माहिती आपण वाचू शकतो. “शांतीत” - व “दुखें”- ग्रीक भाषेत ज्या शब्दाचे भाषांतर केलेले आहे (नाम आणि क्रिया) तो शब्द सुमारे 17 वेळां आढळतो. “संकट, दुःख, क्लेश” ज्या ग्रीक शब्दांपासून तयार झाले आहे, त्याच्याही उपयोग जवळजवळ तितक्याच वेळां केलेला आहे. पौल आपल्या समस्यांविषयी येथे कोणत्याही प्रकारची तक्रार करीत नाहीये - परंतु सत्य अगदी याच्या विपरित आहे ( 6:10; 7:4; 12:10; रोम 5:3). त्याने या सत्याचा अनुभव घेतला की त्याच्या समस्या, क्लेश, संकटें व दुःखें त्याचे हित व कल्याणाचे मार्ग मोकळे करीत होते; चांगुलपणाची कार्ये त्यातून उत्पन्न होत होती. त्याने जे काही या वचनांत सांगितलेले आहे त्याकडे आपण नीट लक्ष देऊ यात. त्याच्या कष्टांद्वारे आणि संकटांद्वारे त्याने अनुभविले की त्याला परमेश्वराविषयी ‘गाढ व खोल ज्ञानप्राप्ति’ झाली, इतकेच केवळ नव्हे तर त्याच्या अस्वस्थतेच्या समयी त्याला जाणीव झाली की केवळ परमेश्वरच अशासमयी थोर व महान शांतीदाता, सांत्वनदाता आणि प्रोत्साहन देणारा प्रभू परमेश्वर आहे. (वचन 3,4). म्हणूनच तो लोकांना शांति देऊ शकला, त्यांचे सांत्वन करू शकला. त्याने येशू ख्रिस्तांच्या गोड शांतीचा इतका प्रगाढ अनुभव घेतला की त्याला त्याची संकटे व समस्यां ख्रिस्तांसाठी सहन करणे प्रचंड बहुमूल्य वाटल्या (वचन 5). त्याच्या दुःखांनी त्याचा फायदाच केला. म्हणूनच तो इतरांना शांति देण्यात यशस्वी झाला. परमेश्वरावर अधिकाधिक अवलंबून राहावयास तो शिकला विश्वासींचे जीवन प्रात्यक्षिक रीतिने अनंतकाळासाठी विपुल महिमा उत्पन्न करणारे आहे, हे सुद्धा पौल शिकला (वचन 4:17). त्याला या गोष्टीचा अभ्यास करता आला की त्याची संकटे जितकी भीषण होत गेली, प्रचंड वाढत गेली तितकी जास्त त्याची सहनशीलता परमेश्वरी सामर्थ्यामुळे वाढत गेली, “परमेश्वराचे वृद्धींगत होत जाणारे सामर्थ्य” वरचढ झाले आणि त्याच्यापुढे त्याच्या समस्या ठेंगण्या होत गेल्यात. (12:9-10). ईयोब 3:20नोट्स.

*\ **1:3** या वचनाद्वारे सिद्ध होते की पौल त्याच्या संकटांमुळे व छळांमुळे एक महान सत्य शिकला, ते म्हणजे परमेश्वराच्या स्वभावाची खोली किती अमाप आहे; म्हणून तो अंगिकारतो की “परमेश्वर करूणेचा पिता आणि सर्व प्रकारच्या शांतीचा परमेश्वर आहे”.

*\ *“करूणेचा”*- निर्ग 34:6; स्तो 86:15; 103:13; 111:4; 145:8; विलाप 3:22; मीखा 7:19; मत्त 9:36.

*\ *“शांतीचा”*- (ग्रीक भाषेत दोन्ही अर्थ आहे) - आपल्या वचनाद्वारे आणि पवित्र उपस्थितीद्वारे परमेश्वर निरंतर अविरत आपल्याला प्रोत्साहन व शांति प्रदान करीत असतो - स्तो 23:4; 119:50; यश 40:1; 61:2; 66:13; रोम 15:4-5; 2 थेस्स 2:16-17; इब्री 6:18.परमेश्वराच्या आत्म्याचे एक नांव आहे : 'शांति देणारा', त्याच ग्रीक शब्दापासून निघालेला शब्द - योहान 14:16चे नोट्स.

*\ **1:4** *“आपल्या सर्व संकटात”*- परमेश्वर सर्व शांतीचा उगम आहे (वचन 3) त्याच्याजवळ प्रत्येक प्रकारच्या संकटांचे समाधान व शांतीचा साठे आहे. विश्वासींनी जर परमेश्वरी शांति स्वीकारण्याचे किंवा परमेश्वराने देऊ केलेले सांत्वन मिळवून घेण्याचे प्रयत्न केले नाहीत आणि अपयशी ठरले तर मग परमेश्वर काहीही करू शकणार नाही (पाहा मत्त 2:18). या गोष्टीकडे बारीक लक्ष द्या की पौलाला ज्या वेळी सांत्वना हवी होती त्या वेळी देवबापाने ती त्याला पुरविली, केवळ एकटया पौलाकरताच नव्हे तर यासाठी, की

करीत आहेत त्यांचे आपणही सांत्वन करावे (करू शकावे). 5 कारण जसे आपण ख्रिस्तांच्या दुःखात* (येशू ख्रिस्तांमुळे येणारी
संकटें) अधिक दुःखी व कष्टी स्थितींतून गुदरत जातो, तसेच आपण ख्रिस्तांच्या शांतीत देखील अधिकाधिक सहभागी होत असतो.
6 *जर आम्ही क्लेशाचा (छळ) सामना करीत आहोत, तर ते तुमचे सांत्वन व उद्धार यासाठीचे आहे. त्याच्याच प्रभाव म्हणून जसा
आम्ही छळ सहन करितो, तसाच तुम्हांला देखील छळ धीराने सहन करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. 7 तुमच्याविषयी आम्हांला पूर्ण
भरंवसा आहे, कारण आम्हांला ठाऊक आहे, की ज्या प्रकारे तुम्ही आमच्यावर होत असलेल्या छळाचे* (दुःख, पीडा, संकटें)
सहभागी (हिस्सेदार) आहा, त्याच प्रकारे आमच्या सांत्वनेमध्येही हिस्सेदार आहा.
8 हे बंधूभगिनींनो आशियात* आम्ही जी संकटे सोसली होती, त्या छळाविषयी तुम्ही अजाण (ठाऊक नसावे) असावे अशी
आमची इच्छा नाही. आमच्यावर इतके भीषण दडपण* आले होते, जे आमच्या शक्तिपलीकडचे होते आणि त्यामुळे ते सहन करून
घेणे अत्यंत कठीण गोष्ट होती. आम्हांला तर असे वाटले होते की आम्ही जिवंत राहणारच नाही. 9 आम्हांला असे वाटू लागले होते,
जणूकाही आमच्यावर मरणाची* आज्ञाच झाली होती, आणि ते अशासाठी झाले की आम्ही स्वतःवर भरंवसा न ठेवता, केवळ
परमेश्वरावर विश्वास ठेवावा, जो मृतांना सजीव (जिवंत) करितो. 10 *त्यानेच आम्हांला मरणाच्या मोठ्या संकटातून सोडविले आणि
सोडवीतच असतो. येणाऱ्या संकटकाळात तोच आम्हांला सोडवीत राहील. 11 *तुम्ही सुद्धा एकत्र होऊन आमच्यासाठी विनंती करा

---

पौलाने तसेच "परमेश्वरी सांत्वन" अशा सर्व लोकांना द्यावे, जे तशाच भीषण संकट-समयांतून जातात (वचन 6).

***1:5** *"ख्रिस्तांच्या दुःखात"*- रोम 8:17; फिलि 1:29; 3:10; कल 1:24.येशूंनी दुसऱ्यांसाठी दुःख सोसलेत. अजूनही येशू आपल्या लोकांठायी दुःख सहन करतात. (प्रेषि 9:4-5). जो स्वेच्छेने इतरांसाठी दुःख सोसतोच ओळखू व अनुभवू शकतो की येशूंद्वारे मिळणारे सांत्वन कसे असते (योहान 16:33).

***1:6** पौल हा संपूर्णतः सर्वांच्यासाठी झिजणाऱ्या व्यक्तीत्वाचा होता. 'त्याच्यावर आलेली संकटे' व त्याचे 'सांत्वन देणे' ही दोन्ही दुसऱ्या विश्वासींसाठीचीच होती. (1 करिं 9:19-23); 10:24,33; जे पौलासारखे इतरांसाठी संकटे झेलतात आणि "आतंरिक व विश्वास क्रियेकरता" सहन करतात, केवळ त्यांनीच अशा थोर सांत्वनासाठी परमेश्वराकडून अपेक्षा करावी. होय, केवळ पौलासारख्या निस्वार्थी ख्रिस्ती सेवकांचाच तो एकमेव अधिकार आहे. संकट व क्लेश यांच्यातून "धीर" निर्माण होतो; धीरात त्याचे परिवर्तन होते. रोम 5:3-5; याकोब 1:2-4; 5:11.

***1:7** *"छळाचे"*- करिंथाचे विश्वासीं देखील येशू ख्रिस्तांच्या छळात सहभागी होते. त्यांचाही तसाच छळ केला जात होता; त्यांचा छळ पौलाइतका व्यापक नव्हता, पण तरीही ते ख्रिस्त आणि त्यांच्या विश्वासींच्या छळात सहभागी होण्यासाठी तयार व इच्छुक होते; तसेच ख्रिस्तांच्या आनंदात व सुखात देखील सहभागी होण्यास उत्सुक होते.

***1:8** *"आशियात"*- प्रेषि 16:6; 18:19.आशिया प्रांताचे इफिस हे एक प्रमुख शहर होते.

**"दडपण"*- तुलना वचन 10;4:8-9; 11:23-29. जे धोके, जी संकटे, ज्या अडचणी, जो छळ, जे दडपण पौलासमोर उभे ठाकले होते, त्याचा सामना तो स्वतःच्या क्षमतेने करू शकत नव्हता, कारण ती सर्व संकटे मानवी क्षमतेच्या पलीकडची होती, तो त्यातून पळ देखील काढू शकत नव्हता कारण मानवीदृष्टया ते अवघडच होते.

***1:9** *"मरणाची"*- पौलाला असा भास होऊ लागला होता की जणू काही त्याचे मरण जवळ आलेले आहे (मरणाचा समय निकट आला आहे की काय किंवा मी आता मरणारच). परंतु त्याचे मरण देखील त्याच्यासाठी त्याच्या फायद्याचेच होते. (रोम 8:28). परमेश्वरावर विसंबून राहण्याचे, पौलाचे प्रमाण आधीपेक्षा जास्तच भक्कम होत गेले. त्याला या गोष्टीची शाश्वती होती, "जर गौरवशाली परमेश्वर मृतांना सजीव (जिवंत) करतो (करू शकतो) तर, त्याला काळजी करण्याची गरज नाहीये," त्याच्यावर येणाऱ्या भीषण धोकादायक संकटातही परमेश्वर त्याला व्यवस्थित सांभाळून घेईल, आणि हे सुद्धा त्याला कळत होते की केवळ परमेश्वरच तसे करावयास समर्थ आहे.

***1:10** खरोखरच, यात शंकाच नाहीये की ही एक चमत्कारिक मुक्ति आणि अविश्वसनीय सुटकाच असावी. या सुटकेने पौलाला कमालीचा भरंवसा दिला, त्याला एक आगळे आश्वासन मिळाले, निश्चितच या प्रसंगामुळे परमेश्वरा ठायी त्याचा आत्मविश्वास दांडगा झाला. भविष्यकाळी परमेश्वर त्याला असेच सांभाळेल, ही हमी त्याला मिळाली.

***1:11** निकृष्ट, खालच्या स्तराचे - ख्रिस्ती जीवन जगणाऱ्या विश्वासींना, पौलाच्या क्रोधाचा सामना करावा लागला. त्यांचे, खालच्या पातळीचे ख्रिस्ती जीवन पाहून पौल विश्वासींवर भडकला - 1 करिं 3:1-4; 5:1-2; 6:1;पण तरीही तो त्यांच्या प्रार्थनांचा आदर करीत होता, प्रार्थनांचे मूल्य त्याला ठाऊक होते. त्याच्या प्रार्थना त्याला मदत करू शकतो याची त्याला खात्री होतीच. (फिलि 1:19; फिलेमोना 22 शी तुलना) यावरून आपण हेच शिकावे की सामान्यतः कमजोर व अपयशी विश्वासी देखील परमेश्वराच्या सामर्थ्यावाचून नसतात; या गोष्टीकडे लक्ष द्या की पौलाची मनोमन हीच इच्छा होती की लोकांनी देवबापाची स्तुति-महिमा-प्रशंसा विपुल करावी; परमेश्वराचे आभार लोकांनी मोठ्या प्रमाणात मानावयाचे आहेच. (4:15; 9:11-13).

आणि त्याद्वारे आमची मदत करा, की जो अनुग्रह (कृपादान) आम्हांला तुमच्या विनंतीद्वारे प्राप्त झाला त्या कारणामुळेच आमच्याकडून (वतीने) अनेक लोकांना परमेश्वराची स्तुति करता यावी.

12 *आम्ही आपल्या विवेकाच्या या विशिष्ट साक्षीमुळे खूपच आनंदित* होत आहोत की सर्व जगभर आणि विशेषकरून तुमच्यामध्ये आमचे वर्तन परमेश्वराला साजेसे (शोभेल) असेच पवित्र आणि सच्चेपणाचे होते, आणि ते जगिक ज्ञानाने नव्हे परंतु परमेश्वराच्या साहाय्याने घडविलेले होते. 13 आम्ही तुम्हांला दुसरे आणखी काही लिहीत नाही, केवळ तेच लिहीतो जे तुम्ही वांचता किंवा जे तुम्हांला कळते (मान्य), आणि आमची अशी आशाही आहे की ते तुम्ही शेवटपर्यंत समजून (कबूल करीत) घेत रहाल. 14 म्हणजे असे की तुमच्यापैकी काहींना कळल्यानंतर त्यांनी ते मान्य करून घेतले, की जसे आम्ही तुमच्या आनंदाचा विषय आहोत, तसेच तुम्ही सुद्धा प्रभू येशूंच्या दिवशी* आमच्यासाठी आनंदाचा विषय (कारण/मूळ) ठराल.

15 **तुम्हांला आणखी एक कृपादान मिळावे म्हणून मी पहिल्याने तुमची भेट घेण्याकरिता तुमच्याकडे यावे, अशी माझी इच्छा

---

*1:12-14 करिंथातील काही लोक पौलाच्या विश्वासयोग्यतेविषयी आणि सत्याविषयी प्रश्न विचारुं लागले होते; शंकेमुळे अनेक प्रश्न त्याच्या डोक्यात रेंगाळत होते (13:3). म्हणून तो असे 'विशिष्ट' शब्द लिहितो आहे. करिंथातील लोकांनी (त्याच्यावर) विश्वास ठेवणे हे खूप महत्वाचे होते, पौलासाठी नव्हे तर त्यांच्या स्वतःसाठीच. पौलावर विश्वास ठेवण्यातच त्यांचे हित होते. त्याचा जो अभिमान होता, तो त्याच्या स्वतःच्या रक्षणार्थ नव्हताच, पण तो जी येशूवार्ता गाजवीत होता, व परमेश्वराने त्याला जे प्रेषित-पद दिलेले होते, त्याचाच अभिमान पौल बाळगीत होता. या संपूर्ण पत्रात, तो सर्वांचे लक्ष 'खोटया लबाड शिक्षकांकडे' वेधण्याच्या अथक परिश्रमात गुंतलेला दिसतो (11:13). त्या खोटया शिक्षकांनी एक खोटी-नकली येशूवार्ता आणली होती; आणि ती खोटी येशूवार्ता टिकवून ठेवण्यासाठी, तिची सुरक्षा करण्यासाठी पौलावर हल्ला करणे त्यांच्यासाठी आवश्यक होते. आणि दुसरीकडे - 'सत्य सुवार्तेच्या रक्षणार्थ' पौलाला त्याच्याविरूद्ध आपला बचाव (सुरक्षा) करणे भागच होते. करिंथच्या लोकांविषयी विचार केला तर, सुवार्तेचे यश - पौलावरच अवलंबून होते. स्वतःविषयी त्याने त्यांना जे काही लिहिले, ते त्यांच्याच फायद्याचे होते. (12:19). त्या समयापर्यंत त्यांच्यासाठी नवीन करार (पुस्तक) लेखी स्वरूपात उपलब्ध नव्हता, तसेच एकही येशूवार्ता त्या समयी लिहिली गेलेली नव्हती.

*1:12 *"आनंदित"*- हा या पत्राचा दुसरा महत्वाचा विषय आहे. या शब्दाचा उपयोग, नाम व क्रिया रूपात, पौल सुमारे 31 वेळां करतो. उदा. 10:8,13; 11:16.हाच शब्द ग्रीक भाषेत 'आनंदित राहा' असा आहे, रोम 5:2-3व फिलि 3:3.ज्या प्रकारचा "अभिमान व आनंद" तो या पत्रात प्रदर्शित करतो तो एक प्रकारचा "परमेश्वराठायी असलेला पवित्र आनंद" आहे. हा तो गर्व नाही, जे अपराधी अविश्वासी करतात, हा तो "परमेश्वरी पवित्र आनंद व अभिमान" नाहीच, कारण अपराधी-अविश्वासी स्वतःच्या बळाचा, बुद्धीचा, क्षमतेचा गर्व बाळगतात. पौलाने परमेश्वराप्रत अभिमान बाळगला आणि पाहा परमेश्वराने त्याच्याठायी कसे कार्य केले. पौलाला ठाऊक होते की कोणतीही चांगली व उत्तम बाब जी त्याच्याठायी आहे, ती "परमेश्वरापासून" आहे; ती 'परमेश्वराच्या कृपेमुळे' आहे. तुलना रोम 7:18;

*1:14 *"दिवशी"*- तो खास दिवस जेव्हा मशीहा पुन्हा येतील. त्याला ठाऊक होते की त्या समयी ते त्याच्यासाठी महा आनंदाचे कारण ठरतील तुलना फिलि 4:1; 1 थेस्स 2:19-20.

*1:15-24 जर ही वचनें नीट वाचलीत तर आपल्याला कळते व उमगते की या वचनातील सत्य, ती कारणें स्पष्ट करतात की करिंथातील काही लोक त्याच्या विश्वासयोग्यतेवर आणि प्रामाणिकपणावर का शंका करीत होते. पौल या वचनांत त्या शंकाची, त्याला अवगत असलेली उत्तरें देतो. पौलाने पुन्हा करिंथाला जाण्याची योजना आखली होती. त्याने त्यांना याविषयीची कल्पना देखील दिली होती. परंतु काही विशिष्ट कारणामुळे तो तेथे जाऊ शकला नव्हता. त्याचे विरोधक, त्याने बदललेल्या या योजनेचाच आधार घेऊन, करिंथातील सर्व विश्वासींना पटवून देत होते की, अशा "योजना बदलू" मनुष्यावर भरंवसा करताच येत नाही, जर तो खरोखर विश्वसनीय व प्रामाणिक होता, तर त्याने योजनेत बदल का केला? करिंथाला येण्याचे का टाळले? आणि जर तो आखलेला बेत बदलू शकतो तर येशूवार्ता आणि त्याविषयीची मतें देखील सहज बदलू शकतो! स्वतःची मानमर्यादा कीर्ति आणि नांवलौकिकापेक्षा, पौलाला सुवार्तेच्या नांवलौकिकाविषयी कितीतरी तीव्र कळकळ होती, त्याला मुक्तिवार्तेचा अपमान सहन होणार नव्हता; आणि या दोन्हीं गोष्टी एकमेकांशी जुळलेल्या होत्या. याच कारणास्तव तो आपल्या सन्मानाविषयी स्पष्ट व ठळकपणे सांगत होता. या बाबतीत तो ख्रिस्तांच्या सर्व सेवकांसाठी एक आदर्श नमूना होता. आपण सर्वांना ही जाणीव व्हावी, आणि नीट कळावे की "आपली प्रतिष्ठा आणि सुवार्तेची प्रतिष्ठा" ही एकमेकांशी जुळलेली - विणलेली आहेत.

*1:15-17 ही त्याची मूळ व आरंभिक योजना होती, पण त्यात त्याला बदल करावा लागला होता (1 करिं 16:5-7शी तुलना).पौल कोणत्याही ठोस व योग्य कारणाशिवाय (नसतांना) उगाच योजना बदलत असतो, असे त्यांना सारखे वाटत होते, असा त्यांचा (विरोधकांचा) सतत गैरसमज झाला होता; पौल जगिक पद्धतीने विचार करत आहे, तो अविश्वासी आणि अपराधी माणसासारखा

आहे; [16]हे सुद्धा की मी तुमच्याकडून मासेदोनियास जावे आणि नंतर पुन्हा तुमच्याकडे परत यावे आणि तुम्ही मला यहूदीयाच्या यात्रेकरिता रवाना करावे. [17]तर मी ही जी घाई केली ती गंभीर विचार न करिता अनिश्चित- दुविधेची गोष्ट म्हणून केली काय? मला काही अडचण होती काय? किंवा जे मला करावयाचे आहे ते जगिक विचारांच्या हिशेबाने होते काय की एकाच समयी मी होय होय आणि नाही नाही सुद्धा करावे?

[18] *ज्या प्रकारे परमेश्वर विश्वसनीय आहे, त्याच प्रकारे तुमच्यांसाठी आमचे बोलणे 'होय आणि नाही' असे एकाच समयी दोन्हीही एकत्र नाहीत. [19]कारण परमेश्वराचा पुत्र येशू ख्रिस्त, ज्यांची वार्ता सिल्वान, तीमथ्य आणि मी तुम्हांमध्ये गाजविली, तिच्यात 'कधी होय आणि कधी नाही' अशी दोन्हीही नव्हती, परंतु तिच्याठायी होय होयच होती. [20]परमेश्वराच्या जितक्याही प्रतिज्ञा आहेत, त्या सर्व त्याच्याठायी 'होय' अशाच आहेत. यास्तव त्याच्याद्वारे त्या पूर्णही केल्या जातील यासाठी की परमेश्वराला आपल्याद्वारे गौरव, आदर व सन्मान मिळावा. [21] *जो आम्हांला तुमच्याबरोबर ख्रिस्त येशूंठायी मजबूत करीत आहे आणि ज्याने आमचा अभिषेक* केला आहे, तो परमेश्वर आहे. [22]त्याने आमच्यावर आपला शिक्काही मारला* (मुद्राही अंकित) आहे, आणि आमच्या अंतःकरणात आपला पवित्र आत्मा विसार* (करार) म्हणून दिलेला आहे.

[23] *परमेश्वराला साक्षी ठरवून मी म्हणतो, की तुम्हांला कठोर शब्दांच्या फटक्यांच्या वाईट अनुभवापासून वांचविण्यासाठी मी

---

वागतो आहे असा त्या लोकांचा विचार होता. पौल अस्थिर मनाचा, भावना पालटणारा, चंचल असा मनुष्य आहे, अशी कल्पना करण्याचा विरोधकांना मोह होत होता, म्हणून ते सर्वांना सांगत होते, की तो जे काही म्हणतो, त्याच्याविषयी काहीही नीट योजना व विचार करीत नाही, न समजता काहीही बोलतो.

***1:18-20** मुक्तिवार्तेचा विषय असल्यामुळे पौलाला हेच आश्चर्य वाटत होते की जसे वचन 17 मध्ये लिहिलेले आहे त्याचप्रकारे ते त्याच्याविषयी विश्वास करतात आणि म्हणूनच तो याविषयी संपूर्ण गांभिर्याने, असे आश्वासन देतो की तसे काहीच नाहीये. त्याची येशूवार्ता, शिकवण (आणि प्रचार) नेहमी पूर्ण खात्रीची, निश्चित आणि "होय" अशी होकारार्थीच होती, याविषयी तो त्यांना हमी देत होता. या महत्वपूर्ण बाबीविषयी तो कधीही कच खाणार नव्हता, डळमळणार नव्हता आणि त्याचे विचार (बौद्धिक) कधीही अस्थिर होणार नव्हते पण सदैव ठामच राहणार होते. तो पुढे म्हणतो की ज्या ख्रिस्तांचा तो प्रचार करतो, त्यांत कधीही अस्थिरपणा किंवा बदल होणे नाहीच मुळी. तो त्यांना खात्रीने पटवून देतो की परमेश्वराने केलेली प्रत्येक प्रतिज्ञा, तो ख्रिस्त येशूंठायी पूर्ण करेलच. वचन 19 यातील सिल्वान हा सीलासच आहे.

***1:21** पौलाला ठाऊक होते की परमेश्वराच्या सुवार्तेकरता आणि परमेश्वराच्या सत्यासाठी, सर्व विश्वासींनी स्थिर, ठाम आणि डळमळल्यावांचून राहणारे असावे (1 करिं 15:58; 16:13). केवळ परमेश्वरच विश्वासींना तसे सद्गुण देऊ शकतो (पाहा रोम 16:25; 1 पेत्र 5:10).

**"अभिषेक"*- पौल असे म्हणाला नाही की "मला/माझा अभिषेक" केला, पण तो म्हणतो की "आमचा अभिषेक" केला आहे. परमेश्वर सर्व विश्वासींचा अभिषेक करतो - 1 योहान 2:20,27.परमेश्वर आपल्या विश्वासींचा अभिषेक आपल्या आत्म्याने करतात, त्यांना मानवजातीपासून स्वत: साठी वेगळे करतो, जेणेकरून त्यांनी याजकांचा राज्य/समाज व्हावे (प्रकटी 1:6;नोट्स - मत्त 1:1तुलना लूक 4:18; प्रेषि 10:38).

***1:22** *"शिक्काही मारला"*- तुलना इफि 1:13; 4:30; 2 थेस्स 2:13.ही मुद्रा परमेश्वराच्या आत्म्याची आहे आणि परमेश्वराची उपस्थिती विश्वासींना परमेश्वराची विशेष मालमत्ता/लोक म्हणून त्यांना वेगळे करते. (1 करिं 6:19-20; रोम 8:9; योहान 17:6,10).

**"विसार"*- पाहा 5:5; इफि 1:14.आणि त्यावरचे नोट्स. परमेश्वर जेव्हा विश्वासींना आपला पवित्रात्मा देतो, तेव्हा ती एक शाश्वती असते की परमेश्वर आपल्याला "त्याच्या साम्राज्याचे वारीसदार" देखील खात्रीने करलेच. परमेश्वराने प्रतिज्ञा केलेली आहे (रोम 8:17,23; इफि 1:13-14; 1 पेत्र 1:4). परमेश्वराने देऊ केलेली/दिलेली ही प्रतिज्ञा 'अभिवचन' आहे, जे विश्वासींच्या अंतिम उद्धाराचे अंतिम चरण आहे. पाहा योहान 6:37-40; 10:27-29; 17:11-12; रोम 5:9-10; 8:28-39.

***1:23** पौल किती गांभिर्याने बोलतो आहे ते पाहा. सुवार्तेची कीर्ति व नांवलौकिक ही त्याच्याकरता सर्वात जास्त चिंतेची बाब होती. त्याविषयी तो प्रामुख्याने काळजीत असे. आता या विशिष्ट समयी तो ते कारण स्पष्ट करतो ज्यामुळे त्याने त्यांच्याकडे येण्याचा बेत बदलला होता आणि योजना पुढे ढकलली होती. तो स्वतःच्या शब्दांचा मान राखत नाही किंवा हवेत शब्द फेकत असतो, असे मुळीच नव्हते; पण मुख्य कारण हेच होते की त्याला त्यांच्याविषयी गंभीर कळकळ होती, त्यांच्या चिंतेने त्याला अस्वस्थ केले होते. पाहा 2:1-4.त्याच्या बोलण्याचे तात्पर्य हेच होते की करिंथाच्या चर्चची दशा इतकी निकृष्ट व खालच्या स्तराची होती की जर तो त्यांच्याकडे आला असता तर त्याचा अर्थ 'दुःख व पीडा' असणार होता केवळ त्यांनाच नव्हे पण त्याला देखील आणि त्यांना दुःख व पीडा व्हावी, हे पौलाला नको होते. 1 करिं 4:21.

करिंथास येण्याचे आजवर टाळले होते. 24 *तुमच्या विश्वासाविषयी (त्यावर) तुमच्यावर हक्क (सत्ता - अधिकार) गाजविण्यासाठी
आम्ही तसे करितो असे नाही, पण आम्ही तुमच्या आनंदासाठी तुमच्याबरोबर कार्य करितो (साहाय्यक म्हणून) आहोत, कारण
तुम्ही विश्वासामुळेच स्थिर स्थितित (कायम) आहा.

## 2

1 *मी असा निश्चय करून चुकलो होतो की आल्यानंतर तुम्हां लोकांना उदास करु नयें. 2 कारण जर मी तुम्हांला उदास केले तर
माझ्या अंतःकरणाला प्रसन्न करणारा कोण असेल, केवळ तेच ज्यांना मी उदास केले. 3 हीच गोष्ट मी तुम्हांला याकरिता लिहिली की
असे घडू नये ,की मी पुन्हा आलो तर ज्यांच्यापासून मला आनंद मिळावयास हवा आहे त्यांच्यापासून दुःख मिळावे. मला तुम्हां
सर्वांवर याविषयीचा भरंवसा आहे ,की जो माझा आनंद आहे तो तुम्हां सर्वांचा आनंद आहे. 4 मी मोठ्या दुःखाने, अंतःकरणाच्या
भीषण पिडेने, अश्रु गाळून गाळून तुम्हांला लिहिले होते, ते तुम्हांला पीडा व दुःख व्हावे म्हणून नव्हे, परंतु यासाठी की तुम्ही माझे ते
विशेष प्रेम ओळखून घ्यावे, जे तुमच्यासाठी माझ्याठायी आहे.
5 *तुमच्यापैकी एखाद्यानेही जर निराश केले आहे, तर त्याने ते केवळ मलाच नव्हे परंतु कमी जास्त असे तुम्हां सर्वांनाच निराश
केलेले आहे. 6 अशा मनुष्याला बहुमताने ठरवून दिलेली शिक्षा* पुरेशी आहे. 7 *हे बरेंच होईल की त्याचा अपराध क्षमा करून त्याचे
सांत्वन सुद्धा केले जावे यासाठी, की अशा मनुष्याने आणखी जास्तच निराशेने भरून जाऊ नये. प्रियांनो, त्याच्यासाठी अशी
वागणूकच सर्वोत्तम ठरील. 8 म्हणून मी तुम्हांला हीच विनंती करितो की त्याला आपल्या प्रेमाचे प्रमाण द्या. 9 कारण मी तुम्हांला
लिहिण्याचे एक कारण हे देखील होते, की तुम्ही सर्व बाबतींत माझे आज्ञापालन करावयास तयार* आहा, किंवा नाही याविषयी

---

*__1:24__ त्यांनी त्याच्याविषयी काही गैरसमज करून घ्यावा अशी पौलाची, इच्छा नव्हती. तो एखादा जुलूमशहा किंवा क्रूर सम्राट नव्हता ना तो त्यांना, त्याला हवे तसे करावयास भाग पाडणार होता. त्यांच्या स्वतःच्या विश्वासामुळे ते स्थिर होते, त्याने त्यांच्यावर आपला अधिकार गाजवण्या अशी ही गोष्ट नव्हती (13:10). तुलना 1 पेत्र 5:3.

*__2:1-4__ हा 1:23.काही भाष्यकार व विद्वानांच्या मते पौल 3,4 थ्या वचनांत लिहिलेल्या ज्या पत्राचा उल्लेख करतो, ते 1करिंथाचे पत्र आहे. कदाचित ते दुसरे पत्र देखील असू शकते, जे आता हरविलेले आहे आणि परमेश्वराच्या आत्म्याने त्या पत्राची निवड केली नाही की त्याचा समावेश नवीन करारात व्हावा.

*__2:5-10__ जर पौल 3,4 थ्या वचनांत 1करिंथाच्या पत्राचा उल्लेख करीत असेल, तर ज्या माणसाविषयी तो या वचनांत बोलतो तो 1 करिं 5:1-5यातील मनुष्य असावा. पण या गोष्टीचीही संभावना आहे की ज्या मनुष्याविषयीचा उल्लेख पौल करतो आहे, तो दुसराच कोणीतरी व्यक्ती असू शकतो; असा कोणीतरी, ज्याने वैयक्तिक रीतिने पौलाविरूद्ध वाईट कृत्यें केलेली होती. कारण जी भाषा पौलाने येथे वापरली आहे, त्यावरून हे स्पष्ट कळते. पण दोन्ही मनुष्य आपल्याला एकच धडा शिकवतात. जेव्हा एखादा कोणी चर्चविरूद्ध अपराध करतो आणि जेव्हा चर्च त्याला अनुशासन शिकवते, शासन करते तेव्हा, जर तो आपले अपराध मान्य करून त्याविषयी पश्चात्ताप करीत असेल तर, अशा मनुष्याला चर्चने क्षमा करावी, त्याला पुन्हा आपल्या सहभागितेत शामिल करावे.

*__2:6__ *“शिक्षा”*- म्हणजे “अनुशासन-शिस्त” म्हणजे मनुष्याला चर्चमधून बाहेर काढणे, त्याच्याबरोबर असलेली सहभागिता समाप्त करणे किंवा अशीच काही दुसरी शिस्त लावणे (तुलना 1 करिं 5:13; 2 थेस्स 3:17).

*__2:7-8__ चर्चच्या अनुशासनाचा मुख्य हेतू म्हणजे, अपराध करणाऱ्या मनुष्याला अपराधाप्रत पश्चात्तापापर्यंत घेऊन येणे होय, फक्त त्याला शिक्षा देणे हा नव्हे. ही वचनें या गोष्टीकडे निर्देश करतात की त्या माणसाने खरोखर पश्चात्ताप केला होता, त्याला त्याविषयी दुःख वाटत होते की त्याने ते अपराध केले होते. पौल म्हणतो की विश्वासींनी या गोष्टीची नोंद घ्यावी की त्यांनी “अनुशासन केव्हा थांबवावे आणि क्षमा करणे व सांत्वन देणे केव्हा प्रारंभ करावे”. पौल असे मुळीच म्हणत नाही की शिस्त व पश्चात्ताप होण्यापूर्वी, विश्वासींनी, चर्चने त्याला क्षमा करून त्याच्याप्रत कोमल व्हावे. ज्या-ज्या वेळी विश्वासी अपराध करतो, त्या-त्या वेळी चर्चच्या पुढाऱ्यांनी त्याच्याशी खूप कोमल व सौम्य होऊन व्यवहार करावयाचा नाहीये, किंवा खूप कडक व कठोर होऊनही त्याच्याशी वागावयाचे नाहीये. चर्चमध्ये शिस्त आणि प्रेम यांची जोड असावी.

*__2:9__ *“आज्ञापालन करावयास तयार”*- त्याच्याप्रत त्यांनी आज्ञाधारक असावे असा पौलाचा अर्थ नव्हता (1:24) पण त्याच्याद्वारे परमेश्वराचे जे निर्देश त्याच्यातर्फे दिले गेले होते त्यांच्याप्रत. या दोन्ही गोष्टींत मोठा फरक आहे. काही ख्रिस्ती पुढारी, “प्रथम त्यांची आज्ञा पाळली जावी” यावर जास्त भर देतात, परंतु पौलाला सर्वांनी, प्रथम प्रभू येशूंची आज्ञा पाळावी, याविषयीची गंभीर कळकळ होती.

तुम्हांला पारखावे (पडताळावे). [10] *ज्या कोणाचे तुम्ही जे काही क्षमा करिता, त्याचे मी देखील क्षमा करितो. कारण मी देखील जे
क्षमा केले आहे, ते तुमच्यामुळे ख्रिस्तांच्या उपस्थितीत ख्रिस्तांच्या जागी राहून असे केले आहे. [11] *हेतू हाच की सैतानाने
आपल्याला फसवू नये कारण आपण त्याच्या चातुर्याविषयी अजाण नाहीये.
[12,13] तसेच प्रभूने माझ्यासाठी एक नवीन दरवाजा* उघडला आहे, जेणेकरुन मी तुमच्याकडे दुसऱ्यांदा येऊ शकलो, तरीपण माझे
हृदय बेचैन (अस्वस्थ) होते, कारण माझा भाऊ तीत* याच्याशी माझी भेंट झाली नव्हती, म्हणून मी निरोप घेतला आणि
मासेदोनियाकडे* निघून गेलो.
[14] *परंतु परमेश्वराची प्रशंसा असो (व्हावी), जो येशूंमध्ये आम्हांला नेहमी, विजयाच्या मिरवणूकीत समारंभपूर्वकरित्या घेऊन
जात असतो, व आपल्या ज्ञानाचा परिमल (सुगंध), आमच्याद्वारे सर्वत्र पसरवीत (दरवळून टाकीत) असतो. [15] कारण आम्ही
परमेश्वरासाठी, उद्धार प्राप्त करून घेणाऱ्या आणि उद्धार होत नसलेल्या (नाश होणारे) दोन्हीं प्रकारच्या लोकांसाठी ख्रिस्तांचे सुगंध
(सुवास)* आहोत; [16] *काहींसाठी मरणाचे (मशीहाच्या) निमित्त, किंबहुना मरणाचा गंधच आणि काहींसाठी जीवनाच्या निमित्ताने

---

***2:10*** पौलाने आधीच त्या माणसाला क्षमा केलेली होती ज्याने वैयक्तिकरित्या त्याला दुखविले होते. आता असे झाले होते की त्या माणसाने त्याविषयीचा पश्चात्ताप केलेला होता म्हणून पौलाने सुद्धा त्याचा अपराध, “एक छोटीशी गोष्ट आहे” असे समजून घेण्याचा विचार केला. पण ही गोष्ट अशक्य वाटू शकते, जर पौल 1 करिं 5:1-5च्या अपराधी मनुष्याचा उल्लेख करीत असेल तर - ती काही लहान-सहान बाब नव्हती किंवा पौलाने तसे समजून घेतलेही नसते. परंतु तरीही त्याच्याविरूद्ध वैयक्तिक रीतिने केलेला अपराध आनंदाने क्षमा करावयास पौल तयार होता. अशा प्रकारच्या क्षमाशिलतेविषयी पाहा - मत्त 6:12,14,15; 18:21-35; इफि 4:32; कल 3:13.पौलाला ठाऊक होते की परमेश्वराचे डोळे/दृष्टि त्याच्याकडे लागलेले होते; त्याने इतरांना जेवढे/जे क्षमा केले होते त्यांहून कितीतरी मोठे-विशाल क्षमादान ख्रिस्तांनी त्याला दिलेले होते.

***2:11*** शैतानाचा हेतू हाच असतो की “कसे त्याने विश्वासींचे जीवन नष्ट करून टाकावे, चर्च उध्वस्त व विराण करून टाकावे आणि ख्रिस्तांच्या नांवाचा अपमान करावा” सैतानाकडे हे कार्य सिद्ध (पूर्ण) करण्यासाठी अनेक कट व योजना असतात. सर्वप्रथम तो विश्वासींना अपराध करावयास प्रवृत्त करतो, उभारी देतो, मग गोष्टी अशा काही रचतो आणि सिद्धीस नेतो की विश्वासींनी क्षमा प्राप्त करून घेण्याच्या लालसेने, तळमळ करीत , जीवन जगत राहावे; किंवा जर त्यांनी पश्चात्ताप देखील केलेला नसेल तरी सैतान चर्चला त्यांना सामावून घेण्यास भाग पाडतो. चर्चची त्रासदायक व माथेफिरू सदस्यांद्वारे (1-2) तो चर्चची शांति व व्यवस्था भंग व नष्ट करण्याचे अथक श्रम घेत असतो. तो चर्चच्या सदस्यांना अपराधांविषयी एकतर खूपच सौम्य, नाहीतर खूपच कठोरतेने वागावयास लावतो. सैतानावरचे नोट्स - 1 इति 21:1; मत्त 4:1; योहान 8:44.

***2:12*** *“दरवाजा”*- प्रेषि 14:27; 1 करिं 16:9; कल 4:3; प्रकटी 3:8.

***2:13*** *“तीत”*- पौलाने तीताला करिंथास पाठविले होते (7:6-7) आणि तो त्याला त्रोआस येथे भेटणार होता, पण जेव्हा तीत ठरल्याप्रमाणे भेटावयास आला नाही तेव्हा तो जरा अस्वस्थ झाला, करिंथात स्थिती कशी असेल या विचाराने त्याचे हृदय विचलीत झाले होते, तो साशंक होता. करिंथाच्या चर्चकरताचे त्याचे प्रेम फार गाढ होते (वचन 4) आणि त्याची मनापासून हीच इच्छा होती की त्यांनी योग्य व उचित प्रकारे त्याच्या पत्रांना प्रतिसाद द्यावा, त्याविषयी गंभीरपणे ठरवावे.

* *“मासेदोनियाकडे”*- 1:16.

***2:14*** चर्चमध्ये कितीही समस्या असल्या, जगात कितीही छळ असला तरीही परमेश्वर आपल्या सेवकांना एकानंतर एक असे विजयी करीत जातो, तो त्या विजयोत्सवात पुढारीपण करतो, त्याच्याच नेतृत्वात विश्वासी व चर्च विजयानंतर विजय प्राप्त करीत जाते. तुलना रोम 8:37.“नेहमी” आणि “यीशुंमध्ये” या शब्दाकडे लक्ष द्या. ख्रिस्तांवांचून (परमेश्वरावाचून) आपण कितीही प्रयत्न करीत राहिलो तरी आपले प्रयत्न कधीही यशस्वी होणार नाहीत. ख्रिस्तांच्या नेतृत्वावांचून केलेले प्रयत्न व्यर्थ ठरतात, त्यांचे चीज मुळीच होत नसते. होय, जग आणि लोक जे यश म्हणतात, कदाचित ते त्याला मिळेलही, पण तो जगिक स्वरूपाचा विजय असेल, परंतु लक्षात ठेवा असा विजय व असे यश, परमेश्वरातर्फे पुरस्कृत केले जाणार नाही. पौलाने आणि त्याच्या सहकर्मींनी हे ज्ञान व त्याचा ‘सुगंध’ प्रत्येक ठिकाणी पसरविला; जेथे जेथे ते गेले तेथे तेथे हा सुगंध दरवळत राहिला, आपण येशूंच्या ज्ञानाचा सुगंध असाच पसरवितो काय?

***2:15*** *“सुगंध (सुवांस)”*- ख्रिस्तांच्या सेवकांनी, ख्रिस्तांच्या ज्ञानाविषयीचा सुगंध, तारण प्राप्त असलेले किंवा नसलेले, विश्वासी आणि अविश्वासी अशा सर्वप्रकारच्या लोकांसाठी सारखाच पसरविला; परिणामी ख्रिस्तांचे सेवक “एका मोहक व गोड सुगंधासारखे” परमेश्वरासमोर सादर झाले. असा मनुष्य ज्याचे/जिचे जीवन ख्रिस्तांच्या सुवासाने भरलेले असेल तो सुवास, प्रत्येक ठिकाणी जेथे ते जातील, पसरवीत जातील. असा मनुष्य ज्याच्याठायी ख्रिस्त वास करतात, जो ख्रिस्तांविषयी बोलतो, प्रचार करतो आणि ख्रिस्तांची येशूवार्ता गाजवितो, तो चारीं दिशेत ख्रिस्तांच्या सुगंधाने सभोवतालचे वातावरण दरवळून टाकेल, सुगंधित करेल.

(जणूकाही) जीवनाचा परिमल (सुगंध)! इतकी प्रचंड जवाबदारी घेण्याची लायकी कोणाची आहे.* तरी काय? [17] कारण जे अनेक लोक परमेश्वराच्या वचनाची भेसळ.* करितात त्यांच्यासारखे आम्ही नाही, परंतु अंतःकरणाच्या सच्चेपणाने.* (प्रामाणिकपणे) परमेश्वरातर्फे, परमेश्वराच्या उपस्थितीची जाणीव ठेवून.* ख्रिस्तांठायी बोलणारे आहोत.

## 3

[1] *आम्ही पुन्हा आपली प्रशंसा (बढ़ाईखोरी) प्रारंभिली आहे काय? किंवा इतर लोकांप्रमाणे शिफारसपत्रें, आम्हांला तुमच्याकडे आणावयाची आहेत किंवा तुमच्याकडून घ्यावयाची आहेत काय? [2] *आमच्या मनावर (अंतःकरणावर) लिहिलेले पत्र तर प्रत्यक्ष

---

विश्वासींठायी कधीही दुष्टाई, अपराध आणि जगिक गोष्टींचा दुर्गंध येता कामा नये, त्याची गरजही नाही.

***2:16** जेव्हा ख्रिस्तांची येशूवार्ता त्यांच्या सेवकांद्वारे गाजविली जाते, तेव्हा जे त्यावर विश्वास ठेवतात त्यांच्यासाठी ती येशूवार्ता जीवन घेऊन येते आणि जे ती मान्य करीत नाहीत, त्यांच्यासाठी मृत्यू. तुलना योहान 3:36.म्हणून जे ती स्वीकार करीत नाहीत, ख्रिस्तांवर विश्वास ठेवण्याचे नाकारतात, त्यांच्यासाठी येशूवार्ता प्राणघातक-विषदायी आणि श्वास कोंडून मारून टाकणाऱ्या दुर्गंधासारखी आहे, परंतु जे येशूवार्ता मान्य करतात त्यांच्यासाठी ती ‘अनंत जीवन देणारी, जीवनदायक सुगंध ठरते.

**“लायकी कोणाची आहे”*- कोणताही मनुष्य स्वप्रयत्नाने ख्रिस्तांच्या ज्ञानाचा सुगंध पसरविण्याच्या लायकीचा नाही, ती पात्रता त्याच्याठायी नाहीच मुळी, पण पाहा 3:5-6.एक आहे जोआपल्याला तसे करण्याची लायकी देतो, समर्थ करतो.

***2:17** *“भेसळ”*- पौलाला ठाऊक होते की त्या चर्चत अशीही माणसे होती, जी ख्रिस्त सेवक होण्याचा दावा करीत होती, पण ज्यांनी ख्रिस्तांचा संदेश आपल्या वैयक्तिक फायद्याकरता धुऊन टाकला, त्याच्यावर पाणी टाकले, ते नष्ट केले. ग्रीक शब्द ‘भेसळ’ याचा दुसरा अर्थ “खेळी करणे” किंवा दुसऱ्यांच्या गळी उतरविण्यासाठी त्याच्याशी खेळत राहाणे; किंवा दोन्हीं अर्थांचा समावेश होऊ शकतो. अप्रामाणिक व्यापारी किंवा उद्योग करणारे, आपल्या उत्पन्नाद्वारे जास्त नफा मिळविण्यासाठी त्यात ‘मिलावट-भेसळ’ करतात. स्वतःला ख्रिस्ती सेवक म्हणवून घेणारे काही लोक अगदी असेच आहेत. ते जिच्यात ‘भेसळ’ करतात ती मुख्यत्वेकरून ख्रिस्तांची येशूवार्ता आहे, आणि त्यांची ही ‘सेवा’ यासाठीचीच असते की सुवार्तेमुळे त्यांना वैयक्तिक लाभ प्राप्त करता यावा, काहीतरी मिळावे. 1 तीम 6:5; योहान 12:4-6; 2 पेत्र 2:15शी तुलना.

**“सच्चेपणाने”*- 1:12,18,19.

**“परमेश्वराच्या उपस्थितीची जाणीव ठेवून”*- परमेश्वराची दृष्टि आपल्यावर लागलेली आहे, याची त्याला सदैव जाणीव/ आठवण असायची आणि त्याच दृष्टीकोनातून, त्याच ‘ख्रिस्तमय प्रकाशात’ राहून तो ख्रिस्त-सेवा करीत होता, अंतःकरणाच्या सात्विकतेने जीवन जगत होता. हे ‘ख्रिस्तीय ज्ञान’ व त्याविषयीचे सत्य कोणाच्याही जीवनात, एक मोठा प्रभावशाली बदल (परिवर्तन) घडवून आणू शकते.

***3:1** या दोन्ही प्रश्नांची उत्तरे “नाही” अशीच आहेत. अनुमोदनाच्या किंवा प्रशंसा-पत्रांचे काही महत्वाचे स्थान नाही असे पौलाला अजिबात म्हणावयाचे नाहीये. कधी कधी तर त्याने स्वतःच दुसऱ्यांसाठी प्रशंसा पत्रें लिहिली होती. (8:16-24; रोम 16:1-2; 1 करिं 16:3,10,11). पण येथे तो हेच स्पष्ट करतो आहे की त्याला अशा कोणत्याही गोष्टीची (पत्रांची) गरज नाहीच मुळी.

***3:2-3** करिंथाचे विश्वासीं स्वतःच जणू काही प्रशंसा पत्रासारखे होते. करिंथाचे विश्वासीं स्वतःच पौलाने गाजविलेल्या सुवार्तेचे अनुमोदन करणारे पत्र होते. एका पत्राशी जर आपण त्यांची तुलना केली तर त्यांच्याविषयी खालील गोष्टी सांगितल्या जाऊ शकतात. ‘करिंथाचे विश्वासी’ पौल व त्यांच्या सहकर्मींच्या हृदयांवर लिहिलेली पत्रेंच होती (म्हणजे पौल व इतर सहकर्मी त्या सर्व गोष्टींविषयी जागृत होते, जे परमेश्वराने त्याच्या अंतःकरणात व जीवनात केले होते, पौल व त्याचे सहकर्मी त्यांच्यावर विपुल प्रेम करीत होते. 7:3) करिंथाचे विश्वासीं, पौलाच्या हृदयांतील “रहस्यमय आणि गुपित व लपलेले पत्र” नव्हते, तर प्रत्येक जण ते सहजपणे वाचू शकेल (वांचता येईल) असे आणि स्पष्टपणे दिसणारे (पौलाच्या सेवेद्वारे त्यांच्यात झालेला बदल, निर्माण झालेले नवीन जीवन कोणीही ठळकपणे पाहू शकत होते) असे पत्र होते. करिंथाची चर्च ‘ख्रिस्तांचे पत्र’ होते; (ती ख्रिस्तांची योजना होती, ख्रिस्तांनी आखलेल्या करिंथाच्या चर्चविषयीची भविष्याची तरतूद होती, दैवीक बेत होता, ख्रिस्त येशूंच्या सुवार्तेने त्यांच्या अंतःकरणात व जीवनात जे परिवर्तन घडवून आणले होते त्याविषयीचे ‘ते’ पत्र होते). करिंथाचे चर्च पौल व त्याच्या सहकर्मींचे पत्र होते (ख्रिस्तांनी या कार्यात त्यांचा उपयोग करून घेतलेला होता. ते परमेश्वराच्या आत्म्याद्वारे उत्पन्न/निर्माण केलेले होते तुलना योहान 3:5-8). हे पत्रलेखन त्याच्या हृदयात कोरलेले होते (त्याच्यात झालेला बदल केवळ बाह्य-स्वरूपाचा नव्हता पण तो आंतरिक बदल होता - 5:17 ). दोघांतील स्पष्ट फरक (तफावत) दाखविण्यासाठी पौल त्यांची तुलना त्या नियमांशी व आज्ञांशी

तुम्हीच आहा, सर्व लोक ती पत्रें ओळखतात, लोकांना ती कळलेली आहेत म्हणून ते ती पत्रें वाचतात. [3] *हे दिसतेच आहे (प्रगट),
की तुम्ही मशीहांचे पत्र आहा. आम्ही सेवकांनी शाईने नव्हे, दगडी पाटयांवर नव्हे, परंतु जिवंत परमेश्वराच्या आत्म्याने
हृदयरूपी-मांस पाटयांवर लिहिलेले असे तुम्ही आहा.
[4] *ख्रिस्तांठायी परमेश्वरावर आम्हांला असाच भरंवसा आहे. [5] *आम्ही स्वतः योग्य व सक्षम आहोत असे मुळीच नाहीये, कारण
आमच्या पात्रतेचा स्त्रोत तर खरोखरी (उगम) परमेश्वरच आहे. [6] *त्यानेच आम्हांला नवीन कराराचे सेवक होण्याच्या पात्रतेचे
(समर्थ) केलेले आहे. शब्दांचे (शाब्दिक) सेवक नव्हे परंतु पवित्र आत्म्याचे, कारण शब्द मारतो, पण आत्मा (पवित्र आत्मा)जिवंत
करून जीवन देतो.
[7] *जर मृत्यूचा तो करार ज्याची अक्षरें दगडांवर कोरलेली होती इतक्या देदीप्यमान (गौरवशाली) भव्यदिव्य प्रकाशाने चमकत
होती, की त्याच्या प्रभावाने मोशेच्या चेहऱ्यावरचे तेज जे नाहीसे होत चालले होते, तरीही इस्त्राएली त्याचा चेहरा एकटक पाहू
शकत नव्हते! [8] तर आत्म्याचा करार आणखी अधिक तेजस्वितेने परिपूर्ण भरलेला का नसणार? [9] कारण जर दोषी ठरविणारा करार
तेजस्वितेने भरलेला होता, तर नीतिमान (निर्दोष) ठरविणारा करार आणखी अधिक विशेषरित्या तेजोमय का असणार नाही?
[10] नव्या कराराच्या भव्य (अद्वितीय) महिमेने जर जुन्या कराराच्या महिमेची तुलना केली गेली तर त्याच्यापुढे जुना करार टिकाव

---

करतो ज्या परमेश्वराने दगडी पाटयांवर कोरून दिल्या होत्या - पाहा निर्ग 31:18; 32:15-16.तुलना यिर्म 31:33-34; इब्री 8:10-12.आता देखील (आजही) परमेश्वराचे सेवक, परमेश्वराबरोबर अशा "अनेक पत्रांची" निर्मिती (निर्माण काय) करण्यात अहोरात्र गुंतलेले आहेत - लोक खरोखरीच ख्रिस्तांच्या सुवार्तेद्वारे (मुळे) अनंतकाळाच्या - सार्वकालिक जीवनाकरता बदलत आहेत. या पृथ्वीवर यापेक्षा 'श्रेष्ठ सुवर्णसंधी' आणि ख्रिस्तांठायी असलेला 'विशेषाधिकार' दुसरा कोणता असू शकतो काय?

*3:3-11 या वचनांत पौल नवीन व जुन्या करारातील फरक (विरोधाभास) दर्शवितो. जुना करार एक सेवा होती ज्याद्वारे मृत्यू/मरण आणले गेले (वचन 6,7), परंतु नवीन कराराद्वारे जीवनाचे पर्दापण (येणे) झाले (वचन 6). जुना करार दगडी पाटयांवर लिहिलेला होता (निर्ग 31:18), पण नवीन करार विश्वासींच्या (लोकांच्या) हृदयांवर लिहिलेला आहे (वचन 3). जुना करार एक अशी सेवा होती जी लोकांना दोषी (अपराधी) ठरवीत होती, परंतु नवीन करार तो दोषीपणा पुसून टाकतो आणि मनुष्याला नीतिमान करतो (वचन 9; रोम 3:19-24). जुना करार "टवटवीतपणा कमी होत जाऊन, कोमेजत जात होता" (त्याची चमक फिकी होत जात होती. वचन 11; इब्री 8:13), पण नवीन करार, 'स्थायी-शाश्वत' आहे (वचन 11). थोडक्यात म्हटले तर, जुना कराराचा, नियम व आज्ञा स्वरूपात होता जो मनुष्याचे हृदय कधीही बदलू शकत नव्हता (नोट्स निर्ग 19:5-6). परंतु नवीन करार, आपल्याबरोबर ती सेवा घेऊन येतो, जी परमेश्वराच्या आत्म्याद्वारे केली जाते, जी मनुष्याला नवीन करते (वचन 3,6,8). म्हणून जरी जुन्याठायी काही गौरव (तेज) होते ,तरी नव्याठायी त्यांहून अधिक तेजोमय गौरव आहे (वचन 8-11). असे वाटते की, काही लोक करिंथातील लोकांना, असे बोलून सतत त्रास देत होते की त्यांनी मोशेचे नियम-कायदे-आज्ञांचे पालन त्यांनी करावयाचेच आहे (असे असावे ही एक शक्यता आहे). तुलना प्रेषि 15:1-2.म्हणून पौल त्यांना स्पष्ट करून ठळकपणे सांगतो व समजतो,की त्याने (पौलाने) गाजविलेली ख्रिस्तांची येशूवार्ता, त्यांनी (विरोधकांनी) पालन केलेल्या व प्रचार केलेल्या मोशेंच्या नियमांपेक्षा किती महान आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे.

*3:4 पौलाला याविषयी पूर्ण खात्री होती की परमेश्वर आपल्या सेवेसाठी आणि वर दिलेल्या वर्णनाप्रमाणेच त्यास उपयोगात आणीत आहे. ख्रिस्तांनी स्वतः त्याला तसे आश्वासन दिलेले होते.

*3:5-16 पाहा - वर वर्णन केलेले सेवाकार्य करणे, कोणाकरताही शक्य नाही जोवर तो मनुष्य त्या विशिष्ट कार्यासाठी बोलविला (पाचारण) जात नाही आणि परमेश्वराद्वारे सज्ज केला जात नाही. पौलाठायी प्रभू सेवेकरता असलेला आत्मविश्वास त्याच्या स्वतःच्या क्षमतेवर अवलंबून नव्हता. त्याला केवळ ठाऊकच नव्हते, तर पूर्ण शाश्वती होती की केवळ परमेश्वरच त्याला प्रभू सेवेकरता बल देतो आणि दिलेले कार्य शक्य करतो (1 करिं 15:10; कल 1:29;पाहा योहान 15:5).

*3:6 ज्या प्रत्येकाला परमेश्वर आपल्या सेवेसाठी पाठवितो, त्याने असा आत्मविश्वास बाळगावा आणि ते शक्य आहे, की परमेश्वर त्यांच्याकडून ती सेवा (शक्य) होऊ देईल. नवीन करारावरचे नोट्स - मत्त 26:28; यिर्म 31:31-34; इब्री 8:6-13.ग्रीक शब्दाचे येथे दिलेले "पत्र" हे भाषांतर वचन 2,3 मधल्या शब्दांसारखे नाही; कारण त्याचा अर्थ पूर्णतः बदललेला आहे. "पत्र" या शब्दाचा उल्लेख जुन्या करारासाठी केलेला आहे, ज्यांत कायदे, नियम आणि रीति-विधींचा समावेश आहे. जुन्या कराराने मरण आणले कारण कोणीही त्याचे पालन कधीही पूर्णपणे करू शकला नव्हता आणि म्हणून मनुष्याला हा करार मरणदंडास पात्र ठरवून त्याला दोषी ठरविणे न्याय्य समजत होता. (रोम 7:9-11; गल 3:10पाहा रोम 3:19-20; 4:15; 5:20; 8:3). पण या उलट नवीन करार परमेश्वराच्या आत्म्याद्वारे जीवन घेऊन येतो.

*3:7 *"मोशेच्या चेहऱ्यावरचे तेज"*- पहा निर्ग 34:29-35.

धरूच (टिकूच) शकत नाही. [11] कारण जेव्हा तेजोमयाची चमक कमी होत जात होती, तर जो स्थिर व कायम राहील तो आणखी अधिक तेजाने का नाही चकाकणार?

[12] म्हणूनच अशी आशा.* बाळगून आम्ही धिटाईने (हिंमतीने) बोलतो, [13] *मोशेसारखे नाही ज्याने आपल्या चेहऱ्यावर आच्छादन घातलेले होते, जेणेकरून इस्त्राएली लोकांनी कमी होत जाणारे त्याचे ते तेज समाप्त होताना पाहू नये. [14] *त्यांची अक्कल शून्य (सुन्न) झाली आहे, आणि त्यांचे बौद्धिक डोळे आंधळे झाल्यामुळे त्यांची बुद्धी नाहीतशी (ऱ्हास) झालेली आहे, कारण आजपर्यंत देखील मोशेचे नियमशास्त्र (आज्ञा, नियम इत्यादि) वाचत असताना त्यांच्या मनांवर तोच पडदा पडलेला असतो, परंतु ख्रिस्तांमध्ये तोच पडदा वर उठविला जातो. [15] आजपर्यंतही जेव्हा मोशेचे पुस्तक वाचले जाते, तेव्हा त्यांच्या अंतःकरणावर आच्छादन असते. [16] पण ज्या समयी (जेव्हाही) त्यांचे हृदय प्रभूकडे वळेल, त्या समयी ते आच्छादन काढून फेकले जाईल. [17] *प्रभू तर आत्मा आहे आणि जेथे जेथे प्रभूचा आत्मा आहे, तेथे तेथे स्वच्छंदता (स्वातंत्र्य) व मोकळेपणा.* आहे. [18] परंतु आपल्या सर्वांच्या उघडच्या चेहऱ्यांवर प्रभूचे तेज (प्रकाश) अशा प्रकारे दिसत असते.* ज्या प्रकारे आरशात, म्हणून प्रभूद्वारे जो आत्मा आहे त्याच्या तेजस्वितेच्या रूपात आपण थोडके थोडके (अल्प अंशी) बदलत जातो.

# 4

---

*__3:12__ *"आशा"*- रोम 5:2-5; 8:23-25.या भविष्यातील आशेने व गौरवशाली महिमामय अपेक्षेने पौलाला वर्तमानकाळी, खूपच हिम्मती,प्रचंड धीट व धाडसी केलेले होते.

*__3:13__ निर्ग 34:29-35 -महिमेचे ते दृश्य पाहून इस्त्राएली घाबरले होते. नवीन करार भय आणत नाही पण त्याऐवजी तो आशा, हिम्मत, धाडस आणि आनंद घेऊन येतो.

*__3:14-16__ आता तो मोशेच्या चेहऱ्यावरच्या आच्छादनापासून काही आतंरिक धडे शिकवतो. वचन 14 यात तो त्या लोकांविषयी बोलतो आहे जे अजूनही जुन्या करारांअंतर्गत आहेत, म्हणजे यहूदी आणि ज्यांनी यहूदी धर्मावर विश्वास ठेवला होता. त्यांची मनें अक्रियाशील व तीव्र नसणारी आहेत, त्यांच्या हृदयांवर आच्छादन आहे (वचन 15). अर्थात, जुन्या करारात ते काय वाचतात याची त्यांना योग्य समज नाही. (पाहा 4:3-4). येशूंनी योहानाच्या सुवार्तेत, यहूद्यांसाठी जे शब्द वापरले त्यांची तुलना करा - योहान 5:39-40,46,47.केवळ ख्रिस्तच अंधकार व गैरसमजाचे आच्छादन काढून फेकू शकतात आणि त्याद्वारे लोकांना 'सत्यविषयीची व परमेश्वराविषयी समज व ओळख होऊ देतात. (वचन 14,16; मत्त 11:27; योहान 8:12,31,32; 14:6).

*__3:17__ प्रभू येशू आणि परमेश्वराचा आत्मा हे तसेच एक आहेत जसा परमेश्वर बाप आणि त्यांचा पुत्र येशू हे एक आहेत (योहान 10:30; 14:9). परमेश्वराच्या आत्म्याला, 'येशूंचा आत्मा' असे देखील म्हटले आहे. रोम 8:9यात. त्रिएकत्वावर नोट्स - मत्त 3:16-17;

* *"स्वच्छंदता...मोकळेपणा"*- परमेश्वराचा आत्मा अनेक प्रकारची मोकळीक व स्वातंत्र्याचा आस्वाद - अनुभव व आनंद देत असतो : नियम व कायद्यांपासून (रोम 7:4,6; गल 5:18), भयांपासून (रोम 6:14,18). तुलना योहान 8:36.

*__3:18__ *"दिसत असते"*- सर्व विश्वासीं आता, परमेश्वराचा महिमा, काही अंशी (थोडके) ख्रिस्तांठायी पाहत आहेत (4:6). म्हणजे त्याविषयी त्यांना थोडी फार आतंरिक समज आहे, अंतःकरणाचे काही प्रकाशन आहे, पण तरीही आता त्यांचे पाहणे,एखाद्या उणीव असलेल्या सदोष आरशात पाहण्यासारखेच आहे.तुलना 1 करिं 13:12.केवळ प्रतिबिंब प्रकट होते (आढळते) संपूर्ण 'वास्तविक' नाही, जे आपण सर्व विश्वासीं त्या वेळीच पाहू शकूं जेव्हा ख्रिस्तांना आपण समोरासमोर पाहू. परंतु तसे असले, तरी सर्व विश्वासीं हळूहळू बदलत चालले आहेत. ग्रीक शब्द ज्याचे भाषांतर "बदलणे" "रूपांतरित होणे" आहे तो केवळ चारदां नवीन करारात आढळतो - येथे, मत्त 17:2; मार्क 9:2आणि रोम 12:2यात त्याचा निर्देश/अर्थ असा : आंतरिक बदल/रूपांतर जे बाह्यरूपाने (बाहेरून) प्रकट होते (दिसते). ख्रिस्तांच्या बाबतीत ते असे आहे : बाह्यरूपात झालेला बदल जो त्यानुसार होता जे ख्रिस्त आंतरिक रीतिने होते. परंतु विश्वासीच्या बाबतीत हा आंतरिक व बाह्य या दोन्हीं प्रकारचा बदल आहे जो प्रथम आंतरिकरित्या घडतो व नंतर बाह्यरीतिने होतो, आणि ही 'हळूहळू-सावकाश' घडणारी प्रक्रिया आहे - 'महिमेपासून महिमेपर्यंत' तुलना स्तो 84:7; नीति 4:18.येथे आणि आता, परमेश्वर त्यांना अधिकाधिक ख्रिस्तानुरूप असे घडवीत आहे. सरतेशेवटी, ख्रिस्तांच्या आगमनासमयी, विश्वासीं संपूर्णतः त्यांच्यासारखे होतील (रोम 8:29; 1 योहान 3:1-2). ही प्रक्रिया कदाचित इतकी सावकाश आहे की विश्वासीला विश्वास करणे कठीण जाईल, की बदल घडतो आहे की नाही, किंवा घडतच नाहीये!! परंतु हा बदल परमेश्वराच्या प्रत्येक खऱ्या व सात्विक लेकरासाठी होतोच आहे, दिसो अथवा न दिसो.

[1] *म्हणून ज्या अर्थी आमच्यावर अशी दया (कृपा) झाली, की आम्हांला ही सेवा मिळाली त्या अर्थी आम्ही पराभव मानत नाही,
[2] *पण आम्ही आपली लाजिरवाणी रहस्यमय (लपलेली) कार्ये त्यागून टाकली आहेत. आम्ही ना चलाखीने (कपट) जगतो, ना
परमेश्वरी वचनांमध्ये काही भेसळ करतो परंतु वचन 'निर्भेळ' असेच सर्वांसमोर सादर करतो. [3] *आणि आम्ही सत्य पुढे ठेवून
(सच्चेपणाने), परमेश्वरासमक्ष (उपस्थितीत) प्रत्येक मनुष्याच्या विवेकाठायी आपले चांगुलपण ठसवितो, पण जर आमच्या सुवार्तेवर
पडदा आहे तर तो नष्ट होणाऱ्या लोकांमुळेच आहे; [4] अर्थात विश्वास न ठेवणाऱ्या त्या लोकांसाठी ज्यांची बुद्धि या जगाच्या ईश्वराने*
आंधळी करून टाकली* आहे, ती यासाठीच की मशीहा जे परमेश्वराचे प्रतिरूप* (प्रतिमा) आहेत, त्या ख्रिस्तांच्या तेजोमय
(प्रकाशमय) वार्तेचा प्रकाश* त्यांच्यावर चमकू नये*. [5] *कारण आम्ही आपला नव्हे तर येशू ख्रिस्तांचा संदेश देतो की ते प्रभू आहेत.
तसेच आम्ही आपल्याविषयी घोषित (सांगतो) करितो की आम्ही येशू ख्रिस्तांप्रीत्यर्थ तुमचे सेवक आहोत. [6] *कारण परमेश्वर आहे

---

***4:1** नवीन करारांतर्गत परमेश्वराच्या सर्व सेवकांना अशी प्रभू -सेवा मिळालेली आहे जी महिमेने थबथबलेली व संपूर्णतः पुरेपूर अशी आहे, आणि जी मोशेच्या सेवेपेक्षा (याजकपणा) कितीतरी श्रेष्ठ आहे (3:9). परमेश्वराचे सेवक नियम व कायद्यांचे सेवक नाहीत जे दोषी ठरवितात, परंतु ते परमेश्वराच्या कृपेचे (व अनुग्रहाचे) सेवक आहेत जी त्यांचे तारण करते, त्यांची सुटका करते, त्यांना अपराधी ठरवीत नाही. त्यांनी ही सेवा प्रभूच्या कृपेद्वारे प्राप्त केली आहे, आपल्या वैयक्तिक गुणवत्तेच्या बळावर नाही. (1 करिं 15:10; 1 तीम 1:13-14). याच कारणास्तव पौल म्हणतो की कितीही समस्या, धोके आणि अडचणींना सामोरे जावे लागले तरी तो निराश होण्यास नकारच देईल. (वचन 16. तुलना 1 करिं 15:58; लूक 18:1).

***4:2** हा 1:12; 2:17.पौल आपल्या एकात्मतेविषयी आणि प्रामाणिकतेविषयी भर देत राहिला कारण, करिंथाच्या काही लोकांनी ते अमान्य केले होते; त्याला ही गोष्ट ठाऊक होती की जर करिंथातील चर्चने त्याच्या प्रेषितपणाविषयी असलेला त्यांचा विश्वास गमाविला तर त्यांचे किती मोठे नुकसान होईल.

***4:3** हा 3:14-16.येथे पौल फक्त यहूदी अविश्वासीविषयीच बोलत नाहीये पण प्रत्येक देशात जे लोक ख्रिस्तांवर विश्वास ठेवत नाहीत, त्याच्याविषयी देखील बोलतो आहे.

***4:4** *"या जगाच्या ईश्वराने"*- म्हणजे सैतानाने. तुलना योहान 12:31; 16:11.त्याला "देव" - या सर्व कारणांसाठी म्हटलेले आहे : त्याला लोकांनी फक्त त्याच्यासाठीचीच भक्ति व उपासना केलेली हवी, ती भक्ति तो स्वीाकार करतो कारण तो आपल्या अंधाराच्या साम्राज्यात आणि परिसीमेत शासन चालवितो म्हणून. (इफि 6:12). नोट्स - सैतान 1 इति 21:1; मत्त 4:1-10; योहान 8:44.

* *"बुद्धि ...टाकली"*- म्हणजे, सैतान लोकांना परमेश्वराचे सत्य समजून घेणे अशक्य करतो; त्यांनी आतंरिक प्रकाश प्राप्त करून घेऊ नये म्हणून त्यांना त्यापासून दूर ठेवीतो. होय, ही गोष्टी खरी आहे की लोक त्याला स्वच्छेने तसे करावयास मदत करतात (योहान 3:19-20; 2 थेस्स 2:10-11).

* *"परमेश्वराचे प्रतिरूप"*- इब्री 1:3; फिलि 2:6; कल 1:15; 2:9; योहान 1:14,18; 12:45; 14:9.येशू अदृश्य परमेश्वराचे "दृश्य स्वरूप" आहे.

* *"ख्रिस्तांच्या ...मुक्तिवार्तेचा प्रकाश"*- येशूवार्ता परमेश्वराच्या महिमेचे प्रकटीकरण करीत असते (दर्शविते), तसेच ती परमेश्वराच्या अभिषिक्ताचे अर्थात प्रभू येशूंचेही गौरव दर्शविते (योहान 12:23).

* *"त्यांच्यावर चमकू नये"*- याचे भाषांतर असे देखील करीता येते, "त्यांना पाहता येऊ नये" - "त्यांना दिसू नये".

***4:5** या पत्रात पौल, त्याच्या प्रेषितपणाच्या पदाविरूद्ध होणाऱ्या आक्रमणाविरूद्ध आपला बचाव पक्ष मांडण्यासाठी स्वतःविषयी पुष्कळ काही बोलतो; परंतु ते सर्व काही त्याच्या स्वतःसाठी नव्हे तर त्यांच्यासाठीचेच होते (नोट्स 1:12-24). स्वतःला "उद्धाराचा मार्ग" असे उल्लेखून त्याने स्वतःचा प्रचार केला नाही. त्याने मुक्तिवार्तेचा आविष्कार केलेला नव्हताच. स्वतःला तो "मी कोणीतरी थोर" असे समजतच नव्हता, तो फक्त ख्रिस्तांसाठी दुसऱ्या लोकांचा सेवक होता. (1 करिं 3:5-7; 9:19-23). त्यांच्यापेक्षा अधिक अतुलनीय असा एक होता, ज्यांच्याविषयी त्याला प्रचार करावयाचा होता - अर्थात येशू ख्रिस्त, आणि त्याच प्रभू येशूंविषयी घोषणा केली की केवळ प्रभू येशू ख्रिस्तच स्वर्ग व पृथ्वीचे एकमेव प्रभू (स्वामी) आहेत. तुलना लूक 2:11; रोम 10:9; 1 करिं 8:6; 12:3; प्रेषि 2:36; फिलि 2:10-11.

***4:6** पौल येथे भौतिक प्रकाशाच्या आरंभाविषयीची तुलना (पाहा उत्प 1:1-3) आतंरिक प्रकाशाशी करतो, जी ख्रिस्तांठायी विश्वासींच्या अंतःकरणात परमेश्वर चमकू देतो. परमेश्वर त्यांचे ज्ञान-चक्षु (बौद्धिक डोळे) उघडितो, जेणेकरून त्यांनी सत्याची समज (ज्ञान) ग्रहण (स्वीकार) करून घ्यावी. त्यापूर्वी (आधी) त्यांचे अंतःकरण, इतर प्रत्येकाप्रमाणे अंधारात व गोंधळलेल्या दशेत होते - तुलना इफि 1:18; प्रेषि 26:18; योहान 8:12; मत्त 6:22-23; 11:27; 16:17; 1 करिं 2:11-16. मनुष्यांना कळणे (समजणे) की ते स्वतः ईश्वर आहेत - अशा चुकीच्या शिकवणीचा, त्याच्याशी काहीही संबंध नाहीच मुळी. ही शिकवण, सैतानाने उत्पन्न केलेला एक भयंकर धोका आहे. मनुष्य (लोक) ईश्वर नाहीत, ईश्वर होऊच शकत नाहीत, आणि जर ते असाच विचार करतात की ते देव आहेत,

ज्याने स्वतः म्हटले, “अंधारात प्रकाश होवो”. त्यानेच हा प्रकाश आमच्या अंतःकरणात प्रखर चमकविलेला आहे की प्रभू येशूंच्या चेहऱ्यावर.* असलेले परमेश्वराचे व्यक्तित्व (स्वभाव आणि चरित्र) किंवा व्यक्ति वैशिष्ट्य आम्हांला पाहता यावे.

7 आपल्याजवळ हा खजिना.* मातीच्या भांड्यात.* (पात्रात) आहे या हेतूने, की अनन्यसाधारण व पराकोटीचे हे सामर्थ्य परमेश्वराचे (पासून) आहे आणि आम्ही याचे स्त्रोत नाही हे सर्वांना नीटसे कळावे. 8 *आम्ही चाऱ्हीबाजूंनी (सगळीकडून) छळ सहन करीत आहोत तरीही आम्ही चिरडलो नाहीत. घोटाळ्यात पडलो, तरी गोंधळून जाऊन मनाने खचलो (निराश) नाही. 9 आम्ही छळले तर जातो आहोत पण परित्यागिले (सोडून दिले) जात नाही. खाली पाडले जातो आहोत पण नष्ट झालो नाहीत; 10 ज्या प्रकारे येशूंचा वध झाला, त्याच प्रकारे प्रत्येक समयी आम्ही मारले जाण्याच्या धोक्यात वावरत असतो, त्याचे कारण हेच की त्याद्वारे येशूंचे (जे जिवंत उठले) जीवन आमच्या देहाद्वारे प्रगट व्हावे (प्रत्येक वेळी दृष्टीस पडावे). 11 जिवंत असतानाही आम्ही येशूंप्रीत्यर्थ सर्वदाच मरणाच्या हाती सोपविले जात असतो, यासाठी की येशूंचे जीवन आमच्या मरणशील देहात प्रगट व्हावे (होत जावे). 12 आम्ही जिवंतपणीही मरणाला.* तोंड देत असतो आणि त्यामुळे तुम्हां सर्वांना आध्यात्मिक लाभ होत असतो .

---

तर ते एका खूपच गंभीर धोक्यात/गैरसमजात पडलेले आहे. आता पाहा, की हा प्रखर प्रकाश काय आहे! सत्य प्रकाशनात, परमेश्वर लोकांना समजू व कळू देतो की, येशूंच्याठायीच परमेश्वराचे गौरव वसलेले आहे, त्याच्या स्वतःत नाही. (इब्री 1:3). दिमिष्काच्या मार्गावरून जातांना, पौलाला या प्रकाशनाचा अनुभव आलेला होता (प्रेषि 9:3-9). आपल्यापैकी पुष्कळांना असा उत्कंठित करून छाप पाडणारा आणि एकाएकी /अचानक घडून येणारा अनुभव येत नसतो, परंतु काही हरकत नाही, कारण प्रत्येक विश्वासीने आतंरिक दृष्टि आणि प्रकाश प्राप्त केलेला आहे आणि विश्वासीं प्रकाशाचे संतान आहेत, ही बाब 100% खरी आहे (योहान 12:36; इफि 5:8; 1 थेस्स 5:5).

* *“चेहऱ्यावर”*- तुलना 3:13.जुन्या कराराच्या गौरवाचे प्रतिक जे मोशेच्या चेहऱ्यावरील तेजाच्या रूपात होते ते मावळत (फिके) चालले होते, नव्हे नाहीसे होत होते. प्रभू येशू ख्रिस्त जे नवीन कराराचे संस्थापक आहे त्यांचे गौरव कधीही मावळणार नाही किंवा नाहीसे होणार नाही.

* **4:7** *“खजिना”*- ख्रिस्त येशूंठायी असलेल्या परमेश्वरी गौरवाचे ज्ञान ओळखून ते बाळगणे हाच सर्वोत्तम व श्रेष्ठतम खजिना आहे. तुलना स्तो 19:10; 119:72,127; नीति 2:1-5.याठिकाणी पौलाचा अर्थ असा देखील असू शकतो : सुवार्तेची सेवा जी त्याच्या हवाली केलेली आहे, त्याला सोपविलेली आहे त्या दृष्टीने सुद्धा ही एक गौरवपूर्ण बाब होती (इफि 3:8).

* *“मातीच्या ... भांड्यात”*- त्याला असे म्हणावयाचे आहे : अशक्त, दुबळा मानवी स्वभाव, शरीर, प्राण आणि व्यक्तींचा आत्मा ही सर्व एखाद्या मातीच्या पात्रांसारखी आहेत. हा खजिना खचितच अतिशय प्रचंड आहे, पण ज्या पात्रांत तो भरलेला आहे ती पात्रें अतिशय दुर्बळ, कमजोर व अशक्त आणि तुलनात्मक रीतिने काहीही आकर्षण नसणारी अशी आहेत. यावरून दिसते की, हा खजिना सर्वांना देण्याचे सामर्थ्य आणि ती सेवा यशस्वी होणे शक्य करू शकणारे नवीन कराराचे सेवक , या सर्वगोष्टी म्हणजे थोडक्यात म्हटले तर परमेश्वराचे सामर्थ्य आहे - तुलना प्रेषि 1:4-5,8.

* **4:8-12** या वचनांत पौल “मातीच्या भांड्यांची” दुर्बलता व कमजोरी दाखवितो - अर्थात “कडक रीतिने दाबून तयार केलेले” “पेचांत पडलेले”, “छळ झालेले” “हाणले-मारले गेलेले” “मरण समोर असलेले” असे. पण पौल एवढयावरच न थांबता त्याच्याठायी कार्यशील असणारे “परमेश्वराचे सामर्थ्य” अर्थात “चिरडून न गेलेले”, “मनाने न खचलेले”, “नष्ट न झालेले” वगैरे म्हणतो. जर परमेश्वराचे सामर्थ्य या “मातीच्या भांड्यांत” कार्य करीत राहिले नव्हते, तर ही “मातीची पात्रें” आपली सेवा, आपले कार्य पूर्ण करू शकण्यास समर्थ झाली नसती, किंबहुना त्यांना ते शक्यच झाले नसते आणि ही मातीची भांडी खात्रीने लवकरच नष्ट झाली असती.

* **4:12** *“मरणाला”*- पाहा 1:8-9.पौलाने जे दुःख, त्रास, पीडा व छळ सोसला अगदी तसेच सर्व काही प्रभू येशूंनी सहन केले होते. पौलाने ज्या कष्टांना तोंड दिले ते “येशूंप्रीत्यर्थ” होते. (वचन 11) - खरोखर, ते स्वतः येशू ख्रिस्तांचे मरणच होते”. पौलासाठी जणू काही ही सततची संकटें आणि समस्याच होती (11:23-27), स्वमरण होते (तुलना मत्त 10:38-39; लूक 9:23); आणि फक्त ख्रिस्तांसाठी जगणे (जिवंत असणे) (गल 2:20) असेच होते. वैयक्तिक योजना आणि महत्वाकांक्षा, त्याच्या स्वतःच्या आवडी-निवडी, सुखविलास, चैन-आराम या सर्वांचे त्याच्या हृदयात कोणतेही स्थान नव्हते, अगदी जसे त्याच्या स्वामींच्या अर्थात प्रभू येशूंच्या हृदयात या सर्व गोष्टींना काही प्राधान्य नव्हते तसे. पौलाला कळले होते की हाच जीवनाचा मार्ग होता, आतंरिक जीवन होते.ते येशूंचे जीवन होते जे त्याच्या जीवनात क्रियाशील होते (वचन 11). ज्याप्रमाणे करिंथातील विश्वासींकरता आतंरिक जीवन उपलब्ध होऊ शकले तसेच इतरांसाठी ते होऊ शकते असाही त्याचा अर्थ होता (वचन 12). हा त्या सर्व लोकांसाठी एक सत्य सिद्धांत आहे जे स्वमरणाची इच्छा बाळगून इतरांसाठी, आतंरिक जीवनाचा प्रवाह व्हावयास, तयार असतात. पाहा योहान 12:24-26.जे अशा सत्य-सैद्धांतिक जीवनासाठी तयार नसतात, त्यांना ‘यश’ नांवाची चीज मिळू शकते, पण परमेश्वराच्या दृष्टीत मात्र

[13] *कारण आमच्यात तोच विश्वासाचा आत्मा आहे ज्याविषयी लिहिले आहे, ‘मी विश्वास ठेवला, म्हणून मी बोललो’ यास्तव आम्ही देखील विश्वास ठेवतो म्हणूनच बोलतोही. [14] कारण आम्हांला ठाऊक आहे आणि कळून चुकले आहे की ज्याने प्रभू येशूंना मरणातून जिवंत उठविले तोच परमेश्वर आम्हांलाही येशूंमधे उठवील, तो आम्हांला तुमच्याबरोबर आपल्या उपस्थितीत उभा राहू देईल. [15] *सर्व काही तुमच्या फायद्यासाठीचेच आहे. जसजसा परमेश्वराचा अनुग्रह पुष्कळ लोकांपर्यंत पोचविला जातो आहे,तसतसा आभार देखील वृद्धींगत (बढती होणे) होत जातो आहे, अशा प्रकारे परमेश्वराचा महिमा अपरंपार वाढत जातो.

[16] *हेच कारण आहे ज्यामुळे आम्ही हताश होऊन मनाने खचत नाही*. आमचा देह कमजोर होत जातो आहे, तरीही आमचे आंतरिक जीवन (मनुष्यत्व) प्रत्येक दिवशी नवे (मजबूत) होत जाते आहे*. [17] कारण आमचा क्षणभराचा* (क्षणिक) अल्पसा छळ (दुःख)* आमच्यासाठी अत्यंत आवश्यक आणि सार्वकालिक महिमा (वैभव, आदर, अधिकार) उत्पन्न करीत जातो*. [18] *कारण आम्ही दिसणाऱ्या (आढळणाऱ्या) गोष्टींवर नव्हे, पण जे दिसत नाही त्यावर आपले लक्ष केंद्रित करितो आहोत, कारण दृश्य गोष्टी क्षणिक (अल्प समयासाठीच्या) आहेत, आणि जे अदृश्य आहे व दिसत नाहीये ते सार्वकालिक आहे.

---

ते यश नसणारच (अपयश असणार).

***4:13-14** स्तो 116:10.या संकटांना-धोक्यांना व समस्यांना तोंड देत, ख्रिस्तांच्या सेवेसाठी पुढे-पुढे जाणे, कोणत्या कारणामुळे पौलाला शक्य झाले होते? परमेश्वरावर त्याचा विश्वास होता, म्हणून तो शांत व गप्प राहू शकला नाही; त्याला एका ‘आशीर्वादित - धन्य’ भविष्याची खात्री होती. भविष्यकाळी होणारे, विश्वासींचे पुनरूत्थान’ ही एक महान आशा होती जी त्याला पुढे जाण्यास साहाय्य करीत होती (रोम 8:23-25; 1 करिं 15:49-58).

***4:15** पौलाचे ‘दुःख सहन’ ‘वाईट अनुभव’ हे सर्व काही विश्वासींच्या (दुसऱ्यांच्या) फायद्यांसाठीचेच होते. आणि तेच करण्याची त्याची इच्छा होती - कल 1:24; 1 करिं 10:33; 2 तीम 2:10.परमेश्वराच्या ज्या सेवकाची ही वृत्ति व असा दृष्टीकोन आहे, त्याला यापासून किती मदत होईल! आणि दुसऱ्यांसाठी तो किती महान आशीर्वाद असेल! पुन्हा, पौलाला असलेली आभार प्रदर्शनाची कळकळ पाहा, जी केवळ परमेश्वरासाठीचीच आहे (त्याच्यासाठीची नाही) 1:11; 9:11-13.

***4:16** या अध्यायाच्या अंतर्गत असलेले काही महत्वाचे शीर्षक (विषय) :

* *“खचत नाही”*- हताश होत नाही -वचन 1.

* *“नवे...आहे”*- वचन 7-12.(आंतरिक बलवंत जीवन) जीवन प्रगट व्हावे - वचन 10,11. प्रत्येक दिवशी तो मरणाचा सामना करीत होता (1 करिं 15:31), पण परमेश्वराने त्याला दरदिवशी जीवन दिले.

* *“क्षणभराचा”*- पौलाच्या संकटांची सुरवात त्याच्या पालटानंतर झाली आणि अनेक वर्षे कायम राहून, त्याच्या मरणापर्यंत राहिली. पण पौलाच्या दृष्टीने अनंतकाळातील सार्वकालिक महिमेशी त्यांची तुलना केली तर ती संकटें-छळ-समस्या “एखाद्या लहानशा क्षणासारखीच” होती. हाच आपला देखील दृष्टिकोन असावा.

***4:17** *“छळ (दुःख)”*- त्याचे कष्ट व समस्येकडे लक्ष द्या - वचन 8-10; 1:8; 11:23-27. पौल त्यांना “क्षण भराचा” असे म्हणतो! त्याचा अर्थ असा आहे की भविष्यातील महिमा-(वैभव-आदर व अधिकार) यांच्या तुलनेत ही सर्व समस्या व छळ काहीही नाही, तो हलका आहे. प्रियजनहो, तर मग आपल्या जीवनातील लहान-सहान, क्षुल्लक व कमी महत्वाच्या समस्यांविषयी आपण काय म्हणू? आपण स्वतःची कीव करून, तक्रार करीत राहू काय? मुळीच नाही पण केवळ तेव्हा जर पौलासारखी समज आपण बाळगत असू.

* *“उत्पन्न करीत जातो”*- ख्रिस्तांसाठी सहन केलेली दुःखे, खरे पाहता, अनंतकालिक लाभासाठीच कार्य करीत असतात, जो विश्वासी ती सहन करीत जातो त्याचा लाभच होणार असतो (भविष्यात). विश्वासी भविष्यात जे गौरव प्राप्त करणार आहेत ते उत्पन्न करण्यासाठी हा छळ मदत करीत असतो. तुलना रोम 8:17-18,28.

***4:18** हेच कारण होते ज्यामुळे पौल त्यात टिकाव धरून राहू शकला; त्याला सर्व गोष्टी क्षणिक आणि हलक्या वाटल्या, त्याच्या दृष्टीत त्या अशा नव्हत्याच ज्यामुळे एखाद्याने विचलीत होऊन जावे! परंतु जे अदृश्य आहे, त्यावर आपण आपले डोळे (दृष्टि) कसे केंद्रित करू शकतो? ते शक्य होते केवळ त्या आतंरिक ज्ञानामुळे (समज) जे परमेश्वर आपल्याला देतो (वचन 6) आणि फक्त विश्वासाद्वारेच जे दिसत नाही (अदृश्य) ते: अर्थात प्रभूच्या अनंतकालिक बाबी वास्तविक होत जातात (इब्री 11:1). 5:7यांत पौल हीच गोष्ट वेगळया शब्दांनी व्यक्त करतो. आपल्या भौतिक डोळयांनी आपण जग, आपले कष्ट आणि समस्या पाहू शकतो. आपल्या ‘विश्वासाच्या डोळयांनी आणि आतंरिक ज्ञानाने’ आपण येशू ख्रिस्तांच्या चेहऱ्याकडे लक्ष लावू शकतो (4:6) आणि अर्थातच अनंतकाळाकडेही, आणि आपली दृष्टि अदृश्य गोष्टींकडे व अनंतकालिक गोष्टींकडे लावून जेव्हा आपण जगत असतो, त्या आपल्या पृथ्वीवरच्या जीवनावर निश्चितच मोठा प्रभाव पाडतील.

# 5

1 *आम्हांला ठाऊक आहे* की आमचा तंबूरूपी* हा देह, जसा उभारलेला तंबू खाली काढून लपेटतात तसाच लपेटून ठेवला
जाईल. आपल्याला परमेश्वराकडून एक नवे घर (देह) मिळेल, एक असे घर जे हातांनी बांधलेले नसणार, पण ते अनंतकालिक घर
असणार. 2 या वर्तमान देहरूपी तंबूत आपण कण्हतो* आणि स्वर्गिक घर (वस्त्र) परिधान* (नेसणे) करण्याची लालसा उत्कंठेने
बाळगतो, 3 *आपण स्वर्गिक देह निश्चित परिधान करूच व आपण केवळ देहावांचून आत्मा असे असणार नाही. 4 *या देहात आपण
ओझ्यांमुळे कण्हत असतो. परिधान केलेला हा देह काढून टाकता यावा म्हणून आम्हांला मरावयाची इच्छा आहे असे नाही, पण
यासाठी की आम्ही हा नेसलेला देह काढून आम्हांला आपला नवीन देह परिधान करावयाची तीव्र इच्छा आहे, जेणेकरून हा
मरणशील देह अमरत्वाने गिळंकृत करून टाकावा. 5 *या हेतूसाठी ज्याने आम्हांला सिद्ध केले तो परमेश्वर आहे. त्यानेच आम्हांला
आपला पवित्रात्मा विसार म्हणून देऊ केला आहे.
6 *यास्तव आम्ही सदैव निर्भय असतो. आम्हांला ठाऊक आहे की या पृथ्वीवर जिवंत आहोत तोवर आम्ही (जिवंत उठलेल्या)

---

***5:1-10** ता पौल अनंत अदृश्य वस्तूंपैकी काहींविषयी येथे बोलतो आहे - 4:18 एक अनंतकालिक घर (वचनें 1-4), प्रभूच्या सानिध्यात निरंतर राहणे - (वचन 8), आणि शेवटचा न्याय व मिळणारी बक्षिसें (वचन 10). या सर्वांवर त्याने आपली दृष्टि केंद्रित केली होती.

***5:1** *“आम्हांला ठाऊक आहे”*- पौल ज्याविषयी बोलतो तो त्याने लावलेला अंदाज नाहीये, परमेश्वराच्या सत्याच्या प्रकाशनावर आधारलेले ते एक ज्ञान आहे.

**“आमचा तंबूरूपी”*- त्याद्वारे पौलाला असे म्हणावयाचे आहे की आपले “भौतिक शरीर” (वचन 4). येशूंच्या आगमनापूर्वी जर मरण आले तर, भौतिक देह मरण पावेल (1 करिं 15:51-52). पण परमेश्वराकडून आपल्याला मिळणारे एक नवीन घर, 'अनंतकालिक घर' म्हणजे त्याचा अर्थ आहे तरी काय? या अर्थाविषयी लोकांमध्ये मतभेद व असहमति आहे. कदाचित तो 'पित्याचे घर' याकडे इशारा करतो - योहान 14:2पाहा. इब्री 11:10; 13:14; प्रकटी 21:10-27; लूक 16:9किंवा पौलाच्या मतें, पुनरूत्थित (जिवंत उठलेले) शरीर असावे, जे येशूंच्या आगमनावर विश्वासींना मिळेल (1 करिं 15:35-53). जर ‘तंबू’ आपले वर्तमान शरीर आहे तर ‘घर’ म्हणजे भविष्यकाळातील शरीर असा अर्थ होऊ शकण्याची शक्यता आहे, जे तंबूसारखे अस्थायी नाही.

***5:2** *“कण्हतो”*- पाहा रोम 8:23.तेथे त्याचा अर्थ “मुक्तिची वाट पाहत देहाची सुटका होण्यासाठी” असलेले कव्हणे आहे. तर पौलाचा तोच अर्थ येथे देखील असावा.

**“परिधान”*- म्हणजे व्यक्तीच्या देहावर काहीतरी घालणे किंवा त्याच्या आत्म्याला काहीतरी नेसविणे;

***5:3** येथे ‘देहावांचून आत्मा’ असा याद्वारे संकेत केल्यासारखे वाटतो.

***5:4** येथे असे वाटते की त्याचा अर्थ हा आहे : विश्वासी वर्तमान देहाच्या सुटकेकरता कव्हतो नाहीत, पण एक नवीन शरीर परिधान करावयाची त्यांची इच्छा असते म्हणून ते कव्हतात. शब्द ‘परिधान’ आणि ‘मरणशील देहाला अमरत्वाने गिळून टाकावे’ पौलाची ही भाषा 1 करिं 15:54प्रमाणेच आहे जेथे तो जिवंत उठलेल्या शरीराविषयी बोलतो.

***5:5** विश्वासी परमेश्वराच्या हातांची रचना/निर्मिती आहे, एक नवीन सृष्टि (वचन 17; इफि 2:10). एक स्वर्गीक “घर” देण्याच्या हेतूनेच त्याने आपल्याला निर्माण केले (वचन 2) अनंतकालिक घर जे स्वर्गात आहे - पाहा योहान 6:39-40.“विसार” किंवा “बयाणा” किंवा “ठेव” किंवा गॅरंटी-शाश्वती”. मूळतः त्याचा अर्थ आवश्यक धन - सुरवातीला दिलेला मूल्याचा थोडा भाग, जो पूर्ण रकमेचा एक भाग असतो; त्यानंतर पुढे पूर्ण रकम दिली जाते. पाहा 1:22; इफि 1:14.हा ‘बयाणा’ आहे, जो परमेश्वर प्रत्येक विश्वासीला देतो, जो दर्शवितो की तो त्याच्या सर्व प्रतिज्ञा व अभिवचनें विश्वासींकरता पूर्ण करेल, आणि त्यांना आपला भविष्यातील स्वर्गीक वारसा देईल. परमेश्वर आपले मन बदलेल असा विचार करण्याचे आपल्याला काहीही कारण नाही, तो विचार बदलणार नाही आणि आपली प्रतिज्ञा मागे घेणार नाही. जर त्याने आपल्याला, आपला स्वतःचा आत्मा दिला आहे, तर भविष्यातील आशीर्वाद व त्याविषयीच्या प्रतिज्ञा देखील, तो पूर्ण केल्यावांचून राहणार नाही.

***5:6-8** पौलाचा आत्मविश्वास आणि ज्ञान परमेश्वराच्या प्रकाशनाचा परिणाम होते. तुलना 1 करिं 2:9-16.या वचनात पौलाला असे म्हणावयाचे नाहीये की जेव्हा आपण या पृथ्वीवर वास्तव्य करीत असतो तेव्हा आपल्या शरीरात असतो, त्या वेळी परमेश्वर आपल्याबरोबर राहत नाहीत/नसतो आपल्याला ठाऊक आहे की तो सर्व विश्वासींबरोबर असतो - 13:5; मत्त 28:20; योहान 17:20-23.परंतु तरीही विश्वासीं अद्यापही प्रभूबरोबर, खऱ्या अर्थाने नाहीत - अर्थात “स्वर्गातील त्याच्या निरंतरच्या पवित्र उपस्थितीत.” पौल म्हणतो की जेव्हा त्यांना(ख्रीस्तींना) मरण येते तेव्हा ते परमेश्वराच्या उपस्थितीत खऱ्या अर्थाने जातात. पाहा फिलि 1:23-24.तुलना लूक 23:43; योहान 17:24.

येशूंबरोबर नाही. 7 *दिसत नसतानाही आम्ही फक्त विश्वास ठेवूनच जिवंत आहोत. 8 आम्ही प्रचंड उत्साहाने भरलेले आहोत आणि आमची हार्दिक इच्छा हीच आहे, की या देहापासून आम्ही मुक्त व्हावे आणि प्रभूबरोबरच (सानिध्यात) निरंतर रहावे. 9 *आम्ही या देहात वास करीत असू किंवा नसू, वैशिष्ट्यपूर्ण (खास) बाब हीच आहे- 'प्रभूला प्रसन्न करणे. त्याला संतुष्टि देणे.' 10 *आपण सगळेच एके दिवशी प्रभू येशूंच्या न्याय राजासनासमोर उभे राहू व देहाने केलेल्या चांगल्या वाईट कृत्यांचा हिशेब आपण त्यांना देऊ.

11 आम्हांला नीट कळते आणि पूरेपूर ठाऊक आहे की प्रभू भयांत* जगणे म्हणजे नेमके काय आहे! म्हणूनच आम्ही लोकांसमक्ष सत्य सादर करितो; आमच्या अंतःकरणात दडलेला हेतू काय आहे त्याविषयी तुम्हांला व परमेश्वराला ठळक व स्पष्टपणे ठाऊक आहे. 12 *असे बोलून आम्ही तुमची वाहवाही (प्रशंसा) किंवा शाबासकीची अपेक्षा करीत नाहीये, पण आमची मनीषा आहे की तुम्ही सर्वांनी आमचा अभिमान बाळगावा, म्हणजे असे होईल की जे हृदयाच्या आंतरिक गोष्टींऐवजी बाह्य गोष्टींवर अभिमान बाळगून दुसऱ्यांवर छाप पाडण्यासाठी आपले अंतःकरण त्याकडे लावतात, या अशा प्रकारच्या लोकांना तुम्हांला उत्तर देता यावे आणि हीच तर आमची इच्छा आहे. 13 *जर आम्ही प्रचंड उत्साह व आवेशाने जोशीले होतो आहोत तर ते परमेश्वरासाठीच आहे, जर आमचे मन भानावर आहे तर त्यामुळे तुमचाच फायदा आहे. 14 *ख्रिस्तांचे प्रेम आम्हांला भाग पाडते*, व आम्ही या गोष्टीविषयी आश्वस्त

---

***5:7*** हा 4:18.

***5:9*** विश्वासी परमेश्वराच्या उपस्थितीत प्रवेश करणार आहे, आणि ख्रिस्तांबरोबर सदैव राहणार आहे म्हणून त्याचा गाढ प्रभाव त्याच्या पृथ्वीवरील जीवनशैलीवर पडावयासच हवा आहे. पौल म्हणतो की त्याचा प्रभाव त्याच्या स्वतःच्या वैयक्तिक जीवन शैलीवर, जगण्याच्या पद्धतीवर खोलवर पडलेला आहे. तो जिवंत असो किंवा मेलेला, सर्व वस्तूंच्या/गोष्टींच्या/गरजांच्यावर, त्याला फक्त इतकेच हवे आहे की त्याने कोणत्याही दशेत केवळ प्रभूला प्रसन्न करावे, ख्रिस्तांना मात्र संतुष्टीच द्यावी. जे ख्रिस्त येशूंना प्रसन्न करतात, त्यांच्या जीवनाचा हेतू व लक्ष्य स्वतःला संतुष्ट करण्याचा नसतो, ते केवळ ख्रिस्तांच्या महिमेसाठी आणि इतरांच्या हित्तासाठीच जिवंत असतात. तुलना वचन 15; 1 करिं 9:19-23; 10:31.जे विश्वासीं ख्रिस्तांच्या प्रसन्नतेसाठी जगत नाहीत, ते खरे ख्रिस्त सेवक नाहीतच.

***5:10*** रोम 14:10-12; 2:6; 1 करिं 3:13-15.विश्वासींना आपल्या सर्व कार्यांच्या मोबदल्यात बक्षिसे मिळतील, जी कार्ये बक्षिसें मिळण्याजोगी असतील, ती स्वीकारली जातील आणि जी कार्ये ख्रिस्तांसाठी बक्षिसायोग्य नसतील, ती स्वीकार केली जाणार नाहीत.

***5:11*** *"प्रभू भयांत"*- पौल म्हणतो आदरयुक्त (आदरमय) भय. पाहा रोम 3:18; उत्प 20:11; स्तो 34:11-14; 111:10; नीति 1:7.त्याच्या अंतःकरणात भविष्यकाळी येणाऱ्या न्यायाशी संबंधित विचार ठळक व स्पष्टपणे येत होते. त्याच्या ख्रिस्तीसेवेचे हे एक सामर्थ्ययुक्त लक्ष्य होते.

***5:12*** :12-14; 3:1-3. या वचनात तो पुन्हा एकदा आपल्या सेवेच्या विरोधकांचा उल्लेख करतो जे करिंथात राहात होते (11:13-15). तेथील विश्वासींनी पौलाचा अभिमान बाळगावा असे त्याला हवे होते - म्हणजे हा,की तो एक खरा व सात्विक प्रेषित आहे, याची त्यांना खात्री असावयास हवी होती. तो परमेश्वराच्या सत्याचे शिक्षण देणारा शिक्षक आहे, याविषयी त्यांच्या मनात शंका नव्हे तर निश्चिंती असावी. कारण तेव्हाच करिंथातील लोक खोट्या शिक्षकांना प्रत्युत्तर (योग्य ठाम उत्तर) देऊ शकतील जे केवळ बाह्य गोष्टींवरचा अभिमान बाळगून फुगत असतात.

***5:13*** पौलाचे विरोधक त्याला 'मूर्ख-वेडपट'डोके फिरलेला असे म्हणत होते काय? तेथील विश्वासींना असे वाटत होते काय, की कधी कधी तो अस्वाभाविकपणे आणि नेहमीपेक्षा वेगळा वागत असे? (तुलना मार्क 3:21; प्रेषि 26:24; 1 करिं 4:10). पौल म्हणतो की, तो जे काही होता, त्याचे वागणे त्यांना कसेही वाटत असले, तरी ते सर्व काही केवळ परमेश्वरासाठी आणि त्यांच्यासाठीचेच होते, त्याच्या स्वतःसाठी नव्हतेच मुळी. तुलना योहान 2:17.

***5:14*** वचन 11 यात त्याचे जे लक्ष्य व जो हेतू होता त्याहून कितीतरी व्यापक व श्रेष्ठ असे , त्याच्या सेवेचे लक्ष्य काय होते? ते आपण पाहू शकतो!!! हे कसे शक्य आहे की पौल सर्व काही (एकूण एक कार्य) परमेश्वरासाठी आणि इतरांच्या चांगुलपणासाठी, कल्याणासाठी व हितासाठीच करू शकला? प्रियजनहो, होय त्याचे उत्तर आपल्याला रोम 5:5यांत सापडते - 'परमेश्वराच्या प्रेमाचे ज्ञान', त्या परमेश्वरी प्रेमाचा त्याच्या हृदयाला आलेला अनुभव, त्याला भाग पाडणारे, एक बंधनकारक बल होते, प्रेरणा होती ज्यामुळे पौल परमेश्वराची सेवा करावयास प्रेरित झाला होता. (लूक 12:50शी तुलना, जेथे ग्रीक भाषेत तोच शब्द उपयोगात आलेला आहे). ख्रिस्त त्याच्याठायी होते, जसे ते सर्वच विश्वासींत असतात, म्हणून ख्रिस्तांचे प्रेम देखील त्याच्या अंतःकरणात वसलेले होते. तो पूर्णपणे ख्रिस्तांच्या स्वाधीन झालेला शरणागत होता, म्हणून तो संपूर्णतः ख्रिस्तांच्या प्रेमाच्याही स्वाधीन झालेला होता. ख्रिस्तांचे प्रेम म्हणजे त्याचे स्वतःचे ख्रिस्तांवरील प्रेम असे नाही, पण संपूर्ण मानवजातीविषयी असलेले ख्रिस्तांठायीचे प्रेम. तुलना 1 योहान 4:10,19.पाहा गल 2:20.

(भारावलेले) आहोत की 'येशू सर्वांसाठी मरण पावले होते.*,' याच कारणास्तव आम्ही देखील आमच्या जुन्या जीवनासाठी (जे परमेश्वरावाचून होते) संपूर्णरीतिने संपलो आहोत. [15] *येशू याकरिता सर्वांसाठी मेले की जे जगतात त्यांनी भविष्यकाळी स्वतःकरिता जगू नये, पण त्यांच्यासाठी (येशूंसाठी) जगावे जे लोकांसाठी मेले आणि पुन्हा जिवंत उठले.

[16] *म्हणून यापुढे आम्ही कोणालाही शारीरिकदृष्टया (जगिक) ओळखणार नाही कारण जरी आम्ही ख्रिस्तांना दैहिकरीतिने ओळखले होते, तरी यापुढे आता तसे ओळखणार नाही. [17] *म्हणून ज्या अर्थी , ज्या कोणी (ज्याने) मशीहावर विश्वास ठेविला आहे, त्या अर्थी तो ख्रिस्तांमध्ये.* एक नवी रचना.* आहे. जुन्या गोष्टी गुदरुन गेलेल्या आहेत आणि सर्व गोष्टी नव्या झाल्या आहेत (नवे जीवन सुरु झाले आहे). [18] या सर्व नव्या गोष्टी परमेश्वरापासूनच्या.* आहेत, ज्याने येशू ख्रिस्तांद्वारे आपल्याबरोबर आमचा समेट.*

---

* *"भाग पाडते"*- ग्रीक शब्दाचा अर्थ - "धरून ठेवणे", "टिकवून ठेवणे", "सोबत बांधणे", "घट्ट दाबून ठेवणे", "ताबा घेणे", "आग्रह करणे - शिफारस करणे", "सक्तीने करावयास भाग पाडणे". शंकाच नाही प्रियांनो की, ख्रिस्तांचे प्रेम हे सर्व करू शकते.

* *"येशू ...होते"*- अर्थात सर्व माणसांसाठी, (आपल्यासाठी). त्यांच्या अपराधांमुळे त्यांची लायकी "मरणाचीच" होती, त्यांच्यासाठी मानवजात 'मरण' हीच योग्य शिक्षा होती. ते त्यांच्याजागी मरण पावले (वचन 19; योहान 1:29; 3:16; 1 तीम 2:6; इब्री 2:9; 1 पेत्र 3:18; 1 योहान 2:2). म्हणून परमेश्वराच्या दृष्टीने सर्व मरण पावले त्या वेळी ख्रिस्त मरण पावले म्हणजे जे काही मानवजातीच्याऐवजी त्याच्या प्रतिनिधीबरोबर ख्रीस्त घडले ते जणूकांही मानवजातिबरोबर घडले होते. पण याचा अर्थ असा होत नाही की सर्वांचेच तारण झाले आहे. ख्रिस्त त्यांच्यासाठी मरण पावले केवळ या कारणामुळे लोक उद्धार प्राप्त करू शकत नाहीत - त्यांनी परमेश्वराशी मेळ करावयाचाच आहे (वचन 20). त्यांनी पश्चात्ताप करून ख्रिस्तांवर विश्वास करावयाचाच आहे (लूक 13:3; योहान 3:36; 8:24; प्रेषि 17:30). ख्रिस्तांच्या मरणात त्यांचा बाप्तिस्मा व्हावयास हवा आहे (रोम 6:3). तसे नसल्यास, उद्धार कोणासाठीही उपलब्ध नाहीये. ख्रिस्तांचे मरण परमेश्वराला, 'मनुष्य अपराधांची क्षमा करणे' शक्य करते, परंतु फक्त ते लोक जे ख्रिस्तांच्याद्वारे परमेश्वराकडे येतात/वळतात, केवळ त्यांनाच उद्धार प्राप्त होतो. दुसरे संभाव्य भाषांतर जे "सर्वांसाठी मरण पावले" या शब्दांचे असू शकते ते म्हणजे : ख्रिस्त त्या सर्वांसाठी मरण पावले,ज्यांना परमेश्वराने 'निवडलेले लोक' जे ख्रिस्तांना दिले होते (योहान 6:37; 17:6). हे भाषांतर अनेक भाष्यकार व विद्वानांनी पसंत केले आहे व ते सहमतही आहेत (परंतु या नोट्स चा लेखक नाही). कोणतेही भाषांतर आपण मान्य केले तरी एक गोष्ट अगदी ठळक व स्पष्ट आहे - ख्रिस्त येशूंच्या मरणाचे जे सर्व अनंतकालिक फायदे आहेत, ते फक्त त्यांच लोकांसाठी आहेत जे त्यांच्यावर विश्वास करतात; जे त्यांच्यावर विश्वास ठेवीत नाहीत, त्यांच्यासाठी काहीही आशा नाही.

***5:15** येशू ख्रिस्तांच्या मरणाचा येथे सर्वात महान व श्रेष्ठ हेतू आहे - लोकांना गांभिर्य कळावे व त्यांनी स्वकेंद्रित व स्वार्थी जीवन शैलीपासून मुक्त व्हावे, स्वतंत्र व्हावे. पाहा - रोम 14:9.पौलाच्या घटनेत आपण असाच परिणाम पाहतो (वचन 9). असाच परिणाम आपल्या जीवनावर झाला आहे काय? जर नाही तर आपण त्यांना (येशूंना) कसे काय ओळखतो? आपला विश्वास मनापासूनचा व विश्वसनीय आहे काय? येशूंच्या मरणात बाप्तिस्मा होणे म्हणजे त्याच्या पुनरूत्थानातही बाप्तिस्मा होणे होय. एक नवीन जीवन मार्ग असा त्याचा अर्थ आहे. (वचन 17; रोम 6:4-7). स्वतःसाठी जगणे हा "अंतिम विनाश" आहे; येशूंसाठी जगणे हा "अंतिम सर्वोत्कृष्ट आशीर्वाद" आहे - पाहा मत्त 10:37-39; लूक 9:23; 14:26.

***5:16** ख्रिस्तांचा एक विश्वासी होण्यापूर्वी पौल आतंरिक समज नसणारा होता, त्यामुळे तो ख्रिस्तांचा व सर्व लोकांचा बाह्यरूपाने विचार करीत होता. तुलना योहान 8:15.परंतु जेव्हा त्याला ख्रिस्तांच्या मरणाचा अर्थ कळला तेव्हा त्याचा उथळपणे ओळखण्याचा मार्ग बिलकुल बदलला. त्यामुळे ख्रिस्तांशी तो जसे नाते बाळगत होता तसाच प्रत्येकाविषयी (दृष्टिकोन) बाळगू लागला.

***5:17** शब्द 'ज्या अर्थी' यांचा संबंध वरच्या वचनांशी आहे. ख्रिस्तांच्याठायी एक मनुष्य नवीन सृष्टि (रचना) आहे. म्हणून नैसर्गिकरीत्या त्याचा ख्रिस्तांना, इतरांना आणि स्वतःला पाहण्याचा दृष्टिकोन पहिल्यासारखा राहणार नाही.

* *"ख्रिस्तांमध्ये"*- पाहा योहान 17:20-21; रोम 6:3,5; 8:1; 1 करिं 1:1; 12:12-13; इफि 1:1,4.

* *"नवी रचना"*- म्हणजे आतंरिक जन्म (योहान 1:12-13; 3:3-8; तीताला 3:5; 1 पेत्र 1:23). ज्यांना याचा अनुभव येतो ते पूर्वीसारखे कधीच राहणार नाहीत. त्यामुळे स्वतःसाठी जगण्याचा जुना मार्ग आणि इतरांना व ख्रिस्तांना पाहण्याचा दृष्टिकोन संपतो. जुन्या कल्पना, विचार, लक्ष्य आणि सिद्धांत संपतात. नवीन सत्य, नवीन शक्ति, नवीन इच्छा, नवीन हेतू व लक्ष्य, त्यानुसार जगण्याचे सामर्थ्य ही सर्व त्या व्यक्तीच्या हृदयात प्रवेश करतात. लक्षपूर्वक पाहा आणि समजून घ्या की हे सत्य केवळ पौलासारख्या माणसांसाठीच नाही तर ते ख्रिस्तांठायी असलेल्या "कोणासाठीही" आहे.

***5:18** *"परमेश्वरापासूनच्या"*- पाहा योहान 1:13; इफि 2:10; 4:24; याकोब 1:18.मनुष्य 'एक नवा आरंभ' करू शकतो पण ते त्याच्याठायी 'नवीन जीवन' निर्माण करू शकत नाही. हे केवळ कठीणच नव्हे तर अशक्य आहे. मनुष्य कोणाचीही प्रारंभीची रचना/निर्मिती करू शकत नाही (उत्प 1:1).

घडवून आमच्याशी आपला मेळ घातला, त्यानेच तर आम्हांला हे कार्य दिले की आम्ही दुसऱ्या लोकांचा संबंध घडवून त्यांचा परमेश्वराशी मेळ करून द्यावा. 19 *अर्थात परमेश्वराने ख्रिस्तांमध्ये जगाबरोबर समेट (मेळ) करून घेतला आणि लोकांच्या अपराधांचा दोष लोकांवर लाविला नाही, आणि तोच मेळ-संदेश देण्याचे कार्य त्याने आमच्याकडे सोपून दिले. 20 *म्हणूनच तर आम्ही परमेश्वराचे राजदूत आहोत, जणूकाही आम्ही ख्रिस्तांच्यावतीने बोलत आहोत, “परमेश्वराबरोबर संबंध नीटपणे जोडून घ्या”, 21 *कारण ज्यांना (येशू) अपराधाचा स्पर्शही नव्हता त्याच येशूंना परमेश्वराने आपल्यासाठी 'अपराध' असे केले यासाठी की आपण येशूंच्याठायी ‘परमेश्वराचे सत्य’ व्हावे.

---

* *“समेट”*- म्हणजे शत्रुंतून मित्र तयार करणे आणि दूर राहण्याची अवस्था व शत्रुत्वाचे मूळ कारण दूर करणे. अपराधाने लोकांना परमेश्वराचे शत्रु केले होते (रोम 5:10; कल 1:21) त्यांच्या अपराधांमुळे परमेश्वराचा क्रोध त्यांच्यावर होता (रोम 1:18.नोट्स - गण 25:3; स्तो 90:7-11; योहान 3:36). ज्या गोष्टींमुळे त्यांला राग आला होता, त्याच्याविषयी त्यांला काहीतरी योग्य असे करावयाचे होते. त्या गोष्टी निस्तारायच्या होत्या, कारण तसे केल्यावांचून त्याचा व लोकांचा मेळ/समेट होऊ शकत नव्हता. म्हणून सर्व गोष्टीं व्यवस्थित करण्यासाठी त्यांने सर्व जगाच्या अपराधाचे बलिदान म्हणून आपला पुत्रा जगात पाठविला. (संबंधित वचनें - वचन 14ची पाहा) ख्रिस्तांच्याद्वारे/वतीने परमेश्वराने लोकांशी समेट केला, लोक व परमेश्वर ख्रिस्तांच्या साहाय्याने जवळ आले सगळे एक झाले, दुरावा संपला - इफि 2:16; कल 1:20,22;ते केल्यानंतर परमेश्वर आपले सेवक प्रत्येकजागी पाठवितो जेणेकरून त्यांनी सर्वांना येशूवार्ता सांगावी. प्रियांनो “आपल्याला समेट/मेळ घडवून आणण्याची हीच सेवा दिली” हा याचा खरा अर्थ आहे.

* **5:19** या वचनात ‘मेळाचा तो संदेश’ आहे जो परमेश्वर आपल्या सेवकांना देतो की त्यांनी त्याची घोषणा करावी. वचन 18 यात पौल म्हणतो ‘परमेश्वराने आपल्याशी’ समेट केला. हे भूतकाळात घडले. येशूंच्या मृत्यूद्वारे परमेश्वराने, “अनंतकालिक मैत्रीचा पाया” त्याच्यामध्ये आणि पृथ्वीवरील लोकांमध्ये घातला, जेणेकरून पृथ्वीवरील ज्या कोणाला ही मैत्री हवी आहे त्याने परमेश्वराशी ‘ती’ करून घ्यावी. माणसांचे अपराध त्यांने, त्यांच्याविरूद्ध मोजले नाही. या विपरित, मनुष्यांचे अपराध त्याने ख्रिस्तांवर लादले (वचन 21; योहान 1:29; यश 53:5-6). याचा अर्थ असा नाहीये की प्रत्येकाचे तारण झालेले आहे. तारणप्राप्तिसाठी प्रत्येकाकरता मार्ग उघडा आहे हा त्याचा अर्थ आहे. उद्धार मिळवून घेण्यासाठी, परमेश्वराने जे काही केले ते लोकांनी स्वीकार करावे अर्थात त्यांनी ख्रिस्तांवर भरंवसा ठेवावा. जर ते तसे करणार नाहीत तर ते नष्ट होतील (योहान 3:16,36).

* **5:20** समेट कार्यात परमेश्वराचे कार्य दोन प्रकारचे आहे (1) आपल्या पुत्राला त्याने आमच्या अपराधांसाठी मरावयास पाठविले, (2) आणि परमेश्वर आपल्या सेवकांना हेच सत्य प्रचार करण्यासाठी, सगळीकडे पाठवितो. परंतु या कार्यात लोकांचाही सहभाग व्हावा - “त्यांनी परमेश्वराबरोबर आपला व्यवस्थित संबंध जोडून घ्यावा”. जो समेट ख्रिस्तांद्वारे, परमेश्वराने अगोदरच घडवून आणला आहे, तो ग्रहण/स्वीकार करणे हा त्याचा अर्थ आहे. पश्चात्ताप करून, ख्रिस्तांच्या सुवार्तेवर विश्वास ठेवणे असा त्याच्यासारखाच याचाही अर्थ आहे. ज्या कोणाला परमेश्वर ख्रिस्त-येशूवार्ता गाजविण्यासाठी पाठवितो ते राजदूत आहेत.पौल ख्रिस्तांचा “राजदूत” होता. “राजदूत” तो व्यक्ती आहे जो एखाद्याचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी ठिकठिकाणी जातो. राजदूत स्वतःच्या अधिकाराने बोलतही नाही व कार्यही करीत नाही. ज्याने त्याला पाठविले व त्याने त्याला जे बोलावयास सांगितले तेच तो बोलतो. ख्रिस्त स्वर्गात आहेत, पण त्यांचे राजदूत या पृथ्वीच्या पाठीवर त्यांच्या नांवाने बोलण्याकरता व त्यांचा संदेश देण्याकरता राजदूतांच्या भूमिकेत उपलब्ध आहेत. ते ख्रिस्तांचा संदेश देतात, त्यांच्याद्वारे ख्रिस्त लोकांना विनंती करतात, याचना करतात (शब्द “तू/तुम्ही” हा ग्रीकभाषेत, या वचनात नाही. करिंथातील विश्वासींचा ज्यांना पौल लिहितो आहे, त्यांचा अगोदरच परमेश्वराशी समेट/मेळ झालेला होता. पाहा परमेश्वर लोकांना कशी विनवणी करीतो की त्यांनी उद्धार प्राप्त करून घ्यावा. तुलना यहे 18:30-32.

* **5:21** याठिकाणी चार महान-श्रेष्ठ सत्य आहेत. पहिले : ख्रिस्त अपराधांवांचून होते (योहान 8:46; इब्री 4:15; 7:26; 1 पेत्र 2:22; 1 योहान 3:5). दुसरे : परमेश्वराने त्यांना अपराध असे केले - म्हणजे, परमेश्वराने जगाचे अपराध त्यांच्यावर घातले, ख्रिस्तांनी तो दोष व दंड भोगिला, सहन केला. माणसाचे प्रत्येक अपराध, दुष्टाई, हिंसा, भ्रष्टाचार आणि इतर सर्व प्रकारचे अपराध येशूंच्या नांवे केले, जेणेकरून आपले (मनुष्याचे) खाते रिकामे व्हावे (जरा यावर विचार करा)!!! तिसरे : हे सर्व काही “आपल्यासाठी होते” (वचन 14; 1 पेत्र 3:18; 1 योहान 4:10). परमेश्वराने आपले अपराध, ख्रिस्तांच्या खात्यांत घातले यासाठी की ते ‘तुमच्या-माझ्या-आपल्या’ खात्यांत जाऊं नयेत, आपली खाती अपराधमुक्त व्हावीत. चौथे : परमेश्वराचा हेतू हाच होता की, ख्रिस्त येशूंमध्ये, विश्वासीने परमेश्वराचे नीतिमत्व/धार्मिकता व्हावे. हा नितिमान ठरविले जाण्याकडचा इशारा आहे (नोट्स - रोम 3:21-26) आणि ख्रिस्तांशी एक (जुळणे) होण्याचाही (योहान 17:20-23; रोम 6:3-8; इफि 1:1,4). ख्रिस्त स्वतःच परमेश्वराचे नीतिमत्व आहे (1 करिं 1:30; रोम 3:21-24; प्रेषि 3:14). विश्वासीं त्यांच्याशी जुळलेले आहेत आणि म्हणून ते ख्रिस्तांठायी नीतिमान झाले आहेत, आणि आता परमेश्वरासमोर, जसे ख्रिस्त आहेत विश्वासीं सुद्धा (परमेश्वरासमोर) तसेच आहेत.

# 6

1 यासाठी की आम्ही सर्व सहकर्मीरूपात एकत्र[*] मिळून परमेश्वराचे कार्य करीत आहोत, म्हणून आम्ही असेही निवेदन करितो की
परमेश्वराचा अनुग्रह व्यर्थ जाऊ देऊ नका. 2 परमेश्वराने म्हटले होते की, “योग्य समयी मी तुझे ऐकले आणि मुक्तीच्या दिवशी मी तुझे
साहाय्य केले”. पहा, हाच तो योग्य समय आहे, आत्ताच मुक्तीचा समय आहे!
3 [**]आम्ही अशा प्रकारे जगत आहोत, की कोणत्याही बाबतीत कोणासाठीही अडथळा होऊ नये आणि इतकेच नव्हे तर आमच्या
सेवेत कोणालाही कोणताही दोष (खोट) आढळू नये. 4 [*]जे सर्व काही आम्ही करितो, त्याद्वारे आम्ही प्रगट करितो की आम्ही
परमेश्वराचे खरे-सच्चे सेवक आहोत, मोठ्या धीराने, छळात, गरीबीत, संकटात, 5 फटके हाणले जातांना, तुरूंगात डांबले जाताना,
दंग्यात, क्लेशात, श्रम करण्यात, जागरणात, भुकेले राहण्यात, 6 [*]पवित्रात्म्याद्वारे ज्ञानात, धीरात, कृपेत, निष्कपट प्रेमात, 7 सत्याच्या
संदेशात, परमेश्वराच्या सामर्थ्यात, उजवीडावीकडे परमेश्‍वरी हत्यारांसह[*], 8 [*]आदर व अनादरात, यश व अपयशात, बदनामी व
प्रसिद्धीत, फसविणाऱ्यांसारखे दिसतो खरे, पण आम्ही तसे नाहीच मुळी. 9 अनोळखी असल्यासारखे आहोत,तरी प्रसिद्ध आहोत.
मेलेल्यांसारखे आहोत, पण तरीही जिवंत आहोत. शिक्षा मिळणाऱ्यांसारखे (मार खाणाऱ्यांसारखे) आहोत, तरीही जिवे मारले जात
नाही; 10 शोक करणारे[*] दिसतो तरी सर्वदा आनंदित राहणारे आहोत, गरीब[*] दिसत असलो तरी सर्वांना श्रीमंत करीत असतो, जवळ

---

[*] **6:1-2** *“सहकर्मीरूपात एकत्र”*- 5:20; 1 करिं 3:9.परमेश्वराची कृपा म्हणजे 5:21मध्ये वर्णन केलेली कृपा. प्रभूचा अनुग्रह ‘व्यर्थ’ जाऊ देणे म्हणजे तो ऐकणे, त्याच्याविषयी माहिती मिळविणे परंतु स्वीकारल्यानंतरही त्याचे काहीही न करणे, असा त्याचा अर्थ होऊ शकतो. त्याचप्रमाणे त्याचा असाही अर्थ होऊ शकतो की, ते केवळ अशा प्रकारे स्वीकार करणे की ज्याचा जीवनावर काहीच प्रभाव पडत नाही आणि त्याचा परिणाम उद्धारात परिवर्तित होत नाही. या मुद्यावर भर देण्यासाठी तो यश 49:8वर भर देतो. आत्ताच मुक्तिचा दिवस आहे - ख्रिस्तांठायी प्रगट झालेले कृपेचे युग.

[*] **6:3-10** पौल आपला सेवेच्या बचाव पक्षात आपले मुद्दे मांडणे कायमच ठेवतो. पाहा 1:12-14.तो ज्या रीतिने या वचनात अधिक भर देतो, त्यावरून त्याच्याठायी असलेले पवित्र भय पाहता येते : “करिंथाच्या चर्चतील काही लोक किंवा पुष्कळ सुद्धा त्याचा अस्वीकार करतील, ख्रिस्तांचा राजदूत म्हणून त्याला अमान्य करतील आणि खोटया शिक्षकांनी बिघडविलेल्या व मनमानीपणे भलतीकडे नेलेल्या मुक्तिवार्तेचा स्वीकार करतील, हे त्याचे पवित्र भय होते.” यावरून पौल त्यांच्यापुढे आपले चरित्र आणि ख्रिस्तांठायी त्याने सहन केलेले अनुभव प्रस्तुत करतो. या वचनांवरून प्रचिती येते, स्पष्ट कळते की पौल परमेश्वराचा खरा व सात्विक सेवक होता.

[*] **6:3** काही लोक तेथे असे होते जे, त्याची सेवा व्यर्थ, बेकार व बदनाम करण्याच्या सतत प्रयत्नात होते, नव्हे त्यांनी पौलाला खाली पाडण्याचा निर्धारच केलेला होता. परंतु इकडे पौलानेही हा ठाम निश्चय केलेला होता की तो स्वतः असे होऊ देणार नाही.

[*] **6:4-5** तुलना 1:8; 4:8-9; 11:23-29; 1 करिं 4:9-13.मोठ्या धीराने सर्व विरूद्ध व प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहून त्यांना सिद्ध करावयाचे आणि प्रगट करावयाचे होते की ते स्वतः परमेश्वराचे खरे-सात्विक (सहनशील) सेवक आहेत. खोटया शिक्षकांच्या जीवनाचा जीवन -आदर्श खोटा होता व जो पौल आणि इतर ख्रिस्ती सेवकांच्या जीवनाच्या अगदी विरूद्ध होता करिंथच्या ख्रिस्ती लोकांनी स्वतःच्या डोळयांनी पाहावयास हवा होता.

[*] **6:6-7** पौल आपल्या स्वतःच्या सद्‌गुणांविषयी आणि परमेश्वराने जे सामर्थ्य त्याच्या सेवेत वेळोवेळी प्रगट केले त्याविषयी स्पष्टीकरण देतो. या सर्व गोष्टी ज्या पौलाच्या चारित्र्यात होत्या, त्या प्रत्येक ख्रिस्ती सेवकाने आपल्या अंगी बाळगाव्यात, आणि त्यासाठी चिकाटीने प्रयत्न करीत राहावेत. पौलाला म्हणावयाचे आहे की त्याच्या जीवनात असलेली ही आतंरिक फळें या गोष्टीचे प्रमाण होते की तो परमेश्वराचा खरा सेवक आहे, एखादा लबाड व खोटा संदेष्टा नाही - तुलना मत्त 7:16-20.

[*] **6:7** *“हत्यारांसह”*- त्याचे भाषांतर “शस्त्रें” असेही होऊ शकते. 10:4; इफि 6:11-17.त्याची हत्यारें धूर्तपणाची, लबाडीची, फसवणूकीची, कठोरपणाची, अत्याचार व हिंसेची नव्हती, परंतु नीतिमत्वाची हत्यारें होती. नीतिमान परमेश्वराने ती त्याला सोपविलेली आणि उपलब्ध करून दिलेली होती आणि पौलाने त्यांचा उपयोग नीतिमत्वाच्या मार्गाने केला (1:12).

[*] **6:8-10** लोक काहीही म्हणत असले तरी त्याकडे दुर्लक्ष करून पौल आपले सेवाकार्य करतच राहिला. त्याने आपला छळ, भावना आणि गरीबी यांची पर्वा केली नाही. प्रत्येक परिस्थितीत तो सिद्ध करीत होता की 5:14त्याच्याविषयी सत्य होते,

[*] **6:10** *“शोक करणारे”*- 2:4; 5:4; रोम 9:2-3; 7:24. या जगात, चर्चमध्ये आणि त्याच्या स्वतःतच, खात्रीने अशी भरपूर कारणे आहे ज्यामुळे आपल्याला शोक होतो, ज्यामुळे ख्रिस्ती सेवकांनांही अनेक शोक व दुःख भोगावी लागतात. पण दुःखी असला तरी,

काहीही नसले.* आणि फक्कड दिसत असलो तरी सर्व काही बाळगणारे आहोत.

11 अहो करिंथकरांनो! प्रत्येक गोष्ट (सर्व काही) आम्ही प्रामाणिकपणे सांगितली आहे. आमचे हृदय तुमच्यासाठी सताड
उघडलेले.* असे आहे. 12 आम्ही आपल्या प्रेमात कोणत्याही प्रकारची उणीव ठेवली नाही, पण तुम्ही मात्र खूपच मोजमाप करून प्रेम
दर्शविता. 13 तुम्हांला आपली मुलें समजून मी तुमच्याशी बोललो आहे. तुम्ही देखील मोकळया व उघड अंतःकरणाने तसेच प्रेम
दाखवा.

14 *ज्या लोकांनी मशीहांवर विश्वास ठेवला नाहीये, त्यांच्याबरोबर भागीदारीत कशाही रीतिने जुळू नका.*. कारण 'नीतिमत्व'
(योग्य करणारे) व 'अंधकारात' (अयोग्य करणारे) एकता कशी टिकून राहू शकते? किंवा प्रकाश.* आणि अंधकार एकत्र (त्यांचा
मिलाफ) कसे येऊ शकतात? 15 ख्रिस्त आणि सैतान.* एकमेकांशी सहमति कशी साधू (करु) शकतात? किंवा ख्रिस्ती आणि एक

---

पौलाने त्याच्या हृदया उसळणाऱ्या आनंदाच्या झऱ्याचा, त्या दुःखातही त्याने नेहमी अनुभव घेतला - 2:3; 7:4; रोम 5:11; 14:17; गल 5:22.

* *"गरीब"*- तुलना प्रेषि 3:6; लूक 6:20; 1 तीम 6:6-9.पौलाठायी इतकी श्रेष्ठ आतंरिक कृपादानें आणि क्षमता होती, की जर त्याने निवड केली असती तर सहज विपुल पैसे कमविले असते, भरपूर श्रीमंत झाला असता. पण ज्या येशू ख्रिस्तांना डोके टेकावयास जागा नव्हती (मत्त 8:20) त्या येशूंचे अनुकरण करून त्यांचा शिष्य होण्याचे त्याने पसंत केले, निवड केली. म्हणून तो अनेकांना "श्रीमंत"- करू शकला, पण धन आणि मालमत्ता यांत नव्हे, तर 'आतंरिक आशीर्वादात' त्याने लोकांना 'धनी' केले. तुलना 8:9.

* *"काहीही नसले"*- "सर्व काही"- तुलना फिलि 3:8; मत्त 19:27; 1 करिं 3:21-22.

* **6:11-13** *"सताड उघडलेले"*- म्हणजे त्याच्यासाठी हृदया जागा तयार करणे. त्यावरून प्रेम आणि इतरांविषयी काळजी दर्शविली जाते - 7:2-3. बहुधा ख्रिस्ती लोक (मनाने) जखडलेले आणि अरूंद असतात. त्यांना जे हवे आणि ज्याविषयी ते काळजी करतात, त्यासाठीच त्याच्या हृदयात जागा असते. तुलना फिलि 2:4,21.

* **6:14-18** आता पौल हे खूपच महत्वाचे सत्य पुढे मांडतो. येशू ख्रिस्तांचे विश्वासीं हे "खास-विशेष" लोक आहेत म्हणून त्यांनी त्यानुसारच विशेषरीतिने वागावयाचे आहे. तुलना अनु 7:3-6; 1 पेत्र 2:9-12; योहान 17:6-10,17-19. 14 व्या वचनात तो असा एक सिद्धांत मांडतो जो सर्व विश्वासींना, हरसमयी आणि सर्व ठिकाणी लागू होतो. त्यांनी अविश्वासींबरोबर कोणत्याही प्रकारची भागीदारी करू नये, जवळीक साधू नये.

* *"भागीदारीत...नका"*- दर्शविते की आशय हा आहे: एखाद्या सामान्य लक्ष्यात आणि कार्यात खूप जवळीक साधून, एकत्र येऊन कार्य करणे. पाहा अनु 22:10.विश्वासी, ख्रिस्तांबरोबर भागीदार आहे (मत्त 11:28-29); म्हणून जे लोक ख्रिस्तांना स्वीकारीत नाहीत त्यांच्याबरोबर स्वतःला भागीदार करावयाचे नाहीच मुळी. खात्रीने, त्याद्वारे विश्वासी व अविश्वासी यांच्यात विवाह होण्याची मनाई आहे; विवाह होऊच नये. (पाहा 1 करिं 7:39; एज्रा 9:1-2; नहेम्या 13:23-27; मलाखी 2:12). याचप्रमाणे जे खोटे शिक्षक, बिघडविलेली येशूवार्ता गाजवितात किंवा जे बायबलचे मुलभूत सत्य नाकारतात, त्यांचीही संगत करावयाची नाही. त्यांचे ऐकावयाचे नाही पण म्हणून पौल विश्वासींना अशा ठिकाणी काम करण्याची मनाई करतो, जेथे अविश्वासींही काम करतात किंवा अविश्वासींना आपल्या कामासाठी घेऊ नये त्याला असे मुळीच म्हणावयाचे नाही. आणि त्याचा अर्थ असाही नाही की त्यांनी अविश्वासींशी नाते तोडून द्यावे, ते सर्व संपवून टाकावे (1 करिं 5:9-10). पौल स्वतःच अविश्वासींशी संपर्क साधायचा, त्यांच्याशी नातें जोडायचा जेणेकरून, त्यांना त्याला ख्रिस्तांसाठी जिंकता यावे (1 करिं 9:19-23तुलना मत्त 11:19). परंतु या वचनात तो अविश्वासींशी गाढ व घट्ट सहभागिता आणि सामान्य हेतूंच्या पूर्तीसाठी संगत करावयास मना करतो, कारण असे नाते बायबलच्या सिद्धांतांशी किंवा ख्रिस्तांशी तडजोड, समझोता करावयास भाग पाडू शकते. जो कोणी विश्वासी या सिद्धांताच्या विरूद्ध कार्य करतो, भागीदारी न करण्याचा सिद्धांत गंभीरपणे घेत नाही तो, स्वतःसाठी धोके व समस्यांना निमंत्रण देतो. वचन 14-16 यांत पौल पांच प्रश्न विचारतो, हे सिद्ध करण्यासाठी की विश्वासींनी, अविश्वासींशी मेळ साधणे किती मूर्खपणाचे व चूकीचे आहे. जे लोक ज्या गोष्टी/बाबी, व आपल्यासारखे सामान्य हेतू बाळगीत नाहीत, ज्यांचे लक्ष्य वेगळे असते, त्यांना असे वागवून घेऊ नये आणि गृहीत धरू नये की, त्यांच्यात ते सर्व आहे जे आपण मानतो. "त्यांच्यापासून दूर होणे, वेगळे असणे (जे वाईट आहे, जे सर्व वाईट लोक आहे) स्वतःला दूर ठेवणे" ही परमेश्वराने आपल्या लोकांना दिलेली आज्ञा ठाम आदेश आहे (वचन 17).

* **6:14** *"प्रकाश"*- विश्वासीं प्रकाशात आहेत, त्यांना प्रकाश प्रिय आहे, ते प्रकाशाचे संतान आहेत (मत्त 5:14; योहान 3:21; 8:12; इफि 5:8; 5:14; योहान 3:21; 8:12; इफि 5:8; 1 थेस्स 5:5). अविश्वासींची स्थिती अगदी याच्या उलट आहे (योहान 3:19; इफि 6:12; 1 योहान 2:9,11). मग अशी जाण ठेवूनही अविश्वासींबरोबर मिळून कार्य करीत राहणे योग्य व न्याय्य आहे काय?

* **6:15** *"सैतान"*- हा शब्द इब्री शब्दापासून येतो ज्याचा अर्थ आहे - काहीही मोल नसलेले बेकार असे आणि दुष्ट. विश्वासी ख्रिस्तांशी जुळलेले आहेत, अविश्वासीं सैतानाशी (इफि 2:2; योहान 8:44). मग विश्वासी अविश्वासींशी जुळून कार्य करण्याचा विचार

गैरख्रिस्ती यांचा काय संबंध? [16] परमेश्वराचे भवन आणि मूर्ति यांच्यात कोणतीही तडजोड (समझोता) शक्य तरी आहे काय? कारण आम्ही जे चर्च ते सर्व परमेश्वराचे जिवंत भवन आहोत. जसे परमेश्वराने म्हटलेही होते, “मी त्यांच्यामध्ये राहेन व त्यांच्यामध्ये चालेन फिरेन, मी त्यांचा परमेश्वर होईन व ते माझे लोक होतील.’’ [17] *यास्तव प्रभू म्हणतो की “त्यांच्यामधून निघा आणि वेगळे व्हा आणि जे काही अशुद्ध आहे ते शिवू नका तेव्हा मी तुमचा स्वीकार करेन, [18] मी तुमचा बाप होईन, तुम्ही माझे मुलेंमुलीं व्हाल’’ , सर्वशक्तिमान प्रभू असेच म्हणतो.

# 7

[1] *माझ्या प्रियांनो, आपल्याला या बहुमूल्य प्रतिज्ञा मिळालेल्या आहेत, म्हणून आपण त्या सर्व गोष्टींपासून (खूप गलिच्छ) स्वतःला शुद्ध करू. आपला देह व आत्मा ज्या अशुद्ध करू शकतात, त्यांपासून स्वतःला शुद्ध करु या. अशा प्रकारे परमेश्वराचे भय* बाळगून आपण पवित्रेकडे वाटचाल करीत राहू या.

[2] *आमच्यासाठी आपली अंतःकरणे मोकळी व उघडी असू द्या, आम्ही कोणाचेही वाईट केलेले (चिंतिले) नाहीये आणि कोणाला

---

किंवा कल्पना तरी कशी करू शकेल? 6:16विश्वासी परमेश्वराचे मंदिर/भवन आहे (1 करिं 3:16; 6:19; इफि 2:21-22). अविश्वासी एकतर खराखुऱ्या मूर्तीची उपासना करतो, किंवा त्याच्या ‘मनातील’ मूर्तीची आराधना करतात (इफि 5:5), किंवा स्वतःलाच मूर्ति समजतो/करून घेतो. मग इतकी मोठी तफावत आणि भिन्नता असलेल्या दोन वेगवेगळया प्रकारच्या लोकांच्या गटांत, कोणतीही सहमति किंवा तडजोड कशी होऊ शकते? पौल जुन्या करारातील काही वचनांचा उल्लेख करून परमेश्वराचे मंदिर/भवन होण्याविषयीचा आशय/अर्थ सांगतो - लेवी 26:11-12; यिर्म 32:38; यहे 37:27.

***6:17-18** या भागाचे समर्पक समापन करण्यासाठी पौल जुन्या करारातील भागांकडे वळतो. कोणत्याही एका वचनाचे तो निश्चित-वचन म्हणून संबोधन करीत नाही पण कदाचित त्याच्या मनात ही वचनें असावीत - यश 52:11-12; 2 शमु 7:14; यिर्म 31:9; यश 43:6.जे लोक परमेश्वराचे “पवित्र-विशिष्ट-वेगळेपणाचे वैशिष्टय” असलेले लोक होण्याची इच्छा बाळगतात, त्यांच्यापुढे पौल किती महान बाब मांडतो ते पाहा : असे लोक जगिक संगत, आमोद-प्रमोद व सुखविलास गमावतात, त्यास मुकतात खरे परंतु सर्वसामर्थी परमेश्वराची बहुमूल्य सहभागिता कमावितात, मिळवितात. पुष्कळ लोक या दोन्ही प्रकारांची कामना करतात, पण ते तसे घडणे केवळ अशक्य आहे.(याकोब 4:4).

***7:1** परमेश्वराच्या महान प्रतिज्ञां ऐकून, त्या प्रतिज्ञांमुळे आपण तसेच राहू नये जसे त्या ऐकण्यापूर्वी आपण होतो. परमेश्वर आपल्याला त्याचे वचन देतो आणि त्यांची कृपा दाखवितो जेणेकरून आपण त्याची आज्ञा पाळावी आणि जसे व्हावे अशी त्याची इच्छा आहे तसे पवित्र वेगळे, केलेले, लोक व्हावे. तुलना रोम 12:1-2; 1 करिं 15:58; इफि 4:1; कल 3:1; तीताला 2:11-14. या वचनात ख्रिस्तांचा राजदूत आपल्याला सांगतो की, आपल्या जीवनात पवित्रतेच्या परिपूर्णतेचे लक्ष्य असूं द्यावे /ठेवावे (पाहा 13:9,11.परिपूर्णतेवर पाहा नोट्स - मत्त 5:48). खात्रीने पौल आपल्याला किंवा 3/4 इतका भाग 9/10 एवढा भाग पवित्र राहावयास सांगणार नाही. कारण त्याचा अर्थ जो उरलेला भाग आहे त्यात आपण अपवित्र राहावे असे उत्तेजन दिल्यासारखे ते होईल. आपले लक्ष्य तर हेच असावे की येशू या पृथ्वीवर राहतांना जितके पवित्र होते तितकेच प्रियांनो, सर्व विश्वासींनी राहावे. होय, ही गोष्ट खरी आहे की आपण पूर्णत्वाचे अर्थात पवित्र राहण्याचे ध्येय बाळगणे आणि ते प्राप्त करणे ही एकच गोष्ट नाहीये. हे जग आतंरिक दृष्टिकोनातून पाहिले तर एक गलिच्छ, सडलेली, घाणेरडी जागा आहे आणि या जगात वावरतांना विश्वासी सहजपणे अशुद्ध होऊ शकतो. पाहा योहान 13:10.तसेच विश्वासीठायी एक अपराधमय स्वभावही आहे जो त्याच्यासाठी फास/जाळे होऊ शकतो. पाहा रोम 7:18; गल 5:16-17; 1 योहान 1:8. शब्द “पूर्णत्व” या गोष्टीकडे इशारा करतो, की ती एक चालू राहणारी प्रक्रिया आहे. पूर्णत्वाचे जे कार्य आता चालू आहे ते एका क्षणातच पूर्ण होणार नाही. वचन नीट वाचा, पाहा त्यात स्पष्ट लिहिले आहे. पूर्णत्वाचे आणि स्वतःला शुद्ध करून, परमेश्वरापुढे सिद्ध होण्याचे कार्य विश्वासी स्वतःच करतात; ही क्रिया त्यांनीच करावयाची आहे; हा एक असा अनुभव नाहीये जो “रिकाम-टेकडे बसल्याने” प्राप्त होतो. तुलना 1 करिं 9:27; कल 3:5; 1 योहान 3:3.खरे आहे की हे कार्य आपण आपल्या बलाने करू शकत नाही - रोम 8:13; गल 5:16,पाहा पवित्रीकरणाचे नोट्स - योहान 17:17-19;‘पवित्र’ यावर - लेवी 20:7.

**“परमेश्वराचे भय”*- पाहा 5:11; 1 पेत्र 1:17.‘परमेश्वराचे भय’ एक अत्यंत आवश्यक बाब आहे, जिची भूमिका “स्वतःला पवित्रतेच्या कार्यात पूर्ण करण्यामध्ये” महत्वाची आहे. (ईयोब 28:28; स्तो 34:11-14).

***7:2-3** हा 6:11-13.

बर्बादही केलेले नाहीये; [3]तुम्हांला दोषी ठरविण्यासाठी मी असे बोलत नाहीये कारण मी पूर्वीच तुम्हांला सांगून चुकलो आहे की तुम्ही आमच्या अंतःकरणात अशा प्रकारे वसलेले आहा, की तुमच्याबरोबर जगण्यामरण्यासाठी आम्ही तयार आहोत. [4]मला तुमच्यावर विपुल भरंवसा आहे आणि अभिमानही. आम्ही सर्वप्रकारच्या संकटांत (कष्टांत, छळांत) असतानाही तुम्ही आम्हांला धीर दिला, आम्हांला खुश करून * आमचे सांत्वन केले.

[5] *जेव्हा आम्ही मासेदोनियात आलो होतो तेव्हा आमच्या देहांस काहीही शांति मिळालेली नव्हती, कारण चारीं बाजूंनी आम्ही छळाने (संकटे) वेढलेले होतो बाहेर संघर्ष होता आणि मनांत भय. [6] *तरीपण परमेश्वर जो निराश लोकांची हिंमत वाढवितो, त्याने तीताच्या येण्याद्वारे आमची हिंमत वाढविली. [7] केवळ त्याच्या येण्याद्वारे आम्हांला प्रोत्साहन मिळाले असे नाही, तर तुमच्याकडून जे धैर्य व साहस त्याला मिळाले त्यामुळे देखील आम्ही उत्कंठित झालो. आमच्यासाठी असलेली तुमची लगन व ओढ, तुमची दुःखें आणि आमच्याप्रतची काळजी, या सर्वांविषयी खबरबात पोहचविली, याच कारणांमुळे माझा आनंद आणखी हमखास द्विगुणित झाला आहे.

[8] *मी जरी आपल्या पहिल्या पत्राने तुम्हांला शोकित केले होते, तरी मला त्याचा पस्तावा नाहीये जसा पूर्वी झाला होता. कारण मला असे आढळले की त्या पत्रामुळे तुम्हांला जो शोक झाला तो अल्पसमयाचाच होता. [9] *आता मी आनंदी आहे,पण यासाठी नाही की तुम्हांला दुःख झाले, परंतु याकरिताच की त्या शोकामुळे (परिणामी)तुमच्या अंतःकरणाचा पालट झाला. आमच्यातर्फे कोणत्याही बाबतीत तुमची हानि होऊ नये, म्हणूनच तुमचा शोक हा परमेश्वराच्या इच्छेनुसारच होता. [10] *जो शोक परमेश्वरातर्फे असतो, तो अंतःकरणाचा पालट (पश्चात्ताप) घेऊन येतो आणि त्या पालटाचा परिणाम तारण हाच आहे. असा शोक आपल्या आंत पस्तावा (आत्मग्लानि) उत्पन्न करीत नसतो, परंतु जगिक शोक * मरण घेऊन येतो. [11] *पाहा! या परमेश्वरप्रेरित (द्वारे) शोकाने तुमच्या जीवनांत किती बदल निर्माण केला आहे - म्हणजे प्रचंड तत्परता, अर्थात स्वतःला निर्दोष सिद्ध करण्याची आवड, किती रोष, किती भय, किती लालसा, किती उत्साह आणि दंड देण्याविषयीची (न्याय) कळकळ व तीव्र इच्छा निर्माण झालेली आहे! या सर्व बाबतींत तुम्ही सर्व प्रकारे निर्दोषी आहा हेच तुम्ही सिद्ध केलेले आहे.

---

*__7:4__ *“खुश करून”*- यावेळी त्याला जेव्हा कळले की करिंथाचे ख्रिस्ती कष्टांत व छळांतही आपल्या विश्वासात ठामपणे उभे राहिले, आणि त्यांनी परमेश्वराच्या वचनाचे आज्ञापालन करण्याचा सतत प्रयत्न केला तेव्हा पौलाला परमानंद झाला.

*__7:5__ पौल, जो एक महान प्रेषित होता, तो देखील भय व अस्वस्थता, बैचेनी व समस्या आणि संघर्षांवाचून जीवन जगत नव्हता, हे सर्व तर त्याच्या जीवनाचा एक भागच होती.

*__7:6__ हा 1:3-4.तीताने करिंथात पौलाला भेट दिली होती, आणि मग मासेदोनियात कोठेतरी तो पौलाकडे गेला होता.

*__7:8__ हा 2:3-4.पौलाने पाहिले की करिंथाची चर्च आतंरिक धोक्यात होती, तेव्हा त्याने त्यांना एक कठोर (कडक) पत्र लिहिले, त्या पत्रातील पौलाचा मजकूर वांचून, करिंथाच्या चर्चला शोक झाला/ दुःख झाले. त्याने त्यांना तीव्रपणे ते पत्र याकरिता लिहिले होते कारण त्याचे त्यांच्यावर असीम प्रेम होते आणि “परमेश्वराच्या सत्यावर/साठी ते ठाम उभे राहिलेले असे पाहण्याची त्याची इच्छा होती. प्रेम अशक्त, दुर्बळ, भावनिक आणि भावविवश नसते. “एकही शब्द न बोलता, कठीण भावना न दर्शविता, फक्त पाहात राहण्याची” प्रेमाची भूमिका नसते; ज्याच्यावर प्रेम असते त्याचा नाश होऊ नये म्हणून प्रेम चांगलेच भडकते, क्रोध व्यक्त करते.

*__7:9__ पौलाच्या पत्राने त्यांना थोडका वेळ शोकित व दुःखी केले खरे, पण त्यामुळे खूपच उत्तम परिणाम उत्पन्न झाला - तो म्हणजे ‘पश्चात्ताप’. त्यांनी त्या पत्राच्या मजकूराच्या परिणामी आपल्या अंतःकरणाचा पालट होऊ दिला. आपल्याठायी असलेल्या काही वाईट गोष्टी, दुष्टाई सोडून दिली. ते खोटया मार्गापासून मागे वळले आणि पुन्हा एकदां, पुर्वीपेक्षा कितीतरी अधिक पूर्ण अशा स्थितीत अंतःकरणाने परमेश्वराकडे वळले.

*__7:10__ ‘परमेश्वरातर्फे प्रेरित झालेले दुःख, असे दुःख आहे जे परमेश्वराद्वारे उत्पन्न होते; एक असे दुःख जे परमेश्वराच्या आत्म्याला शोकित करते (इफि 4:30). असे दुःख ज्यांना होते ते सर्व अशा गोष्टी सोडून देतात ज्यामुळे परमेश्वराला दुःख होत व ते पूर्णपणे परमेश्वराकडे वळतात.

* *“जगिक शोक”*- शोक परमेश्वराशी संबंधित नाहीये, पण तो स्वतःशीच संबंधित आहे. हा शोक (जगिक) होण्याची अनेक कारणें आहेत : तोटा होणे, निराशा येणे, अपयश येणे, स्वतःची इच्छा अपूर्ण राहणे, एखादया पापात पकडले जाणे इत्यादी. त्यामुळे चुटपूट लागते, मनस्ताप होतो, पण खरा पश्चात्ताप कधीच होत नसतो (मत्त 27:3-5). ज्या लोकांठायी जगिक शोक असतो ते पाप करीत-करीत पुढे जात असतात, दुष्टाई त्यांच्यात कायमच असते. जगाची प्रत्येक गोष्ट ज्या प्रकारे मृत्यूकडे घेऊन जाते, त्याचप्रकारे अशा लोकांचेही होते, हे सर्व त्यांना आतंरिक मरणाकडे नेते.

*__7:11__ पाहा परमेश्वरी शोक आणि पश्चात्ताप एकत्र येऊन कसे कार्य करतात. ही विशेष गोष्ट - 2:5-7 चा उल्लेख करते.

12 [*]तुम्हांला मी जे लिहिले त्याचा हेतू असा नव्हताच मुळी की कोणी अन्याय केला व कोणावर अन्याय झाला, परंतु याकडे लक्ष
दिले जावे की परमेश्वराच्या दृष्टीनें तुम्ही आमच्याप्रत किती गंभीर (कळकळ) आहा हे स्पष्टपणे दिसावे; 13 [*]यामुळे आमचे सांत्वन
झाले, तसेच तीताला झालेला आनंद पाहून आम्ही विशेषकरून आणखी गदगद झालो, कारण तुम्हां सर्वांमुळे त्याच्या जिवाला
तजेला (हिरवागार टवटवीतपणा) मिळाला होता. 14 कारण जर मी त्याच्यासमोर काही अभिमान बाळगला, तर मी अजिबात
लाजिरवाणा झालो (पाळी आली नाही) नाही. पण ज्या प्रकारे आम्ही तुम्हांला सर्व गोष्टींविषयी खरे खरे सांगितले होते, त्याच प्रकारे
आमचे 'अभिमान प्रदर्शन' देखील तीतापुढे सुद्धा खरे ठरले. 15 तेव्हा कशा प्रकारे आदर सन्मानाने तुम्ही त्याचा स्वीकार केला याचे
स्मरण होताच, तुमच्याप्रत त्याचे प्रेम आत्यंतिक उसळून येते. 16 मी विपुल आनंदी आहे कारण मी तुमच्यावर संपूर्ण (सर्व बाबतीत
भरपूर असा) भरंवसा करू शकतो.

# 8

1 [*]माझ्या बंधूभगिनींनो, आता आम्ही तुम्हांला परमेश्वराची ती महान कृपा (अनुग्रह) जी मासेदोनियातील चर्चवर[*] झाली
त्याविषयी कळवू इच्छितो[*]. 2 प्रत्येक प्रकारच्या क्लेशाद्वारे पारखले जाताना त्यांचा आनंद भक्कम झाला आणि भीषण दारिद्र्यांत
त्यांचे औदार्य (उदारता) विपुलपणे वृद्धींगत झाले. 3 त्यांच्याविषयी मी साक्ष देतो की त्यांनी आपल्या योग्यतेपेक्षा कितीतरी अधिक
दिले आणि ते देखील आपल्या मर्जीने! 4 हे दान देण्यासंबंधाने आणि पवित्र लोकांचे साहाय्य करण्यासाठी भागीदार होण्याविषयी
आम्हांला त्यांनी वारंवार विनंती केली. 5 [*]आमच्या आशेपलीकडे सर्वाधिक महत्वाची गोष्ट ही की त्यांनी प्रथम आपल्या स्वतःला
प्रभूप्रत समर्पित केले आणि त्यानंतर परमेश्वराच्या इच्छेस अनुसरून आमच्याप्रत देखील आपले समर्पण केले. 6 [*]म्हणून आम्ही
तीताला असा सल्ला दिला की जशी सुरवात त्याने पूर्वी केली होती, त्याचप्रमाणे तुमच्यामध्ये दानाचे हे कार्य देखील पूर्ण करावे[*].

---

[*]**7:12** हा 2:9."आमच्याप्रत" - म्हणजे परमेश्वराच्या सत्याप्रत देखील असा अर्थ होतो; आणि ही पौलासाठी एक अत्यंत गंभीर व महत्वाची गोष्ट होती.

[*]**7:13-16** ही वचनें या गोष्टीचे उदाहरण-प्रमाण आहे की विश्वासीं कशा प्रकारे एकमेकांचे जीवन हिरवेगार करू शकतात, अंतःकरणाला तजेला-टवटवीतपणा देऊ शकतो, एकमेकापासून प्रोत्साहन घेऊ शकतो, एकमेकाला उत्साहित करू शकतात, एकमेकांठायी व एकमेकांप्रत आनंद शोधून त्यात आनंदी होऊ शकतो. 'आत्में जिंकणाऱ्याला' जेव्हा, अंतःकरणाचा पालट झालेले विश्वासीं, सत्य मार्गावर चालतांना दिसतात, तेव्हा 'त्यांना' किती अभिमान व विपुल आनंद होतो, ही वचनें ते सुद्धा दर्शवितात.

[*]**8:1** हा अध्याय व पुढचा अध्याय त्या लोकांविषयीची कळकळ दर्शवितो जे यरूशलेमेत होते अर्थात, विश्वासींचा तो गट जो अत्यंत गरीब होता, जे अत्यंत गरजेत होते - पाहा 1 करिं 16:1-4.तेथील स्थानिक बाबींविषयी लिहून पौल गरजवंतांना देण्याविषयीचे काही सुंदर सिद्धांत आपल्याला शिकवतो.

[*] *"मासेदोनियातील चर्चने"*- (ज्यात फिलिप्पी व थेस्सलनीका यांचाही समावेश होता) अद्भुत व विस्मयकारक पद्धतीने "देण्याच्या कृपेविषयीचे" प्रदर्शन केले - कारण "हीच ती महान कृपा" होती जी परमेश्वराने त्या सर्व चर्चनां देऊ केली होती (वचन 1). तेथील विश्वासी अत्यंत गरीब होते. आणि त्यांचा भयंकर छळ होत होता. हे सर्व असूनही, त्यांनी दान दिले होते. त्यांनी दान दिले कारण त्याच्याठायी "विपुल आनंद" होता. त्याच आनंदाने त्यांनी दिले होते. पौलाने त्यांना असे करण्यावर भर दिला नव्हता. उलट त्यांनीच पौलाला कळकळीची विनंती केली होती की त्याने त्यांना दान देण्याची परवानगी द्यावी. त्यांना ठाऊक होते की "विश्वासी व ख्रिस्त" यांना देणे हा स्वानंदाचा-सुवर्णसंधीचा व त्यांचा विशेष हक्क होता, ते काही दुःखदायी कार्य नव्हते. जेव्हा देशातील आणि जगातील सर्व चर्च व विश्वासी हे सत्य ओळखून, त्यानुसार करतील, तेव्हा त्याद्वारे सर्व चर्च आणि हे जग किती आशीर्वादीत होईल!

[*] *"आम्ही तुम्हांला ... इच्छितो"*- अत्यंत सोप्या शब्दांत या भाषांतराचा लेखक तो मांडण्याचा प्रयत्न करतो.

[*]**8:5** पौलाच्या अपेक्षेपलीकडे त्यांनी केलेले होते. केवळ दानच देऊन ते थांबले नव्हते, पण महत्वाची गोष्ट ही की, त्यांनी स्वतःचे प्रभूंप्रत समर्पित केले आणि पूर्णपणे "परमेश्वराच्या सेवकांनी सांगितलेले कोणतेही कार्य करण्यांप्रत" आपले समर्पण केले. जे काही त्यांच्याजवळ होते ते सर्व परत परमेश्वराला देऊन ते आनंदित होत होते. तुलना रोम 12:1-2.

[*]**8:6** तीत करिंथाला गेला होता (7:6). आता पौलाने त्याला पुन्हा पाठविण्याची योजना केली (वचनें 16-18).

[*] *"पूर्ण करावे"*- असे वाटते की करिंथाच्या चर्चने जितके देण्याचे कबूल केले होते, ती रकम पूर्ण दिली नव्हती किंवा जितकी रकम ते सहजपणे देऊ शकत होते ती त्यांनी दिलेली नव्हती. (9:5)

7 [*]म्हणून जशी तुम्ही प्रत्येक क्षेत्रांत (सर्व बाबतींत) विश्वास, वचन, ज्ञान, सर्व प्रकारचा प्रयत्नशीलपणा आणि आमच्यावरील ते प्रेम
जे तुम्ही बाळगता, तशी दानाच्या या कार्यातही प्रगति करावी. 8 मी आज्ञा म्हणून नाही[*], पण दुसऱ्यांच्या उत्साहावरून तुमच्या
प्रेमाचा सच्चेपणा पारखण्यासाठी असे सांगतो आहे.
9 [*]आपल्या प्रभू येशू ख्रिस्तांची कृपा तुम्हांला ठाऊक आहे, की ते धनवान[*] असूनही तुमच्यासाठी गरीब[*] झाले यासाठीच, की
त्यांच्या गरीबीमुळे तुम्ही समृद्ध व्हावे.
10 या बाबीविषयी माझा असा सल्ला आहे व हे तुमच्या फायद्याचे आहे, की जे काही तुम्ही मागील वर्षी आरंभ केले आणि जे
करण्याच्या इच्छेविषयी देखील तुम्हीच प्रथम (पहिले) होता, 11 [*]तर मग तुमच्यासाठी हेच उत्तम आहे की आता हे कार्य तुम्ही पूर्ण
करावे. आरंभी तुम्ही दाखविलेल्या तत्परतेचा तुमच्या दानाशी मेळ व्हावा व तो सुद्धा तुमच्या पूंजी अनुसार (ऐपत) असावा.
12 कारण जेथे अंतःकरणाने जे काही (दांडग्या संकल्पाने) दिले जाते, ते ग्रहणयोग्य[*] (कबूल) होत असते, अर्थात 'जे तुमच्याजवळ
आहे त्या आधारे, कोणाजवळ काय नाहीये' या आधारे नाहीच मुळी.
13 मला असे म्हणावयाचे नाही की तुमच्या दानामुळे दुसऱ्याने सहज चिंतामुक्त व्हावे आणि तुम्ही उणीवा झेलीत बसावे. 14 आता
या समयी तुमच्या वैपुल्याने (समृद्धिने) त्यांच्या गरजा भागविल्या जातात जेणेकरून भविष्यकाळी, त्या लोकांच्या समृद्धिने
(विपुलता) तुमच्या गरजा पूर्ण व्हाव्यात आणि अशा प्रकारे समानता[*] व्हावी. 15 जसे लिहिले आहे की, 'ज्याने अधिक गोळा

---

[*]**8:7** 1 करिं 1:5-7.

[*]**8:8** *"आज्ञा म्हणून नाही"*- त्याला ठाऊक होते की देण्याची इच्छा 'उत्स्फूर्त' असावी, "स्वयंप्रेरित असावी; हृदयातून आनंदाने बाहेर आलेली असावी". परमेश्वराला बळजबरीने आणि स्वइच्छेवाचून दिलेले आवडत नाही (9:7). प्रेमाच्या आधारे, प्रेमवश होऊन जी देणगी दिली जाते, ती परमेश्वराला आवडते. 'देणे' ही विश्वासीची प्रभू प्रेमाखातर देण्याच्या प्रामाणिकपणाची, सात्विकतेची परीक्षा/कसोटी आहे. ही गोष्ट नेहमीच सत्य ठरते. जो कोणी ख्रिस्तांना देत नाही, तो त्याच्यावर प्रेम करीत नाही, त्याला काहीही वाटत असले, त्याचा काहीही विचार असला तरी. पौलाने त्यांना आज्ञा देण्याऐवजी, त्याच्यापुढे मासेदोनियाच्या लोकांचे उदाहरण प्रस्तुत/सादर केले. वचन 9 यात तो आणखी श्रेष्ठतम व थोर उदाहरणाविषयी बोलतो.

[*]**8:9** प्रभू येशूंनी असीमित कृपा भरभरून दिली, त्यांच्याठायी जी कृपा होती, त्यान्वये (त्यांनी) दाबून पूर्ण माप भरून दिले. प्रेमाखातर त्यांनी त्यांचेजवळ, जे सर्व होते, ते सर्व काही देऊन टाकले. परमेश्वर सर्व विश्वासींसाठी "देणाऱ्याचा" एक उत्तम नमूना आहे.

[*] *"धनवान"*- योहान 1:1-3; 17:5; कल 1:16; इब्री 1:2.

[*] *"गरीब"*- लूक 2:7; मत्त 8:20; 17:27; 27:46; फिलि 2:6-8; यश 53:2-6. हे सर्व "तुमच्यासाठी"- म्हणजे सर्व विश्वासींसाठी. ख्रिस्तांनी आपल्यावर प्रेम केले आणि स्वतःला आपल्यासाठी देऊन टाकले, "समृद्ध व्हावे" - बँकेत असलेले धन किंवा मालमत्ता नव्हे परंतु मत्त 19:28-29; योहान 14:2-3; रोम 8:17; 1 करिं 3:21-23; इफि 1:3,7,8; 1 पेत्र 1:4; प्रकटी 21:7 यांत दिल्याप्रमाणे. हे शक्य झाले फक्त "त्यांच्या गरीबीद्वारे" - म्हणजे, जर ख्रिस्तांनी आपले सर्वस्व देऊन, अपराध्यांच्या जागी मरण सोसले नसते तर "तारणाचे धन व संपत्ती" कोणालाही कधीही उपलब्ध झाली नसती, (कोणीही ते प्राप्त करू शकले नसते). या प्रेमाच्या व देण्याच्या कृपेविषयी, प्रेषितांनी आपल्या स्वामींचे, प्रभू येशू ख्रिस्तांच्या उदाहरणाचे अनुकरण केले - 6:10; प्रेषि 3:6; मत्त 19:27.आपण तसे करतो काय?

[*]**8:11-12** 'दिले जाते' हे एखाद्याजवळ काय आहे त्या प्रमाणात असावे (1 करिं 16:2). गरीब अधिक देऊं शकत नाही, श्रीमंताने कमी देऊ नये.

[*]**8:12** *"ग्रहणयोग्य"*- (वचन 12) - पाहा मार्क 12:41-44.

[*]**8:14** *"समानता"*- हा या वचनांचा "मुख्य शब्द" आहे. विश्वासींचे आपसांत प्रेमाचे ॠणानुबंध (नाते) असावेत. जेव्हा दुसऱ्या विश्वासींना गरज भासते तेव्हा त्यांनी मदत करण्याची तत्परता दाखवावी. तुलना प्रेषि 2:44-45; 4:32-35.पाहा 1 योहान 3:16-18.परत एकदा प्रभू येशू ख्रिस्त हे महान उदाहरण आहेत. त्यांच्याकडे जे काही आहे, ते सर्व त्यांनी विश्वासींशी बरोबर वाटून घेतले, त्यांनाही त्यात सहभागी केले. मग विश्वासींनी त्याच्याकडे जे काही आहेत तर एकमेकांशी व ख्रिस्तांशी कां वाटून घेऊ नये? जर ते सर्व ख्रिस्तांठायी एक देह आहे तर, काहींनी गडगंज धनी आणि काहींनी एकदम फक्कड (गरीब) कां असावे? त्यांपैकी काहींनी आवश्यक नसलेल्या सुखविलासासाठी संपत्ती कां व्यर्थ फेकावी, आणि दुसऱ्यांनी त्यावाचून निराश्रित, लाचार कां असावे? जेव्हा इस्त्राएली लोक वाळवंटात होते तेव्हा परमेश्वराने सर्व काही असे व्यवस्थित योजिले होते की तेथे समानता असावी (वचन 15; निर्ग 16:18). परमेश्वर आता विश्वासींना सर्व उत्तम वस्तु देतो, जेणेकरून सर्वांजवळ भरपूर असावे - काहींनी सर्व चांगल्या वस्तूंचा आनंद जीवनभर उपभोगावा (सर्व महागड्या वस्तु) आणि काहींनी जीवनभर त्यासाठी उपासमार करावी यासाठी

(साठविले) केले त्याच्याजवळ खूप अधिक राहिले (शिल्लक) नाही. ज्याने थोडके गोळा केले, त्याच्यासाठी तेवढेच पुरेसे होते
(किंवा उणीव भासली नाही).
[16] मी परमेश्वराचे आभार मानतो की मला जशी तुमच्याविषयी चिंता आहे, अगदी तशीच कळकळ तीताला सुद्धा आहे. [17] त्याने
आमची ही विनंती मान्य केली की तो तुमची भेट घेईल, वास्तविकता हीच आहे की तो स्वतः तुमची भेट घ्यावयास उत्सुक होता.
[18] येशू-वार्ता गाजविण्यासंबंधी सर्व चर्चेसमधे बहुचर्चित व प्रशंसनीय असलेल्या एका भावाला* आम्ही त्याच्याबरोबर पाठवीत
आहोत. [19] *दान पोहचविण्यासाठीच्या प्रवासाकरिता, त्याला चर्चने नेमले आहे - एक अशी सेवा जी प्रभूचे गौरव करिते आणि
आमचे साहाय्य करण्याची लालसा दर्शविते. [20] *‘स्वेच्छादान’ लोकांपर्यंत पोचविण्याकरिता सावधगिरी जपली जावी आणि
कोणालाही आमच्याकडे बोट दाखविता येऊ नये म्हणून आम्ही ही तजवीज (व्यवस्था) केली आहेच. [21] कारण आम्हांला या
गोष्टीची काळजी आहे की तेच केले जावे जे प्रभूच्या दृष्टीने आणि मनुष्यांच्याही दृष्टीने बरोबर (अचूक) आहे.
[22] त्याच्याबरोबर आम्ही आमच्या बंधूलाही पाठविले आहे, जो अनेकदां पारखला गेला आणि जो अनेक बाबतीत आवेशाने
भरलेला आहे, आणि आता तुमच्यावर त्याचा मोठा भरंवसा असल्यामुळे त्याचा जोश (उत्साह) अधिकच वाढलेला आहे;
[23] तीताविषयी जर कोणी विचारीत असेल तर तो माझा साथी आणि तुमच्यासाठी माझा सहकर्मी आहे. जर प्रश्न इतर भावांविषयी
उद्‌भवत असेल, तर ते चर्चचे पाठविलेले आणि ख्रिस्तांचा आदर करणारे* आहेत. [24] यास्तव आपले प्रेम आणि तुमच्याविषयीचा
आमचा जो विशेष अभिमान आहे* तो ‘चर्चसमक्ष’ प्रमाणासह* (सिद्ध करून) प्रगट करा.

## 9

[1] *पवित्र लोकांच्या या सेवेविषयी मी तुम्हांला लिहावे याची गरज नाहीये. [2] कारण साहाय्य करण्याच्या तुमच्या लालसेविषयी
मला आधीपासूनच ठाऊक आहे. मी मासेदोनियातील सर्व चर्चमध्ये तुमची प्रशंसा करीत राहिलो आहे, की एका वर्षापूर्वीच तुम्ही
ग्रीसच्या (अखया) लोकांना दान देण्याकरिता कसे तयार होता; खरे पाहता, तुमच्या या उत्साहाने बहुतेकांना (विश्वासींना) दान
देण्यासाठी प्रोत्साहित केले आहे, [3] *तरीही मी या बंधूंना पाठवीत आहे की यासंबंधाने तुमच्याविषयीचा आमचा आनंद व्यर्थ होऊ

---

नव्हे. परंतु याविषयीची कोणतीही आज्ञा नाहीये कारण ही तर प्रेमाची बाब आहे. देण्याविषयी कधीही भर देऊ नये; जबरदस्ती करू नये. मनुष्याची मालमत्ता त्याची स्वतःची आहे, आपल्या मर्जीप्रमाणे तो ती देऊ शकतो किंवा ठेवू शकतो. परंतु जर तो स्वतःसाठी विपुल ठेवून फक्त थोडके देतो, तर त्यात त्याची स्वतःची प्रचंड हानि होईल आणि ज्यांची तो मदत करू शकला असता पण त्याने ‘दानशूर’ होऊन केली नाही, त्यामुळे ते सर्व गरीब-गरजवंत लोक दुःख व हानि भोगतील.

*8:18 *“भावाला”*- आपल्याला ठाऊक नाही की येथे हा भाऊ आणि वचन 22 चा भाऊ कोण होता.

*8:19** 1 करिं 16:3-4.

***8:20-21** पाहा 12:16-18; 1 करिं 16:3.येथे एक ज्ञानपूर्ण उदाहरण आहे की परमेश्वरासाठीचे “फंड” (धन) कसे हाताळावे. ज्या प्रकारे पौलाने जे योग्य ते करावयास, व इतरांना आदर्श घेता यावा म्हणून जे दुःख सहन केले त्याचप्रकारे ख्रिस्ती विश्वासींनी देखील करावे. त्यांनी नेहमी लक्षात असू द्यावे की ते ‘परमेश्वराच्या धनाचे’ जे काही करतात, ते मनुष्यांनी पाहिले किंवा पाहिले नाही तरी ‘परमेश्वर ते सर्व पाहतो’ - इब्री 4:13.

***8:23** *“ख्रिस्तांचा आदर करणारे”*- तुलना योहान 17:10.अनेक लोक सतत ख्रिस्तांचा अनादर करीत आहेत.

* *“तुमच्याविषयीचा ...आहे”*- 7:14. ज्या लोकांना पौलाने सुवार्तेसाठी चर्चकडे पाठविले होते त्या लोकांची व त्या मंडळयांचीही त्याला काळजी होती. (11:28).

***8:24** *“प्रमाणासह”*- वचन 8. तुलना 1 योहान 3:17.जर आपण ख्रिस्त किंवा त्यांच्या सेवेसाठी देत नाही तर काय प्रमाण आहे, की आपण त्यांना ओळखतो आणि त्यांच्यावर प्रेम करतो? जर आपण त्यांच्यावर खरोखर प्रेम करीत असूं, तर आपण त्यांच्या सेवेवरही प्रेम करू, त्यांच्या लोकांवरही प्रेम करू व त्यांची मदत करण्याचा प्रयत्न करू.

***9:1-2** हा 8:6-7,10,11.

***9:3-4** हा 8:13,22-24.करिंथातील ख्रिस्ती लोकांनी सुरवातीला होईल तेवढी देणगी देण्यासाठी उत्साह व कळकळ दाखविली होती, पण असे वाटते की नंतर ते दान वास्तविकपणे गोळा करण्याबाबतीत ते निष्काळजी झालेत, आज देखील कितीतरी ख्रिस्ती असेच आहेत (8:10-11) एखाद्या कार्याच्या प्रारंभी ते भरपूर जोश-जोम व उत्साह दर्शवितात. पण काळ लोटल्यानंतर त्यांचा उत्साह थंडावतो, आणि प्रारंभिलेले कार्य पूर्णत्वास जात नाही. प्रियांनो हे अपरिपक्वतेचे व अस्थायीपणाचे लक्षण (खूण) आहे.

नये. जसे मी त्यांना सांगितलेले आहे तसेच तुम्ही देखील तयारीत असावे. [4]कारण की जर कोणी मासेदोनियाकर माझ्याबरोबर आला आणि त्याने तुम्हांला तयारीत नसलेले पाहिले, तर मात्र तुमच्यावर केलेल्या विश्वासाबाबत आम्हांला शरमिंदे व्हावे लागेल.
[5] [*]म्हणून या बंधूने तुमच्याकडे अगाऊ यावे असे मला आवश्यक वाटले, आणि पूर्वी ज्या 'स्वेच्छादानाची' (किंवा औदार्य-फळें) तुम्ही प्रतिज्ञा केली होती ते गोळा करून तयार ठेवा.

[6] [*]जो मनुष्य मोठ्या प्रमाणात (सढळ) पेरतो, तो मोठ्या प्रमाणात कापणी करील. जो उदार होऊन (विशाल अंतःकरणाने) पेरतो,
तो विपुल प्रमाणात कापणी देखील करील. [7] [*]प्रत्येकाने जसा आपल्या मनात इरादा केला आहे, त्याच प्रकारे दान द्यावे. कुरकुर न
करिता, कोणत्याही दडपणावांचून द्यावे, कारण आनंदाने व प्रसन्नतेने देणाऱ्यावर परमेश्वर प्रेम करितो. [8] [*]प्रत्येक प्रकारचा अनुग्रह
परमेश्वर तुम्हांला विपुलतेने देऊ शकतो, मग असे होईल की प्रत्येक समयी, सर्व काही ज्याची तुम्हांला गरज आहे ती पूर्ण होईल
आणि इतकेच केवळ नव्हे तर प्रत्येक चांगल्या (सत्कृत्य) कामासाठी तुमच्याजवळ भक्कम होईल. [9] [*]जसे लिहिले आहे की, 'त्याने

---

[*]**9:5** वचन 7. जेव्हा द्यावयाची वेळ येते, तेव्हा विश्वासींनी स्वतःसाठी जितके हवे तितके ठेवू नये, त्यांना देणे अपेक्षित आहे म्हणून बंधन समजून देऊ नये, 'देण्यांतून' पळवाट नाही तेव्हा द्यावेच लागेल या भावनेने देऊ नये.

[*]**9:6** तुलना नीति 11:24-25; 19:17; 22:8-9; लूक 6:38; गल 6:7.हा सिद्धांत नीट व खात्रीने लक्षात घ्या. ज्यांच्याकडे परमेश्वराने देण्याची सेवा सोपविली, परंतु ज्यांच्याठायी गरजवंतांना देण्याचे हृदय नाही म्हणून परिणामी,असे न देणारे लोक,या प्रवृत्तीमुळे आर्थिक व आतंरिक दृष्ट्या नेहमी गरीबच राहतील. प्रियांनो, या सिद्धांताची गंभीरतेने दखल घ्या.

[*]**9:7** चन 5;8:8. परमेश्वराला संतुष्ट करावयास जर आपल्याला दान द्यावयाचे असेल तर ते देणे अंतःकरणातून स्वईच्छेने व स्वानंदाने व्हावयास हवे; परमेश्वरावर आणि त्याच्या लोकांवर प्रेम दर्शविण्याच्या क्रियारूपात ते व्हावयास हवे; ही देणाऱ्यासाठी आनंदाची बाब असावी, उदास व पडक्या चेहऱ्याने केलेली क्रिया नव्हे; जर आपल्याठायी प्रेम आहे तर, जशी श्वास घेणे ही नैसर्गिक क्रिया आहे, तशीच "देणे" ही क्रिया नैसर्गिकरित्या आपल्यामध्ये आपोआप येईलच.

[*]**9:8** देण्याच्या नैसर्गिक वृत्तीने प्रसन्न अंतःकरणाने जे देणारे आहेत, त्यांचे कधीही नुकसान होणार नाही. याच्या विपरित जे काही आहे तेच सत्य होय. नीति 11:24-25.परमेश्वराला त्याच लोकांना देणे आवडते, ज्यांना गरजू विश्वासींना 'देणे' आवडते. परमेश्वर या सृष्टीचा व जगाचा शासक आणि राजा आहे. माणसांच्या योजना आणि प्रकल्प, जमीन, हवामानाची स्थिती, अर्थव्यवस्था आणि त्या सर्व गोष्टी ज्या मनुष्याला आर्थिकदृष्ट्या मोडू शकतात किंवा घडवू शकतात, त्या सर्व-सर्व परमेश्वराच्या हातांतच आहेत. ज्यांच्याठायी तो प्रसन्न असतो त्याच्या कल्याणासाठी व हितासाठी सर्व प्रतिकूल परिस्थिती अनुकूल करून ती कार्यशील करू शकतो (जी आवश्यक असते). इतकेच केवळ नव्हे तर, जर त्याची इच्छा असेल, व त्यामुळे त्याला आनंद मिळत असेल, तर परमेश्वर त्याच्यासाठी अद्‌भुत आश्चर्यकर्मेंही करू शकतो - 1 राजे 17:10-16; 2 राजे 4:1-7. सामान्यतः परमेश्वर (लोकांना अधिकतर), सामान्य मार्गांनीच आशीर्वाद देतो, तसे करतांना तो मनुष्य व परिस्थितीचा असा उपयोग करीतो की त्याच्या लाडक्यांची उन्नती व्हावी आणि गरीबी निर्माण करणारी कोणतीही विपत्ती येण्याची शक्यता असेल तर तो तिच्यापासून राखून (रक्षण) ठेवून विश्वासींवर आपली कृपा दर्शवितो. सर्वज्ञानी परमेश्वरास माहित आहे की त्याने आपली कृपा आपल्या लोकांवर अशा प्रकारे कशी ओतावी, की त्यांची सदैव उन्नती व्हावी; आर्थिकरीतिने आणि आध्यात्मिक रीतिनेही; (जर त्याच्यासाठी आर्थिक उन्नतीची त्यांची योजना असेल तर) त्याला नीटसे सर्व ठाऊक आहे की , काय, कसे व केव्हा करावे!!! लक्ष द्या की त्याचे कारण आहे, ज्यांना तो आशीर्वादित करितो, "त्याच्याजवळ प्रत्येक उत्तम कल्याणकार्यासाठी भरपूर असावे", पण त्या आशीर्वादीत लोकांनी खबरदारी घ्यावयाची आहे, कारण परमेश्वराने त्यांना उन्नती व समृद्धी दिल्यानंतर, जसे त्याला हवे तसे ते वागत नाहीत, तर जितक्या सहजतेने त्यांना दिले आहे, तितक्याच सोप्यारीतिने त्यांचे सर्व आशीर्वाद हिसकूही शकतो.

[*]**9:9-14** पौल आपल्याला प्रसन्नतेने व अंतःकरणाने देण्याच्या परिणामाविषयी सांगतो. त्याचे परिणाम, या जीवनात व भविष्यकाळी येणाऱ्या जीवनातही होतात (वचन 9). त्याचे परिणाम असे आहेत : (1) परमेश्वर कधीही विसरणार नाही की त्यांनी काय केलेले आहे (वचन 9. तुलना इब्री 6:10). (2) परमेश्वर त्यांची आर्थिक भरभराट करेल (वचन 10,11). (3) त्यांच्याद्वारे परमेश्वराच्या गरजू लोकांच्या गरजा भागविल्या जातील (वचन 12). (4) असे लोक ख्रिस्त व त्यांच्या सुवार्तेप्रत असलेले, जे आज्ञापालन आहे त्याचे प्रमाण सिद्ध करतील. (5) इतर लोक अत्यंत प्रेमळ व सौम्य होऊन (वचन 13), त्यांचे आपल्या प्रार्थनांत स्मरण करतील. (वचन 14). केवळ त्यांच्यामुळेच परमेश्वराला उपकारस्तुतिची भेट अर्पण केली जाईल (वचन 11,12,13). या शेवटच्या परिणामाची तीनदां पुनरावृत्ति झालेली आहे, पौलाच्या मतें हा सर्वोच्च महत्वाचा परिणाम होता. पाहा 1:11; 4:15.परमेश्वराचा महिमा हाच प्रत्येक बाबतीत मुख्य कळकळीचा व काळजीचा विषय होता (1 करिं 10:31) आणि परमेश्वराचे गौरव तेव्हाच होते, जेव्हा लोक जसे अपेक्षित आहे तसेच वागतात आणि जसे देवाचे आभार मानावे तसे मानतात, ज्या पद्धतीने प्रशंसा करावी तशी करतात.

दूरवर (मोठ्या क्षेत्रांत) पसरले (टाकले), त्याने गरीबांना दिले, त्याची सत्कर्मे युगानुयुग स्मरली जातील.'
10 *म्हणून परमेश्वर जो पेरणाऱ्याला बी आणि खावयास भाकर देतो, तुम्हांला बी देईल आणि इतकेच केवळ नव्हे तर ते बहुगुणित
करील आणि तुमच्यामध्ये उदारपणाचे व नीतिमत्वाचे मोठे पीक उत्पन्न करील. 11 त्यामुळे सर्व प्रकारे तुम्ही भरपूर केले जाल,
जेणेकरून हरेक संधी लाभली, की तुम्हांला उदार होता यावे (सढळ हाताने देणारे व्हावे) आणि जेव्हा आम्ही तुमचे दान
गरजवंतांपर्यंत पोचवू, तेव्हा त्यांनी परमेश्वराचे आभार मानावे.
12 कारण आर्थिक मदतीचे हे कार्य (सेवा) केवळ पवित्र लोकांच्या गरजाच भागवीत नाही, तर त्याद्वारे लोकांनी आनंदाने
परमेश्वराचे 'कोटी-कोटी आभार मानले जाणे' हे देखील होत असते . 13 *या सेवेचा परिणाम असा होईल की लोक परमेश्वराची स्तुति
करू लागतील, कारण तुमच्याठायी सर्व विश्वासींकरिता असलेले औदार्य असे प्रमाण देईल की तुम्ही ख्रिस्तांची येशूवार्ता
स्वीकारून, तिच्या आधीन असता आणि त्यांना (गरीब-गरजू विश्वासी), तसेच सर्वांना मुक्तहस्ते-सढळ हाताने दान देत असता.
14 तुमच्यावर परमेश्वराचा अपार अनुग्रह आहे, म्हणून ते आपल्या प्रार्थनेंत तुमची आठवण करितात आणि तुमच्याविषयी लालसा
बाळगतात.
15 *ज्या दानाची (कृपा) वाखाणणी (स्तुति) 'अवर्णनीय' आहे, अर्थात शब्दांनी ज्याची प्रशंसा केली जाऊ शकत नाही, त्या
दानाकरिता परमेश्वराचे आभार असोत.

---

*__9:10-11__ वचन 8 सांगते की परमेश्वर असे करू शकतो. आता पौल त्यांना सांगतो की जर ते आनंदाने व "उदारपणे-मुक्तहस्ते" देणारे आहे तर, परमेश्वर त्यांना खात्रीने आशीर्वाद देईल. पण होय, ही अशी प्रतिज्ञा नाहीये की परमेश्वर त्या प्रत्येकाला, जो सढळ हाताने देतो श्रीमंत करेलच. कितीतरी गरीब लोक आहेत जे आनंदाने देतात पण तरीही गरीबच राहतात (कदाचित तितके गरीब नाही जितके ते न दिल्यावांचून राहिले असते). काहीही असले तरी, आपण कधीही श्रीमंत होण्याकरता वेडे होऊ नये किंवा आर्थिक उन्नती, आणि ती देखील केवळ स्वतःच्या फायद्यासाठी आपल्या विचारांतही आणू नये. (पाहा 1 तीम 6:6-8). जर आपल्याला समृद्धी व भरभराट हवी असेल तर ती केवळ यासाठी असावी की आपण परमेश्वराकरता आणि त्याच्या सेवेकरता, त्याच्या लोकांकरता अधिकाधिक देण्यास समर्थ असावे; अन्यथा त्याची कधीही कल्पना करू नये. "परत अधिक मिळेल", या आशेने देणे ही अशी गोष्ट आहे जी परमेश्वराला आवडत नाही; ती जणू काही एक प्रकारची फसवणूक आहे, रंग बदलून स्वार्थी होण्यासारखे आहे. त्यामुळे आपल्याला परमेश्वराची कृपा लाभेल असे समजून व आपल्या बाजूने परमेश्वरासमोर ती जमेची बाजू आहे, या विचाराने ते करू नये. आठवणीत असू द्या : येशूंनी गरीब विश्वासींसांठी आशीर्वाद उच्चारिले, पण संपत्तीच्या साठ्यासाठी सावध केले (लूक 6:20,24).

*__9:13__ त्यांनी जे उदारपणे दिले त्याद्वारे हे सिद्ध झाले की त्याच्याठायी प्रेम व आज्ञापालन ही दोन्हीही आहेत. देण्याची प्रवृत्ती नसणे (उणे असणे) हे याच्या अगदी विपरित सिद्ध करेल.

*__9:15__ परमेश्वराची कृपादानें, मनुष्याकरता विपुल व महान आहेत. (स्तो 68:35; 127:2-3; 146:7; स्तो 2:6; मत्त 7:11; योहान 14:27; प्रेषि 5:31; 14:17; 15:8; 17:25; रोम 5:17; 6:23; 1 करिं 7:7; 12:7-11; इफि 2:8; फिलि 1:29; 2 तीम 3:16; याकोब 1:5,17). पण यात शंकाच नाही की पौलाच्या मनात सर्वश्रेष्ठ आणि अत्याधिक अवर्णनीय दानाविषयी होतेच, जे सर्व दानांपैकी बहुमूल्य असे दान आहे - योहान 3:16; रोम 8:32; यश 9:6.विश्वासींना 'देणे' काय आहे, हे कळावे आणि त्यांनी परमेश्वराला देणे शिकावे म्हणून तो या दानाविषयी बोलतो. विश्वासींच्या देण्याविषयीच्या सत्याचा सारांश 'देऊ शकणे' हे परमेश्वराचे दान आहे, परमेश्वराची कृपा त्याच्या (देणाऱ्यांच्या) हृदयात व जीवनात कार्य करीत असते (8:1; रोम 12:6-8). (2) 'देणे' ही एक सुवर्णसंधी (विशेष हक्क) आहे ज्याविषयीची आवड विश्वासींनी स्वतःठायी निर्माण करावयाची आहे. (8:4). (3) 'देणे' ही आपल्या प्रामाणिकपणाची, प्रेमाची व आज्ञापालनाची परीक्षा आहे. काहीही न देणे म्हणजे काहीही प्रेम नसणे, थोडके देणे म्हणजे थोडके प्रेम असणे, भरपूर देणे म्हणजे भरपूर प्रेम असणे (8:8). (4) 'देणे' हा परमेश्वराचा स्वभाव आहे (8:9). लहानसहान देणगी देखील परमेश्वराला मान्य आणि ग्रहणयोग्य आहे पण तेव्हाच जेव्हा हृदय स्वच्छ आहे (8:12; मार्क 12:41-44). (5) 'देणे' हे एका पुलाचे कार्य करते, जो 'भरपूर असणारे व गरजू असणाऱ्यांच्या' मधील तफावत कमी करण्यास मदत करतो. (8:13). (6) 'देणे' म्हणजे देवाच्या लोकांची सेवा करणे होय (9:1). (7) "देण्याची क्रिया" मोकळीक व प्रसन्नता यांनी समृद्ध असावी (9:5,7). स्वतंत्रपणे द्यावे, दडपणाखाली नव्हे. (8) 'देण्याची क्रिया' बक्षिस घेऊन येईलच (9:6,8-11,14). (9) 'देणे' हा उपकारस्तुतिचा व परमेश्वराची प्रशंसा करण्याचे उगमस्थान आहे (9:11-13). देण्यासंबंधिची इतर वचनें : निर्ग 35:5-9; लेवी 7:12-13; 27:30; गण 18:21,24; अनु 14:28-29; 15:10; 2 शमु 24:24; 1 इति 29:3,5,9,14; स्तो 11:1-2; मलाखी 1:7-8,14; 3:8-10; मत्त 6:1-2,19,20; 19:21; लूक 6:38; प्रेषि 20:35; रोम 12:13; 1 तीम 6:18-19; इब्री 6:10; याकोब 2:15-16; 1 योहान 3:17.

# 10

1 *येशू ख्रिस्तांसारखी नम्रता व दीनता* बाळगून मी तुम्हां लोकांना विनंती करितो आहे - जरी तुम्हांला असा भ्रम आहे, की मी
वैयक्तिक रीतिने भित्रा आहे पण तरीही, लिहिलेल्या पत्रांद्वारे मी पुष्कळ निर्भय* वाटतो. 2 *ठीक आहे, तुमच्यातील जितक्या
लोकांचा विचार आहे की आम्ही जगिक पद्धतीने* (शैलीने) जगतो, त्यांना मी विनंती करितो की त्यांनी आम्हांस कठोर व कडक
पद्धतीने त्यांच्याशी व्यवहार करण्यास भाग पाडू नये; 3 *कारण आम्ही मनुष्य (दैहिक) आहोत तरी देखील आमची युद्ध- शैली
(पद्धत) जगिक नाहीये, 4 कारण आमच्या लढाईची हत्यारें, या दुनियेत उपयोगांत आणली जाणारी युद्ध-शस्त्रें नव्हेत, परंतु
किल्ल्यांची तटबंदी (जगिक विचारांची) जमीनदोस्त व उध्वस्त करून टाकण्याकरिता आणि खोट्यातर्क-वितर्कांचा विनाश
करण्याकरिता परमेश्वराद्वारे सामर्थी आहेत. 5 म्हणून आम्ही परमेश्वरी ज्ञानाविरूद्ध उठणारी प्रत्येक कल्पना आणि एकूणएक उंच बाब
रद्द आणि प्रभावहीन करून प्रत्येक भावना कैद करतो व तिला ख्रिस्तांचा आज्ञाधारक (मान वाकविणे) करितो. 6 *जेव्हा तुम्ही

---

*__10:1__ हा 11:10.व अध्याय 10-13 यांत, करिंथातील खोट्या शिक्षकांकडे व त्यांच्यापासून शिकणाऱ्यांकडे पौलाचा संकेत आहे . या खोट्या शिक्षकांनी बिघडविलेली येशूवार्ता गाजविली होती (11:4). ते खोटे शिक्षक सैतानाने पाठविलेले "सैतानाचे सेवक" होते, जे करिंथातील ख्रिस्ती विश्वासींना पांगविण्यासाठी पाठविलेले होते (11:13-14). त्यांना अभिमान होता की ते खरे प्रेषित आहेत (11:5,12). त्यांनी पौलावर आणि त्याने प्रचार केलेल्या सुवार्तेवर आक्रमण केले, म्हणून आपला पक्ष सबळ करून, पौल म्हणतो की तो एक खरा प्रेषित होता हे सत्य आहे. हे तो स्वतःसाठी नव्हे, तर तो करिंथाच्या चर्चसाठी (12:19) करीत होता. तो विश्वासींच्या आतंरिक स्थितीविषयी काळजीत होता (11:3; 12:20-21) त्याला ठाऊक होते की जर करिंथाच्या विश्वासींनी त्याला अमान्य केले, नाकारले आणि तो ख्रिस्तांचा खरा प्रेषित आहे ज्याद्वारे परमेश्वर बोलतो, याविषयी नकार दिला तर स्थिती आणखी चिंताजनक व गंभीर होईल.

*__10:1__ *"ख्रिस्तांसारखी नम्रता व दीनता"*- मत्त 11:29; 12:20; यश 40:11.जसे येशू वागले तसेच पौल त्यांच्याशी वागणार होता, तो आपला प्रेषितपणाचा अधिकार गाजविणार नव्हता, परंतु त्यांना प्रेमपूर्वक विनंती करणार होता. (13:10).

* *"निर्भय"*- करिंथातील काही लोक त्याच्यावर दोष लावित होते की तेथे असतांना तो भित्र्यासारखा वागला, आणि फक्त पत्रातच त्याने धीटाईने त्यांना लिहिले.

*__10:2__ पौल निर्भयपणे-धीटाईने, "खोटेपणाने कडकपणे व कठोरतेने' वागू शकत होता, पण त्याची आशा होती की त्यांनी त्याला तसे वागावयास भाग पाडू नये.

* *"जगिक पद्धतीने"*- हा आणखी एक चुकीचा दोष होता, जो त्यांनी पौलावर लाविला.

*__10:3-5__ सत्य व त्रृटि यातील युद्धाविषयी पौल बोलतो, अर्थात परमेश्वराचे सत्य आणि मनुष्याच्या चुका. जग ख्रिस्तांचे सत्य नष्ट करते, तोच त्याचा हेतू आहे. परमेश्वराच्या खऱ्या सेवकांनी चुका व त्रुटि नष्ट करून लोकांना ख्रिस्तांच्या आज्ञापालनापर्यंत आणावे. ख्रिस्त सेवकाची हत्यारे वेगळी व जगाची हत्यारे वेगळी आहे. जगात असूनही विश्वासीने आपल्या 'सत्या'च्या युद्धात जगिक हत्यारें वापरावयाची नाहीत. जगिक हत्यारे : हिंसा, बलप्रयोग, चलाखी, जादूटोणा, तर्क इत्यादि आहेत आणि पतित स्वभावातून येणारी प्रत्येक पद्धत. विश्वासींजवळ ही हत्यारें आहेत (6:7; इफि 6:17), ती आतंरिक शस्त्रें आहेत. पौल परमेश्वरी शक्तीवर (जी सत्य व नीतिमत्वाने कार्य करते त्यावर) अवलंबून होता. परमेश्वराच्या त्या महान शिपायाची हत्यारे होती : परमेश्वराच्या आत्म्याची भरपूरी, प्रामाणिकपणा, सात्विकपणा, सत्य बोलणे, प्रेमाने सत्य पटवून देणे. प्रियजनहो, ही परमेश्वरी हत्यारें, ईश्वरी सामर्थ्याने विपुल आहेत. त्याच्या साहाय्यानेच तो शत्रूंचे किल्ले व गढ नष्ट करू शकला, भुईसपाट करून त्यांचा समूळ विध्वंस करू शकला. सैतानाचे गढ : दुष्टाई, अविश्वास, लबाड धर्मांचे किल्ले, परमेश्वराच्या सत्याविरूद्ध वादविवाद, ज्ञान व सामर्थ्य दाखविण्याचा ढोंगीपणा. परमेश्वराच्या सैनिकाने परमेश्वरी हत्यारांनी आतंरिक युद्ध जिंकले. जगात सत्य व असत्य यांच्यात महायुद्ध चाललेले आहे. पौलाने मनुष्याचे ज्ञान, विचार, प्रत्येक धार्मिक विचार, ख्रिस्तांच्या पायाखाली तुडविले आणि ते त्याच्या न्यायाकरता, ख्रिस्तचरणी आणले. केवळ अंतःकरण व वैचारिक शक्ति नव्हे तर सर्व मनुष्यांनी, त्याच्याप्रमाणेच परमेश्वरा- पुत्राच्या आणि त्यांनी शिकविलेल्या सत्याच्या आधीन व्हावे, अशी पौलाची इच्छा होती. जी अंतःकरणें व जे विचार ख्रिस्तांची आज्ञा पाळण्यास तयार असतात तेच "योग्य" ठरतात. स्वाभाविकरीतिने, मनुष्याचे मन, त्याच्या इच्छे आणि कृतीप्रमाणे, पतित आणि अपराधमय आहे (रोम 8:6-7; इफि 4:18). परमेश्वराने जसे योजिले होते, तसा विचार करण्याकरता, लोकांना एका नवीन मनाची गरज आहे - रोम 12:2; इफि 4:23; फिलि 2:5.पौलाने केलेली मनुष्य व परमेश्वरी बुद्धीची तुलना पाहा - 1 करिं 1:17—2:16; 3:18-20; कल 2:8.

*__10:6__ पौल त्यांना प्रत्येक संधी देऊ इच्छित होता, ज्याद्वारे त्यांनी सत्याप्रत प्रतिसाद देऊन आज्ञापालन करावे; सरतेशेवटी त्यांना कळावे की त्याला आज्ञा मोडणाऱ्यांना दंड देण्याचाही 'विशेषाधिकार' आहे. तुलना 13:10; 1 करिं 4:21; 5:3-5.

संपूर्ण रीतिने आज्ञा पाळावयास तयार असता तेव्हा आम्ही आज्ञाभंगाच्या प्रत्येक कार्याला दंड देण्याकरिता तयार असतो.
7 *तुमचे नेत्र बाहेरील गोष्टीवर आहेत. जर कोणाला असा भरंवसा आहे की तो ख्रिस्तांचा आहे तर त्याने याची देखील जाणीव
ठेवावी, की जसा तो ख्रिस्तांचा आहे तसेच आम्हीही ख्रिस्तांचे आहोत; 8 तुम्हांला असे वाटणे शक्य आहे की प्रभूने दिलेल्या
अधिकाराविषयी आम्ही गर्व * करीत आहोत, पण आमचा अधिकार तुमच्या उन्नतिसाठीचा आहे नुकसान करण्यासाठीचा नव्हे,
म्हणून मी आपल्या अधिकाराच्या उपयोगाविषयी लाजणार नाही. 9 आपल्या पत्रांनी मी तुम्हांला भीति घालत नाहीये. 10 *कारण
काही लोक म्हणतात की, “त्याच्या पत्रांत तो वजनदार व ताकदी दिसतो खरा, तरी तो कमजोर आहे आणि त्याच्या बोलण्यात
काहीही ताकद नाही”. जो कोणी असे म्हणतो त्याला कळावे की जेव्हा आम्ही येऊ तेव्हा तितक्याच वजनदार व प्रभावी रीतिने
बोलू, अगदी जसे आम्ही पत्रांत लिहीतो त्यांच शब्दांप्रमाणे. 11 ज्या कोणाला असे वाटते त्याने लक्षात ठेवावे, की जशी आमच्या
गैरहजेरीत आमच्या पत्रांतील वचनें आहेत, तशीच तुमच्यासमोर आमची कृत्येंही असतील.
12 *आम्ही आपली गणना किंवा आपली तुलना त्या लोकांशी का करावी जे स्वतःच आपली प्रशंसा करितात आणि स्वतःची
आपसांत मोजमाप करितात, इतकेच केवळ नव्हे तर ते एकमेकांशी तुलना करून महामूर्ख ठरतात, कारण असे काहीही (मूर्खपणाचे
धाडस)करण्याची आमची हिंमत नाहीये; 13 आम्ही मर्यादेबाहेर अजिबात अभिमान * बाळगणार नाही, परंतु त्याच सीमेपर्यंत बाळगू
जी परमेश्वराने आमच्याकरिता आखलेली आणि ठरविलेली आहे, या मर्यादेत तुमचाही समावेश आहे आणि त्यानुसारच आम्ही
अभिमान सुद्धा बाळगू. 14 आम्ही आपली सीमा * वाढवून मर्यादेचे अतिक्रमण करीत नाही, जसे तुमच्यापर्यंत पोचलो नसतो त्या
स्थितीत झाले असते, परंतु ख्रिस्तांची वार्ता ऐकवीत आम्ही तुमच्यापर्यंत पोचलोच आहोत. 15 *मर्यादेबाहेर जाऊन वाजवीपेक्षा
जास्त प्रमाणांत, आम्ही दुसऱ्यांच्या श्रमांसंबंधाने अभिमान बाळगून मिरवीत (फुगत) नाही, पण आम्हांला हीच उम्मेद आहे की
जसजसा तुमचा विश्वास वाढत जाईल, तसतसे आम्ही आपल्या मर्यादेनुसार तुमच्यामुळे आणखी अधिक वृद्धींगत होत जाऊ.
16 *यासाठी की आम्ही तुमच्या जवळच्या क्षेत्रांत जाऊन येशू-वार्ता प्रसार यासाठी करू, जेणेकरून आम्ही दुसऱ्यांच्या क्षेत्रांत
(अगोदरच) झालेल्या सेवेविषयी गर्व करू नये, 17 *परंतु जर एखाद्यास अभिमान बाळगावायचा असेल तर त्याने प्रभूविषयी घमेंड
बाळगावा. 18 *कारण जो स्वतःची प्रशंसा करून स्वतःचाच महिमा साधतो, तो नव्हे तर ज्या कोणाची प्रशंसा स्वतः प्रभू करतो
त्याचाच स्वीकार केला जातो.

# 11

*10:7 वचन 12;5:12.

*10:8 *“गर्व”*- नोट्स 1:12चे

*10:10 वचन 1. काहींचा विचार होता की प्रचारात पौल वजनदार नव्हता, त्याच्या बोलण्यात ताकद नव्हती, त्याच्यात मानवी ज्ञानाची उणीव होती (11:6) सत्य सादर करतांना तो खूपच सौम्य व दीन वाटत होता; कमीत कमी इतके तर ते खरेच बोलले की त्याची “पत्रें वजनदार व सामर्थ्याने भरलेली होती”.

*10:12 लोकांनी दुसऱ्याशी आपली तुलना केली तर त्यात पूर्ण प्रामाणिकपणा नसतो. ते स्वतःचीच फुशारकी शोधतील, पण पौलाला हा खेळ खेळावयाचा नव्हता. त्याला ठाऊक होते की तुलनेसाठीचा आणखी “एक उंच स्तर” आहे. ख्रिस्त आपला नमूना आहेत, जर आपण आपली तुलना त्यांच्याशी केली तर, कोणीही स्वतःला उंच-उत्कृष्ट समजू शकणार नाही.

*10:13 *“अभिमान”*-- 1:12.

*10:14 *“सीमा”*- हे सर्व प्रेषित, येशूवार्ता गाजविणारा आणि शिक्षक होऊन सेवा करणाऱ्या पौलाविषयी म्हटले जाते आहे. त्याच्या सेवेची सीमा करिंथापर्यंत पोहंचली होती. तो प्रथम ‘मनुष्य-प्रेषित प्रचारक’ होता जो येशूवार्ता गाजविण्यासाठी तेथे गेला, आणि चर्चची स्थापना केली (1 करिं 4:14-15; 9:2)

*10:15 लबाड प्रेषित करिंथात आले आणि त्यांनी ती मंडळी(चर्च) आपली/त्यांची होण्याचा दावा केला होता. असे खोटे शिक्षक करतातच. पौल, करिंथातील आपल्या सेवेचा गर्व बाळगत नव्हता.

*10:16 पौलाची इच्छा होती की तेथील चर्चने सत्यासाठी अधिक ठाम उभे राहावे, म्हणजे तो आपला वेळ व सामर्थ्य इतर दुसऱ्या क्षेत्रात लावू शकेल - तुलना रोम 15:20-22.

*10:17 यिर्म 9:24; 1 करिं 1:31.

*10:18 वचन 12. लबाड शिक्षकांना स्वतःची प्रशंसा हवी होती, त्यांना लोकांची स्तुति हवी होती (3:1). तुलना योहान 5:44.पौलाला फक्त परमेश्वराचीच मान्यता व प्रशंसा हवी होती (1 करिं 4:3-5; गल 1:10; 1 थेस्स 2:4).

[1] माझा थोडका मूर्खपणा सहन करून तुम्ही थोडा धीर धरावा, अशी माझी इच्छा होती. होय, तुम्ही तर माझ्याबरोबर धीर धरीत आहातच. [2] त्याने/तिने इतर कोणाचाही होऊ नये म्हणून त्याच्यावर प्रेम करणाऱ्याविषयी परमेश्वर जशी ईर्षा[*] बाळगतो, अगदी तसाच परमेश्वरी प्रेमयुक्त हेवा मी तुमच्याविषयी बाळगतो, यासाठी की एका नवरीसाठी बोलणी करावी तशी मी सुद्धा तुम्हांला एका पवित्र कुमारीप्रमाणे ख्रिस्तांच्या[*] सुपूर्द करावे. [3] [*]पण मला या गोष्टीचे भय आहे की ज्याप्रमाणे सापाने हव्वेला छळले होते त्याप्रमाणे तुमची मनें ख्रिस्तांप्रत, शुद्ध व निष्कपट समपर्णापासून दूर तर होणार नाहीत ना! [4] [*]कारण जर कोणी येऊन तुम्हांला प्रचार केलेल्या येशू ख्रिस्तांव्यतिरिक्त अन्य दुसऱ्या येशूविषयी शिकविले, किंवा अन्य कोणता आत्मा जो तुम्हांला पहिले मिळाला नव्हता त्याविषयी शिकविले, किंवा तुम्ही स्वीकारलेल्या येशू-वार्तेपेक्षा वेगळी येशू-वार्ता गाजविली असेल, तर तुम्ही अतिशय सोप्या-सहज रीतिने तिचे स्वागत करण्यासाठी पुढे जावयास तयार असता; [5] अन्य कोणत्याही विशिष्ट आणि उत्कृष्ट प्रेषितांहून मी आपल्या स्वतःला कमी मानत नाही. [6] जरी संदेश देण्यात[*] मी निपुण नाही तरीही मी ज्ञानांत[*] उणा नाही, आणि सर्व प्रकारे सर्व गोष्टींसंबंधाने आम्ही हे स्पष्ट स्पष्ट सांगितलेले आहे.

[7] [*]परत काहीतरी मिळण्याची अपेक्षा न करिता, दीनतेने येशू-वार्ता गाजवून मी तुम्हांला उंच उचलून घेतले, हा काय मी गुन्हा केला आहे? [8] [*]दुसऱ्या चर्चपासून आर्थिक मदत घेऊन मी तुमची सेवा केली. [9] [*]तुमच्याबरोबर राहत असताना ज्या वेळी मला गरज होती, त्या वेळी मी कोणावरही भार झालो नाही, कारण मासेदोनियाहून आलेल्या भावांनी माझी गरज भागविली होती. मी तुमच्यावर ओझे झालो नव्हतो आणि होणार देखील नाही. [10] [*]जर ख्रिस्तांचे सत्य माझ्यामध्ये आहे, तर अखया देशात कोणीही या

---

[*]**11:2** *"ईर्षा"*- तो आतंरिक बाबींविषयी बोलतो आहे. करिंथातील काही लोक, लबाड शिक्षकांचे ऐकत होते, त्यामुळे पौलाला भय वाटले की जे काही त्याने सत्याविषयी त्यांना शिकविले होते, त्याचा ते त्याग करतील. शब्द 'ईर्ष्या' संकेत करतो की त्याचे त्यांच्यावर किती प्रेम होते. तो त्या विश्वासींना स्वतःसाठी किंवा स्वतःच्या स्तुति-महिमेसाठी राखून ठेवण्याचा प्रयत्न करीत नव्हता, या गोष्टीकडे विशेष लक्ष द्या. त्या लोकांचे ख्रिस्तांशी असलेले जे नाते होते त्याविषयी तो गंभीरतेने काळजी करत होता.

[*]*"ख्रिस्तांच्या"*- मत्त 22:1-2; योहान 3:29; रोम 7:1-4; इफि 5:24-33; प्रकटी 19:6-9.तुलना स्तो 45:9-15; यश 54:5; यिर्म 3:14,20; होशेय 2:16,19.

[*]**11:3** उत्प 3:1-7.तो हव्वेविषयी बोलतो, ते योग्यच आहे, कारण हव्वा हीच पहिल्या आदामाची नवरी होती आणि चर्च ही शेवटल्या आदामाची नवरी आहे (1 करिं 15:45) आणि हव्वा फसविली गेली, आदाम नव्हे (1 तीम 2:14) अगदी त्याचप्रमाणे सैतानाच्या धोक्यामुळे करिंथाची चर्च फसविली जात होती (वचनें 13-15).

[*]**11:4-5** पौल कारणे देतो की तेथील काही ख्रिस्ती लोकांसाठी कां भयभीत होता. त्याला वाटत होते की सत्याच्या प्रेमाविषयी ते कमी होत आहेत, आणि त्यांना चुकीविषयीची जाणीवही नव्हती. त्यांच्यात ही जाणीव नव्हतीच की त्यांनी लबाड शिक्षकांविरूद्ध ठामपणे उभे राहावयाचे आहे; ती क्षमता त्यांच्याठायी नव्हतीच त्यामुळे ते इतके सहनशील होते की पौलाला आश्चर्य वाटत होते, त्याला ठाऊक होते की "खोटे शिक्षक सहन करून घेणे" म्हणजे "सत्याविषयीचे प्रेम कमी होणे" असते. लक्षात ठेवा की प्रत्येक धार्मिक शिक्षकाजवळ ज्याच्याठायी एक किंवा दुसऱ्या प्रकारचा आत्मा आहे, त्याच्याठायी परमेश्वराचे सामर्थ्य नाहीच. प्रत्येकजण जो येशूवार्ता गाजवीत आहे, तो ख्रिस्तांची सत्य येशूवार्ता गाजवित नाहीये. (पाहा गल 1:6-9; 1 योहान 4:1). पौल त्यांची टिंगल करून लबाड शिक्षकांना 'खास - सुपर - उत्कृष्ट आणि विशिष्ट प्रेषित म्हणतो', कारण ते तसे मोठमोठे दावे करीत होते.

[*]**11:6** *"संदेश देण्यात"*- 10:10; 1 करिं 2:1-5.

[*]*"ज्ञानांत"*- 1 करिं 2:6-16; गल 1:11-12.

[*]**11:7-12** हा 1 करिं 9:4-15.कदाचित त्याच्या शत्रूंनी-विरोधकांनी म्हटले होते की, पौलाने तेथील चर्चकडून कोणतीही आर्थिक मदत घेतली नव्हती कारण त्याला ठाऊक होते की तो खरा प्रेषित नाही, तो त्या लायकीचा नाही आणि म्हणूनच तो आपल्या हातांनी कमाई करून उदर-निर्वाह करीत आहे (प्रेषि 18:3) आणि तो सन्माननीय नव्हताच, त्याहून खाली पातळीचा होता. पण पौल म्हणतो की, त्याचे ध्येय फक्त, त्यांच्याविषयीचे प्रेम होते (वचन 11), त्याची इच्छा "त्यांची उन्नति" व "आतंरिक" पातळी उंचावणे हीच होती (वचन 7).

[*]**11:8** पौल येथे अलंकारिक भाषा वापरून बोलतो आहे. त्यांनी इतर चर्चना मागितले नव्हते , अर्थात लुबाडले नव्हते.त्यांनी जेव्हा दिले तेव्हा त्याने ते घेतले, कधी कधी तर देणारे स्वतःच गरीब होते. त्याला त्या गरीबांपासून घेणे, म्हणजे श्रीमंत चर्चची सेवा करण्यासाठी गरीब चर्चला लुबाडल्यासारखे/लुटल्यासारखे वाटत होते (8:14).

[*]**11:9** कधी कधी पौलाने विश्वासींकडून मदत घेतली (मान्य केली) होती. पण असे वाटते की एखाद्या चर्चमध्ये सेवा करीत असतांना, त्या विशिष्ट समयी त्याने तसे केलेले नव्हते.

[*]**11:10** 1 करिं 9:15-18.

अभिमानपासून मला रोखू शकत नाही (शकणार नाही), [11] याकरिता का की मी तुमच्यावर प्रेम करीत नाही? परमेश्वराला ठाऊक आहे की मी प्रेम करितो. [12] *जे मी करीत आहे ते करीत राहीनच, मी सर्व असे निमित्त (संधी) कापून संपवीनच, अर्थात जे गर्वाने भरून ज्या गोष्टींद्वारे आमच्यासारखेच असण्याचा दावा करितात, त्या सर्व लोकांचे मोके मी संपवीन.

[13] *कारण असे लोक खोटे प्रेषित, कपटी-धोकेबाज कार्यकर्ते आहेत, जे ख्रिस्तांच्या प्रेषितांचे रूप धारण करितात. [14] *यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही, कारण सैतान स्वतःच ज्योतिर्मय देवदूतासारखे रूप धारण करितो. [15] त्याच्या (सैतानाच्या) सेवकांनी मशीहांच्या सेवकांचे रूप धारण करावे, ही काही मोठी किंवा अशक्य बाब नाहीये, पण शेवटी त्यांना त्यांच्या वाईट कृत्यांची जी शिक्षा मिळावयास हवी ती अवश्य मिळेलच.

[16] *मी पुन्हा म्हणतो की कोणीही असे समजू नये की मी मूर्ख आहे, पण जर समजत असेल तर कमीत कमी मला मूर्ख समजून तरी, त्यांनी माझा स्वीकार करावा जेणेकरून मी सुद्धा थोडाफार अभिमान करू शकेन. [17] असा अभिमान प्रभूच्या आज्ञेनुसार नाहीये, पण 'मी एक मूर्ख' म्हणून (मूर्खाप्रमाणे) बोलतो आहे; [18] यास्तव पुष्कळ लोक जगिक, शारीरिक, किंवा ज्याही प्रकारचा अभिमान करतात, तसाच मीही करीन, [19] *कारण तुम्ही इतके शहाणे आहा की तुम्ही मूर्खांना सहन करून घेता. [20] जर तुम्हांला कोणी गुलाम

---

*__11:12__ यात शंकाच नाही की, करिंथात खोटे प्रेषित ख्रिस्ती विश्वासींकडून संदेश देण्याबद्दल पैसे घेत होते (2:17). आपण पौलासारखेच आहोत, असे मानणे त्यांना आवडत होते; पण पौल स्पष्टपणे दाखवितो की त्याने त्यांना मोफत येशूवार्ता गाजविली, म्हणून खोटे शिक्षक त्याच्या बरोबरीचे नव्हते आणि त्याने हीच वृत्ती दाखविण्याचे सतत कायम ठेवले.

*__11:13-15__ परमेश्वराच्या आत्म्याच्या प्रेरणेने पौलाने करिंथातील लबाड शिक्षकांची पोलपट्टी उघडून उजेडात आणली. ख्रिस्तांच्या नांवाने येणाऱ्या प्रत्येक युगाच्या, प्रत्येक ठिकाणाच्या अशा लोकांनाही त्याने उघड केले. तो त्यांच्याविषयी सहा गोष्टी सांगतो : (1) ते "खोटे" आहेत - ते म्हणतात की परमेश्वराने त्यांना पाठविलेले आहे, पण असे अजिबात नाहीये. (प्रकटी 1:2; यिर्म 23:1) तुलना करा. (2) ते "धोका देणारे सेवक" आहेत - त्यांच्या पद्धती आणि संदेश, फसविणारे आहेत, त्यांचा हेतू दुसऱ्यांना धोका देणे आहे (मत्त 24:11,24; रोम 16:18; 2 थेस्स 2:9-10). (3) ते बाहेरून वेगळे दिसतात, ते सत्य लपवून लबाड बोलतात, बहाणा करतात आणि असे भासवितात की ख्रिस्तांनीच त्यांना पाठविलेले आहे, परंतु त्यांचे दुष्ट मन बदललेले नसतेच. (4) ते सैतानाचे सेवक आहेत (वचन 15; योहान 8:44; 2 थेस्स 2:9; 1 तीम 4:1-2). (5) ते नीतिमत्तेचे सेवक होण्याचे सोंग धरितात, ढोंग करतात. (6) धार्मिकतेविषयी बोलतात, पण खरे पाहिले तर ते दुष्टाईचे सेवक आहेत (2 पेत्र 2:18-19, 2 पेत्राचा 2 अध्याय आणि यहूदाचे पत्र सर्व लबाड धार्मिक शिक्षकांविषयीचे आहे). त्यांच्या कामाच्या आधारे, परमेश्वर त्यांचा न्याय करील. (2 थेस्स 2:8; 2 पेत्र 2:3,9; यहूदा 13; मत्त 7:22-23). करिंथाचे काही विश्वासी अशा लोकांच्या गोष्टी ऐकीत होते, ते त्यांची आर्थिक मदत करीत होते, ते त्यांनी शिकविलेली असत्य शिकवण सहन करीत होते. आपण पौलाने दिलेली "धोक्याची सूचना" समजू शकत नाही काय? असे होऊ शकते काय, की लोकांनी सैतानाच्या सेवकांचे स्वागत करावे आणि त्यामुळे त्यांच्या जीवनाचे नुकसान होऊ नये? असे करणाऱ्यांच्या आतंरिक जीवनाविषयी शंका उद्‌भवणार नाही काय?

*__11:14__ शैतान स्वतःला सैतानाच्या रूपात कधीच प्रगट करत नाही. तो इतका चतुर व कावेबाज आहे की अपराध, दुष्टाई आणि वाईट दिसूच देत नाही. तो स्वतःला तेजस्वी, चमकणारा आणि बुद्धीने भरलेला व सुंदर असे दाखवितो. तो एका ईश्वराच्या रूपात येतो. 'परमेश्वराच्या वचनांचे नाकारणे' तो अशा काही आकर्षक रूपात मांडतो की ते ऐकणाऱ्यांना खरेच वाटते, बरोबर व सत्य वाटते. तो वाईट, चांगल्या स्वरूपात प्रगट करतो. तो संपूर्ण जगाची उलटापालट (वरखाली बदलणे) करू पाहतो. तो सत्य, चुकीच्या रूपात व खोटे सत्यरूपात प्रस्तुत करतो. अंधकाराला प्रकाशासारखे, आणि प्रकाशाला अंधकारासारखे सादर करतो. त्याला अनेकांचे साहाय्य उपलब्ध होते. त्याचे साहाय्य करण्यास अनेक लोक तयार व तत्पर असतात, जे लबाडांची मदत करतात, त्यांच्यासाठी परमेश्वर दंडाची घोषणा करतो - यश 5:20.नोट्स - 1 इति 21:1; मत्त 4:1; योहान 8:44.

*__11:16-21__ पौल कोठेही आपली प्रशंसा करीत नाही. त्याला ठाऊक होते की, परमेश्वराची दया व सामर्थ्यावाचून तो काहीही नव्हता - 12:11; 7:1-8; 3:8; 1 तीम 1:15.स्वतःची स्तुति करणे त्याला पसंत नव्हते. म्हणून तो मूर्खासारखा भासत होता. करिंथाच्या ख्रिस्ती लोकांखातर त्याला आपल्या प्रेषितपणाच्या रक्षणार्थ आपली बाजू मांडावी लागली. (12:19). असे तो तेव्हाच करू शकला जेव्हा त्याने त्यांना सांगितले की कशा प्रकारे परमेश्वराने त्याला हे सर्व करण्याकरता व दुःख सहन करण्याकरता समर्थ केले.

*__11:19-21__ त्यांना लाजविण्यासाठी तो त्यांची टिंगल करून असे म्हणतो. ते लोक, लबाड शिक्षकांचा अभिमान बाळगीत होते, म्हणून त्यांनी ख्रिस्तांच्या खऱ्या प्रेषिताचे म्हणणे काही अंशी एकणे व सहन करणे गरजचे होते . लबाड शिक्षकांविषयी आपण वचन 20 यात वाचतो.

केले.*, तुमचे शोषण केले, किंवा फसविले किंवा स्वतःला थोर केले, किंवा तुमच्या तोंडात हाणले (मारले) तरी ते सर्व काही तुम्ही सहन करिता. [21] असे म्हणतांना मला शरम वाटते, की असे करण्यात आम्ही फारच कमजोर होतो. पण जो कोणी कोणत्याही प्रकारे घमेंड.* करण्याची हिंमत करीत असेल, तर मी देखील त्याच बाबीसाठी अभिमान करू शकतो.
[22] *काय ते इब्री आहेत? मी देखील आहे. ते इस्त्राएली आहेत काय? मीही आहे. ते अब्राहामाच्या वंशाचे आहेत ? मी सुद्धा आहे.
[23] *ते ख्रिस्तांचे सेवक आहेत काय? मी वेडयासारखा बोलतो आहे, मी त्यांच्यापेक्षाही श्रेष्ठ आहे; अधिक श्रम करण्यांत.*, वारंवार कैदेत.* गेल्यामुळे, बेसुमार चाबकाचे फटके खाण्यामधे, वारंवार मरणाच्या.* दाढेत जोखीमांचा सामना करण्याद्वारे [24] *यहूद्यांच्या
हातून मी पांच वेळा एकुणचाळीस-एकुणचाळीस फटके खाल्ले, [25] माझ्यावर तीन वेळा छडया बरसल्या, एकदा दगडमार.* झाला, तीनदां जहाज फुटले.* होते, एक रात्र मी समुद्रात घालविली. [26] वारंवार प्रवासात नद्यांच्या जोखिमांत, लुटारुंच्या (डाकू) धोक्यांत, आपल्या जातबंधूंच्या जोखिमांमध्ये.*, अन्य जातींच्या बांधवांनी तयार केलेल्या धोकादायक परिस्थितींमधे, जंगलांतील संकटांमधे, समुद्रावरील संकटांत, खोटया व लबाड भावांनी आणलेल्या संकटांमधे; [27] कठोर श्रम करून न झोपता रात्री जागरणात.* व्यतित

---

*__11:20__ *"गुलाम केले"*- कदाचित याचा अर्थ असा होता की, ते लोक ख्रिस्ती विश्वासींना मोशेच्या पुस्तकांच्या आधीन आणण्याचा प्रयत्न करीत होते. (प्रेषि 15:1; गल 2:4शी तुलना) कोणत्याही चुकीच्या शिकवणीच्या प्रभावात येऊन तिच्या आधीन होणे, ही एक प्रकारची गुलामीच आहे.

*__11:21__ *"घमेंड"*- 1:12 चे नोट्स.

*__11:22__ आपल्याला या गोष्टीचे प्रमाण मिळते की तेथे खोटे यहूदी संदेष्टे देखील होते. ते ख्रिस्तांचे शिष्य होण्याचा दावा तर करीत होते पण त्याचबरोबर, अपराध-क्षमेसाठी मोशेच्या नियमांचे पालन करण्यावर भर देत होते. त्यांना या गोष्टीचा गर्व होता, की अब्राहाम त्यांचा मूळपुरूष होता. हे देखील की ते रूढिवादी समाजाचे लोक होते; त्यांना या गोष्टीचा गर्व होता की ते आपल्या मूळ भाषेत-इब्रीत वचन वाचू शकतात (प्रेषि 6:1चे नोट्स) पण पौल प्रति-उत्तर देऊन त्यांना पटवून देतो, असा दावा करतो की या सर्व बाबी त्याच्याठायी देखील होत्या (रोम 11:1; फिलि 3:5).

*__11:23-29__ ते दावा करीत होते की ते ख्रिस्तांचे सेवक आहेत (वचन 23). पौलाने त्याच्या या दाव्याला आधीच नकार दिला होता (वचन 13-15). तो या गोष्टीची पुनरावृत्ती करीत नाही. दुसऱ्या शिक्षकांच्या तुलनेत तो ख्रिस्तांचा सेवक असण्याचे अनेक प्रमाण दाखवितो. हे प्रमाण तीन प्रकारचे होते - (1) ख्रिस्तांसाठी त्याने घेतलेले श्रम (वचन 23,26,27) (2) ख्रिस्तांसाठी त्याने सोसलेली दुःखें व कष्ट (वचन 23-27) (3) आणि ख्रिस्ती विश्वासींची त्याने केलेली देखरेख - सांभाळ

*__11:23__ *"अधिक श्रम करण्यांत"*- रोम 15:19; 1 करिं 4:12; कल 1:29.पौल या गोष्टींना आपल्या यादीत प्रथम स्थान देतो. त्याला ठाऊक होते की खऱ्या ख्रिस्ती सेवकाचे प्रमाण त्याच्या बोलण्यात नव्हे तर कृतीत आहे. एखादा मनुष्य, ख्रिस्तांवर किती प्रेम करतो त्याचे प्रमाण हे आहे की तो ख्रिस्तांसाठी किती श्रम व कष्ट करावयास तयार/ सज्ज आहे.

* *"वारंवार कैदेत"*- असे मानले (विश्वास केला) जाते की पौल जवळजवळ सातदा कैदेत डांबला गेला होता.

* *"मरणाच्या"*- 1:8-9; 2:11-12.

*__11:24__ यहूदी कायद्यान्वये 40 पेक्षा अधिक चाबकाचे फटके देण्याची मनाई होती. अनु 25:1-3.सामान्यतः यहूदी 39 कोडे मारीत असत - कारण त्यांना ही भीति असायची की 40 ऐवजी 41 फटके देण्याची मनाई होती. अनु 25:1-3.सामान्यतः यहूदी 39 कोडे मारीत होते - कारण त्यांना ही भीति असायची की 40 ऐवजी 41 फटके चुकून झाले तर मारणाऱ्याही शिक्षा होईल, व कायद्याचे उल्लंघन सुद्धा. म्हणून ते 39 वेळाच चाबकाचे फटके हाणित होते. "चाबकाचे फटके देणे" ही एक गंभीर बाब होती आणि कधी-कधी तर लोक त्यामुळे मरूनही जात असत. ख्रिस्तांसाठी एखाद्या मनुष्याचे प्रेम, असे मापले जात असे,की तो ख्रिस्तांसाठी किती दुःख सोसावयास तयार आहे.

*__11:25__ *"दगडमार"*- प्रेषि 14:19-20.

* *"जहाज फुटले"*- (प्रेषि 27:27-44) यात एकाचे वर्णन आहे. यांपैकी कितीतरी दुःखे जी पौलाने सहन केली, ज्या जोखीमांचा सामना केला, त्यांचे वर्णन बायबलमध्ये नाही.

*__11:26__ *"जोखिमांमध्ये"*- ख्रिस्तांसाठी एक मनुष्य काय-काय सहन करावयास तयार आहे, यावरून त्याचे ख्रिस्तांवरील प्रेम मापले जाऊ शकते. करिंथातील खोटे शिक्षक फुशारक्या मारू शकत होते, फुगू शकत होते, गर्व बाळगू शकत होते, पण त्यांनी काय-काय सहन केले होते? ख्रिस्तांसाठी ते कोणकोणत्या जोखीमा झेलावयास तयार होते? मरणाचा सामना करण्याची कितींची तयारी होती?

*__11:27__ *"न...जागरणात"*- बहुधा त्याच्याजवळ रात्रीच्या समयी झोपण्यास योग्य जागा नसे. तसेच अनेक चिंता व काळजींचे ओझे व दडपण, त्याला झोपू देत नव्हते.

करण्यात , तहानभूक सहन करण्यात, थंडीत वस्त्रांवांचून* राहण्यात, [28] शिवाय प्रत्येक दिवशी सर्व चर्चविषयींचा* (ख्रिस्ती विश्वासींचा गट किंवा चर्च) विचार व काळजीचे ओझे माझ्या अंतःकरणात भरलेले असतेच. [29] कोणाच्या दुर्बलतेने* मी कमजोर होत नसतो? कोणाच्या अडखळण्याने माझे अंतःकरण तुटत* (दुःखी) नाही?

[30] मग जर अभिमान करावयाचाच आहे, तर मी त्याच गोष्टींविषयी अभिमान बाळगीन ज्या माझी दुर्बलता* दर्शवितात. [31] *प्रभू येशूंचा पिता व परमेश्वर जो सर्वदा स्तुति आणि सन्मानयोग्य आहे त्याला ठाऊक आहे की मी खोटे बोलत नाहीये. [32] *मला धरण्यासाठी दिमिष्कातील अरीतास राजाच्या आधीन नेमलेल्या गव्हर्नरने शहराच्या फाटकांवर चौकीदारांचा पहारा ठेवला होता,
[33] पण मला दोरांच्या टोपलीत बसवून, एका खिडकीतून खाली सोडण्यात (उतरविले) आले. अशा प्रकारे मी त्यांच्या हातांतून निसटून वांचलो.

# 12

[1] *जरी अभिमान करणे ही चांगली गोष्ट नाहीये, पण काही गोष्टींविषयी अभिमान नक्कीच केला (आवश्यक) जावा. हेच कारण आहे की मी प्रभूद्वारे दिलेले दर्शन (दृष्टांत) आणि प्रकाशने यांच्याविषयी सांगणार. [2] *ख्रिस्तांठायी असलेला एक मनुष्य मला ठाऊक आहे

---

* *"तहानभूक...वस्त्रांवाचून"*- रोम 8:28,35-37.पौल अनुभवांविषयी बोलत होता. जे क्लेश त्याने भोगिले, त्यांच्याद्वारे, त्याने आपले प्रेषितपण सिद्ध करून दाखविले; तो आपले जीवन अधिक सुरक्षित व आरामदायक करू शकत नव्हता काय? होय, कां नाही, जर त्याने लोकांना व मंडळयांना आर्थिक साहाय्य मागितले, असते, तर त्याने उत्तम ठिकाणी, उंची हॉटेलात, उत्कृष्ट भोजनाचा आस्वाद घेतला असता. जेथे जाणे सोपे व सहज होते, तेथेच पौल गेला असता आणि जेथे आधीपासूनच सर्व प्रयोजन, प्रबंध केलेला असतां तर त्याला अवश्य विश्रांति मिळाली असती. पण पौल या सर्व गोष्टीत रमतच नव्हता, त्यांत त्याला रसच नव्हता (प्रेषि 20:24). जेथे कोणताही प्रबंध नव्हता, जेथे जाणे अवघड/ धोक्याचे होते, तेथे जाऊन तेथील लोकांपर्यंत पोचण्याच्या प्रयत्नात तो सतत असे. ख्रिस्तांसाठी दुःख सहन करणे, ही त्याच्यासाठी वाईट किंवा लज्जेची गोष्ट नव्हती, तो तर त्याच्यासाठी एक आशीर्वाद होता व सुवर्णसंधीच होती. 4:17; रोम 8:17; फिलि 1:29; 3:10; कल 1:24.

* **11:28** *"सर्व चर्चविषयींचा"*- केवळ करिंथाचे चर्च नाही परतु असेही ख्रिस्ती विश्वासीं गट, जे पौल्लाने तयार केले होते त्यांसह. कल 2:1 सर्व चर्चेस ख्रिस्त व पृथ्वीवरील ख्रिस्त व पृथ्वीवरील ख्रिस्ती सन्मानाशी जुळलेल्या होत्या, म्हणून मनाने पौल देखील त्या सर्वांशी जुळला.

* **11:29** *"दुर्बलतेने"*- रोम 14:1; 15:1; 1 करिं 9:22.

* *"तुटत"*- जेव्हा लोकांनी विश्वासींना ठेच लावली, त्यांना अटकाव करण्याचा प्रयत्न करून दुःखी केले, तेव्हा पौलाने स्वपिडेचा अनुभव केला, त्याला भयंकर दुःख झाले - रोम 12:15; गल 6:2 यांत त्याने आपले शब्द पूर्ण केले. विश्वासींनीं जे काही अनुभविले, त्याचा आभास व दुःख पौललाही झाले. हे खरे आहे, की असे करण्याची क्षमता व शिकवण ख्रिस्तांनी दिली व त्याला त्या योग्यतेचे केले.

* **11:30** *"दुर्बलता"*- 12:5,9,10.

* **11:31** पौलाने झेललेली संकटें व समस्या यांवर करिंथाच्या काही लोकांचा विश्वास नव्हता म्हणून पौल त्यांना गांभिर्याने परमेश्वराच्या नांवाने असे आश्वासन देतो आणि म्हणतो, की तो खोटे बोलत नाही, या सर्व गोष्टी सत्य (खऱ्या) आहे.

* **11:32-33** प्रेषि 9:22-25.हे एक असे उदाहरण आहे जेथे तो आपल्या दुर्बलतेकरता गर्व बाळगतो. त्याची इच्छा होती की लोकांना कळावे की तो स्वतःच्या बळावर गर्व करीत नाही, पण प्रभू येशू ख्रिस्तांवर ज्यांनी त्याला योग्यता दिली की त्याने सर्व काही सहन करावे ( 3:5; 4:7).

* **12:1** पल्या 'दुर्बलतेविषयी' गर्व करणे, ही पौलासाठी मोठी गोष्ट नव्हती. पण त्याच्याजवळ आणखी दुसरा पर्याय नव्हताच - वचन 11,19; असाच विचार आपल्या दर्शनाविषयी आणि प्रकटीकरणाविषयी तो करतो. परंतु जर करिंथातील खोटे शिक्षक आपल्या दर्शनांविषयी आणि प्रकाशनांविषयी गर्व करीत होते तर ते केवळ तेथील ख्रिस्ती लोकांसाठीच. उत्प 15:1; गण 12:6.

* **12:2-5** पौल हे सर्व काही स्वतःविषयी बोलतो आहे काय? होय, पाहा वचन 7. तो सरळ प्रत्यक्षपणे आपल्याविषयी न बोलता, एका 'मनुष्या'विषयी का बोलतो आहे? कदाचित त्याला त्याच्या दुर्बलतेविषयी काही देणे-घेणे नाही, तो तर केवळ त्याविषयीचाच गर्व करू इच्छितो. म्हणूनच कदाचित त्याच्याबरोबर एक विचित्र घटना घडली, जी त्याला समजली नव्हती की ते सर्व काय होत आहे, त्या वेळी तो केवळ 'एक दर्शक मात्रच' झाला होता.

(त्याच्याविषयी मी जाणतो), ज्याला चौदा वर्षांपूर्वी तिसऱ्या स्वर्गापर्यंत उचलून नेले, असे सदेह (देहासह) झाले होते किंवा देहावांचून हे मला ठाऊक नाही,ते परमेश्वरालाच ठाऊक आहे (तोच जाणतो).
3 आणि हा मनुष्य देहासह किंवा देहावांचून होता हे ठाऊक नाही, हे परमेश्वरालाच ठाऊक आहे.
4 त्याला स्वर्गात* उचलून नेण्यात आले आणि तेथे त्याने अशा गोष्टी ऐकल्या, ज्या अवर्णनीय व अनाकलनीय तर नक्कीच (कल्पनाशक्तिच्या पलीकडील) आहेत, शिवाय त्यांच्याविषयी सांगणेही बरोबर नाहीये.
5 अशा मनुष्याविषयी मी अभिमान तर बाळगीनच, पण जर प्रश्न स्वतःचा आहे तर मी आपल्या दुर्बलतेचा अभिमान बाळगीन, आणखी इतर कोणत्याही गोष्टीविषयी फुगणार नाहीये.
6 *आणि समजा, जरी मी गर्व केलाच तरी मूर्ख ठरणार नाही, कारण खरे तेच बोलेन. तरी आता मी पूरे करितो, कारण एखादा जसा मला पाहातो किंवा माझ्याकडून ऐकतो, त्यांहून श्रेष्ठ मला कोणी समजता कामा नये.

7 *परमेश्वराने मला अनन्यसाधारण प्रकाशनें दिलीत. त्यामुळे मी गर्वाने फुगून जाऊन गर्विष्ठ होऊ नये, म्हणून माझ्या शरीरांत एक काटा* टोचला गेला. सैतानाचा एक दूत मला पीडा देत होता, यासाठी की मी अहंकारी होऊ नये.
8 *मी तीन वेगळया समयी* प्रभूपुढे कळकळीची विनंती करून म्हटले, “प्रभू माझ्यापासून हे दूर कर”.
9 *परंतु प्रभू येशू म्हणाले, “माझा अनुग्रह (कृपा) तुझ्यासाठी पुरेसा आहे, कारण* माझे सामर्थ्य दुर्बलतेतच अचूकपणे पूर्णत्वास येते व भक्कम कार्यशील होते.'' म्हणूनच मी प्रचंड

---

***12:4** *“स्वर्गात”*- हाच तिसरा स्वर्ग होय (वचन 2) काही यहूदी शिकवीत होते की, एकूण सात स्वर्ग आहे. परमेश्वराचे वचन ‘बायबले यात, मात्र असे काहीही शिकविले गेलेले नाही. “तिसरा स्वर्ग” म्हणजे पौलाला म्हणावयाचे होते की, “सर्वोच्च स्वर्ग, आतंरिक स्वर्ग, परमेश्वराचे निवासस्थान, स्वर्गलोक”. नवीन करारात “स्वर्गलोक”-हा शब्द तीनदा आलेला आहे, येथे, लूक 23:43आणि प्रकटी 10:3-4शी तुलना.

***12:6** पौलाची इच्छा होती की, जे काही करिंथवासी ऐकत होते, पाहात होते, त्याच्या आधारे त्यांनी त्याच्याविषयी आणि त्याच्या प्रेषितपणाविषयी आपली मते मांडावी; त्याच्या आतंरिक अनुभवांच्या आधारे नव्हे ज्यांची पुष्टी केली जाऊ शकत नव्हती.

***12:7** यावरून कळते वचन 2-5 यात, तो आपल्या स्वतःविषयी बोलतो आहे, लोक गर्विष्ठ झाले होते, ते भ्रमात पडले होते, त्यांना वाटत होते की, पौलाने जे दर्शन पाहिले, त्याला जे प्रकटीकरण प्राप्त झाले, त्याच्या तुलनेत त्यांचे स्वतःचे दर्शन व प्रकटीकरण फारच कमी होते. जे काही परमेश्वराने पौलाला दाखविले होते, त्यामुळे त्याचे गर्विष्ठ होणे स्वाभाविक होते. परमेश्वराजवळ एखाद्या प्रेषिताला किंवा एखाद्या मनुष्याला गर्वापासून वाचविण्याचा एक मार्ग होता. पौलाचा “काटा” काय होता? आम्हाला जितके सांगितले गेले तितकेच ठाऊक आहे - भाषा कठीण आहे - वेगवेगळे मत असे आहे : (1) काही म्हणतात की, ‘शरीर’ म्हणजे देह असू शकते आणि ‘काटा’ म्हणजे एखादा आजार किंवा शारीरिक समस्या असावी. (2) काही लोक म्हणतात की, “शरीर” म्हणजे अपराधी स्वभाव असू शकतो, ज्याच्याविषयी रोम 7:14-25 यात आहे. या ग्रीक शब्दाचा अर्थ पतित स्वभाव सुद्धा होऊ शकतो. रोम 7:5,18.जर असे आहे तर हे एक जोरदार प्रलोभन किंवा वाईट सल्ला होता जो त्याच्या मनात येत होता, ज्याने त्याला गर्व करण्यापासून थांबविले. (3) गणना (गण 33:35) यात ‘काटा’ शब्द त्या मनुष्यांसाठी उपयोगात आणला गेला जे इस्त्राएली लोकांना पीडा देणार होते. येथे ग्रीक शब्द “संदेशवाहक” दुसऱ्या ठिकाणी “देवदूत” म्हटले गेले आहे. हा कदाचित सैतानाद्वारे (दुष्टात्मा) आणला गेला होता. ज्याने त्याचा विरोध केला होता, त्याच्या दुर्बलतेच्या परिसीमेत त्याच्या समक्ष परीक्षा आणली होती.

* *“काटा”*- यामुळे त्याला खूप “त्रास” झाला होता. शारीरिक, मानसिक किंवा आतंरिक किंवा तिन्ही, हे स्पष्ट नाही. पौलाच्या अनुभवाची तुलना ईयोब 1:6—3:26शी.

***12:8** हे इतके भक्कम होते की, ते त्याच्यापासून काढून घेतले जावे, अशी त्याने याचना केली.

* *“तीन...समयी”*- मत्त 26:44; योहान 13:38; 21:17; प्रेषि 10:16.पाहा की, ज्या प्रकारे त्याची इच्छा होती, त्या प्रकारे त्याला त्याच्या प्रार्थनेचे उत्तर मिळाले नाही.

***12:9** परमेश्वराने त्याला एक प्रतिज्ञा व अभिवचन दिले; हे देखील सांगितले की जर तो ख्रिस्तांठायी बलवान होऊ इच्छितो, तर आपल्या स्वतःठायी त्याला दुर्बल होणे गरजेचे होते, त्याला स्वतःची दुर्बलता जाणून घेणे गरजेचे होते, त्याला स्वतःची दुर्बलता जाणून घेणे आवश्यक होते. प्रतिज्ञा अशी होती की, ख्रिस्त त्याला ते दुःख सहन करावयास मदत करतील आणि त्याचा आतंरिक लाभ त्याला प्राप्त करून द्यावयास साहाय्य करीतिल. परमेश्वर कधीही, कोणतेही दुःख, धोका, ओझे, आमच्या मार्गात स्वर्गीक सामर्थ्यावाचून येऊ देणार नाहीत, ते सामर्थ्य देतील आणि आपण सामना करू शकू. प्रत्येक युगात, प्रत्येक परिस्थितीत आपल्याला त्यांचे सामर्थ्य मिळेलच.

* *“कारण”*- शारीरिक दुर्बलतेत प्रभू येशूंचे सामर्थ्य मदतगार सिद्ध होते, हे पौलाने शिकून घेतले. कारण की त्याची अशी इच्छा होती की केवळ ख्रिस्तांचे सामर्थ्य त्याच्यावर प्रबळ राहावे (फिलि 3:10). जी प्रत्येक गोष्ट त्याला काहीतरी उत्तम शिकविणार होती, ती

आनंदाने आपल्या अशक्तपणाच्या बाबींवर गर्व करेन, यासाठी की ख्रिस्तांची ताकद माझ्यामधे कायम रहावी. 10 यास्तव मी
ख्रिस्तांसाठी * बहुत आनंदाने * आपल्या दुर्बलतेत, निंदेंत, गरीबीत, छळांत आणि संकटांतही संतुष्ट आहे, कारण जेव्हा कधी मी
कमजोर वा अशक्त असतो, तेव्हाच मी बलवान वा सशक्त होतो.
11 मी मूर्ख * बनलो खरा, पण तुम्हीच मला असे करावयास भाग पाडले. तुम्ही माझी प्रशंसा करावयास हवी होती *. 12 *कारण जरी
मी काहीही नाहीये, तरीही एका प्रेषिताची प्रमाण-चिन्हें, अद्‌भुत कृत्यें * आणि सामर्थ्याची कामें * तुमच्यामध्ये करून दाखविण्यात
आली होती. 13 *कोणत्या बाबतीत तुम्ही दुसऱ्या चर्चपेक्षा कमी ठरलात? केवळ याच गोष्टीत की मी तुमच्यावर 'ओझे' झालो नाही?
या चूक (दोष) गोष्टीकरिता मला क्षमा करा.
14 *तिसऱ्यांदा मी तुमच्याकडे येण्याच्या बेतात आहे. पण मी तुमच्यावर भार टाकणार (होणार) नाही; कारण मला तुमचे धन
किंवा तुमचे काहीही नकोय, मला तुम्हीच हवे आहा, माझी हीच इच्छा आहे की तुम्हीच माझे व्हावे. मुलांना आईबापांसाठी बचत
करावी लागत नाही, याउलट आईबाप मुलांकरिता धनसंग्रह (बचत) करितात. 15 आता मी हसत-हसत आनंदाने तुमच्यासाठी खर्च
करीन आणि स्वतःही खर्च होऊन जाईन. तर मग जर मी तुमच्यावर असीम प्रेम करितो, तर माझ्याकरिता तुमचे प्रेम कमी (उणे)

---

सहन करावयास पौल तयार होता.

***12:10** *"ख्रिस्तांसाठी"*- या शब्दांकडे लक्ष द्या - त्याचे संपूर्ण जीवन आणि सेवा ख्रिस्तांसाठीच होती; त्याच्या स्वतःसाठी नाही. म्हणून त्याने सर्व काही ख्रिस्तांसाठी सहन केले.

* *"आनंदाने"*- बरेच ख्रिस्ती असा विचार करतात की कुरकुर करून, कशा प्रकारे तरी, दुर्बलता, निंदा व कठीण परिस्थिती आणि छळ सहन करणे पुरेसे आहे. पण जेव्हा एक मनुष्य नीट समजून घेतो की या सर्व विपरित व प्रतिकूल परिस्थितीत त्याचाच आतंरिक फायदा आहे, तेव्हा तो पौलासारखा त्या सर्व प्रसंगात आनंदी असू शकतो. परमेश्वराच्या ज्ञानाच्या मार्गांच्या प्रकाशात, पीडा, क्लेश, बदनामी, छळ व समस्या आनंद उत्पन्न करू शकतो. (तुलना मत्त 5:11-12; प्रेषि 5:40-41; 16:22-25; 1 पेत्र 5:12-14). येथे पौल आतंरिक मनोबळाविषयी बोलतो आहे. हे आतंरिक मनोबळ त्याला ख्रिस्तायोग्य सेवक करते. पौल आपल्या अशक्तपणात, सबळ कसा व्हायचा, त्याचे रहस्य हे आहे : त्याने जेव्हा-जेव्हा आपली दुर्बलता अनुभविली तेव्हा-तेव्हा त्याने आपल्या स्वतःवर, आपल्या बळावर, आपल्या बुद्धीवर, आपल्या योग्यतेवर भरवंसा ठेविला नाही, केवळ परमेश्वरावर संपूर्ण विश्वास ठेवला. 1:8-9; 1 करिं 2:1-5.जर मनुष्याला परमेश्वराचे सामर्थ्य हवे असेल तर त्याला स्वतःवरचा भरंवसा बाजूला करून परमेश्वरावर विश्वास ठेवावयाचा आहे. यश 40:28-31शी तुलना - हे मानवीय विचारांच्या उलट आहे.

***12:11** *"मूर्ख"*- 11:1,16,21.

* *"तुम्ही ...होती"*- 3:5; 1 करिं 3:7; इफि 3:8.

***12:12** आध्यात्मिक सत्य शिकविण्यासाठी परमेश्वराने ख्रिस्त आणि त्याच्या प्रेषितांद्वारे चिन्ह दिले (योहान 2:11).

* *"अद्‌भुत कृत्यें"*- अशी कार्ये ज्यांच्याद्वारे आश्चर्य निर्माण होते, विस्मय उत्पन्न होते (मत्त 12:22-23; 15:31; प्रेषि 2:12; 3:10)

* *"सामर्थ्याची कामें"*- अशी कार्ये जी अलौकिक सामर्थ्याने केली जातात. ही प्रेषितणाची चिन्हें होती. त्यावरून आपण ओळखू शकत होतो की, प्रेषित निवडलेले व देवाने पाठविलेले लोक होते, हे सुद्धा की ते परमेश्वराचे सत्य शिकवीत होते. (प्रेषि 5:12; 14:3; इब्री 2:4). एखादा मनुष्य परमेश्वराद्वारे निवडला गेला आहे आणि पाठविला गेला आहे याची पुष्टी अद्‌भुत कृत्यांनी, सामर्थ्याच्या कृत्यांनी केली जात नाही (केली जाऊ नये). परंतु एका प्रेषिताची प्रमाण-चिन्हें, "त्याचा संदेश, विश्वास आणि जीवन परमेश्वराच्या वचनानुसार आहे की नाही", यावरून केली जावी असे जर नसेल तर त्यांची अद्‌भुत कृत्यें शंकेच्या दृष्टीने पाहिली जावीत अशा लोकांनी धन-संपत्ती त्यागून, पौलासारखे जीवन जगावे. त्यांनी पौलासारखी दुःखे सहन करण्याचे धैर्य दाखवावे, जसे पौलाने या पत्रात प्रगट केले तसे शिकवावे, तेव्हा आम्ही त्यांचे ऐकण्याची इच्छा अवश्य बाळगूं.

***12:13** हा 11:7-12; 1 करिं 9:12-18."क्षमा करावी" या शब्दांद्वारे असे वाटते की जे विवेकहीन होते त्यावर व्यंग करून पौल त्यांना असे म्हणाला, कारण त्याला ठाऊक होते की त्यांच्याकडून आर्थिक साहाय्य न घेऊन त्याने काहीही चूकीचे कृत्ये केलेले नव्हते. (7:2).

***12:14-15** त्या चर्चच्या आर्थिक साहाय्यापेक्षा पौलासाठी त्यांचे प्रेम व सहभागिता ही अधिक महत्वाची व मोलाची होती, कारण त्याला त्यांचे पैसे नको पण ते स्वतःच हवे होते. 6:11-13.तो चर्चचा पिता होता, ती त्याची बाळकें होती (1 करिं 4:15). एका पित्याची मुलांप्रत काय जवाबदारी असते, हे त्याला ठाऊक होते, म्हणून तो त्याच्यासाठी आपले सर्वस्व खर्च करण्याकरता तयार होता, मग त्याचा वेळ असो वा सामर्थ्य आणि क्षमता (7:3). हीच वृत्ती, प्रत्येक ख्रिस्ती सेवकात, परमेश्वराला हवी आहे. चर्चकडून, लोकांकडून काय मिळेल याची नव्हे, तर ते सेवक म्हणून चर्चला व विश्वासींना काय देऊ शकतील, याचा त्यांनी विचार करावा, याची त्यांना चिंता असावी.

राहील काय? [16] *तुमच्यातील काही असे मानतात की मी तुमच्यावर ओझे झालो नाही, तरीही काहींचा विचार आहे की मी
चलाखीने धूर्त होऊन तुमचाकडून फायदा उचलला. [17] पहा, ज्या लोकांना मी तुमच्याकडे पाठविले होते, त्यांच्याद्वारे मी
तुमच्याकडून काही फायदा मिळवून घेतला? [18] मी तीताला राजी करून जबरदस्तीने एका दुसऱ्या भावासह पाठविले होते. तुम्हांला
लाभाचे 'निशाण' करून तीताने तुमचा गैरफायदा घेण्याचे लक्ष्य साधले होते काय? त्याच्यासारखीच पावलें आमचीही नव्हती
काय? आमचाही व्यवहार त्याच्यासारखाच नव्हता काय?
[19] *स्वतःचा बचाव करण्याकरिता आम्ही हा युक्तीवाद करीत आहोत की काय असा कदाचित तुमचा समज होऊ शकेल,परंतु जे
काही मी बोलतो आहे ते सर्व परमेश्वरास उपस्थित जाणून (पूर्ण जाणीवेने) ख्रिस्तांठायी बोलतो आहे. प्रिय जनहो, माझ्या बंधूंनो जे
आम्ही करितो ते सर्व तुमच्या उन्नतिसाठीच करितो आहे [20] *जसे मला हवे आहे, तसे मी आल्यावर कदाचित तुम्ही मला दिसणार
नाही अशी भीति माझ्या मनांत आहे, आणि तुम्ही देखील माझ्याकडून जशी अपेक्षा व आशा करिता तसा मी असणार नाही.
कदाचित तुमच्यामध्ये मला भांडणतंटे, क्रोध, विरोध, ईर्षा, चहाडचा, गर्व आणि घोटाळा आढळतील. [21] असे पुष्कळ लोक ज्यांनी
त्यांची आधीची अशुद्ध व अनैतिक कृत्यें अजूनही त्यागलेली नाहीत, अशांसाठी मी पुन्हा आल्यावर असे कधीही घडू नये, की
माझ्या परमेश्वराने मला इतके लाचार व दीन करावे की मी त्यांचासाठी दुःखी व्हावे.

# 13

[1] *मी तिसऱ्यांदा तुमच्याकडे येण्याचा विचार करतोय. दोन अथवा तीन साक्षीदारांच्या मुखाने प्रत्येक गोष्टीची पुष्टि केली जावी.
[2] मागच्या वेळी जेव्हा मी आलो होतो, तेव्हा ही गोष्ट तुम्हांला सांगितली होती.आताही तुमच्यामध्ये मी गैरहजर आहे तरी ज्यांनी
पूर्वी अपराध केले होते, त्यांना आणि दुसऱ्या सर्व लोकांना मी पूर्वसूचना देऊन बजावितो की जर मी पुन्हा आलो, तर त्यांना
सोडणार (चांगलीच खबर घेणार) नाही *. [3] कारण तुम्हांला तर याचे प्रमाण पाहिजे * की येशू ख्रिस्त माझ्याद्वारे बोलतात. तुम्हांला

---

*__12:16-18__ काही लोक पौलाविषयी असे बोलत होते असे वाटते : "पौलाने चर्चकडून आर्थिक साहाय्य घेतले नाही, हे जरी खरे होते तरी, यरूशलेमेच्या ख्रिस्ती लोकांसाठी दान गोळा करण्याचा पौलाचा हेतू असा होता की त्यालाही त्या दानावर हात मारता यावा आणि स्वतःसाठी त्याचा उपयोग करता यावा. या कार्यात तीत आणि दुसरा एक भाऊ देखील एजेंटचे कार्य करीत होता." यावर पौलाने त्यांना विनंती केली की - त्याच्याकडे काही प्रमाण होते काय की त्यांनी हे खोटे विधान, ही चिखलफेक सत्य होती, हे सिद्ध करावे? या सर्व कारणामुळेच दान गोळा करतांना पौल काळजीपूर्वक आणि बुद्धिमानीने वागत असे जेणेकरून कोणीही त्याच्यावर खोटा आरोप लावू नये, शंकेने त्याच्याकडे पाहू नये. (8:16-21; 1 करिं 16:1-4).

*__12:19__ येथे आपण पौलाच्या अभिमानाचे कारण पाहतो; या पत्रात त्याने कशा प्रकारे आपल्या प्रेषितपणाचा बचाव पक्ष मांडला ते पाहतो. त्यांनी त्याच्याविषयी गैरसमज करू नये. तो त्याच्यासमोर आपली बाजू अशी मांडत नव्हता जणू काही तो न्यायाधीशांच्या चर्चपुढेच उभा आहे (1 करिं 4:1-5). त्याचा 'अभिमान' त्याचा 'प्रतिवाद' 'त्याचे कार्य' हे त्याच्या स्वतःसाठी नाही पण त्याच्याच उन्नतीसाठीचे आहे, हेच त्याला त्यांना सांगावयाचे होते (1:12). कारण त्यांचे आतंरिक जीवन खालील गोष्टींमुळे बळावले असते, मजबूत झाले असते : 'तो जे काही आहे', त्यानुसार त्याला स्वीकारावे अर्थात 'ख्रिस्तांचा प्रेषित' - जे काही त्याने शिकविले, त्या सत्याचे अनुकरण त्यांनी करावयाचे होते. जर त्यांनी हे सर्व केले तर त्यांचेच कल्याण व हित साधणार होते.

*__12:20-21__ पौलाला ठाऊक होते की ती चर्च काही बाबतीत कमजोर होती, चर्च गुटबाजी करण्यात आणि यौनसंबंधी अपराध करण्यात मग्न होती (भरलेली होती). (1 करिं 1:11-12; 3:3; 4:18; 5:2,11; 6:15-16; 8:1; 11:18,22). पौलाला हेच भय खात होते की जर, त्याने शिकविलेले सत्य चर्चने अस्वीकार केले, त्याला नाकारले, तर तिची दशा आणखी वाईट होईल. तसे असतांना जर त्याने त्या चर्चची भेट घेतली तर त्याला मोठी पीडा होईल.

*__13:1__ अनु 19:15.कदाचित पौलाचा अर्थ असा होता की जे काही ते होते, जसा काही तो होता, ते आता स्पष्ट-स्पष्ट ठळकपणे प्रगट झालेले होते. 10 इतर प्रमाण देण्याची किंवा वेळ व्यर्थ घालविण्याची आता काहीच आवश्यकता नव्हती.

*__13:2__ *"त्यांना ...नाही"*- 1 करिं 4:18-21; 5:3-5.त्याचा इशारा असा होता की यावेळी तो शांत व स्वस्थ बसणार नव्हता, पण अपराध करणाऱ्यांना आणि पूर्वसूचना देऊन बजावल्यानंतरही सुधारणा न करणाऱ्यांना तो सोडणार नव्हता आणि ख्रिस्तांचा प्रेषित या नात्याने तो आपल्या अधिकारांचा उपयोग करून, अपराधी लोकांना दंड देणार होता.

*__13:3-4__ *"तुम्हांला...पाहिजे"*- या पत्रात तो आपल्या प्रेषितपणाचा पक्ष मांडतो. जर दीनता व नम्रतेऐवजी त्यांना अधिकार व सामर्थ्याचे प्रदर्शन हवे होते, तर तो ते देण्यासाठी तयार होता 10:1.पौलाची दुर्बलता पाहून ते अस्वस्थ झाले होते (10:10; 1 करिं

हाताळण्यासाठी, तुमची खबर घेण्यासाठी ते (येशूं) शक्तिहीन कमजोर नाहीत, तर सामर्थी आहेत. [4] क्रूसावर खिळले जात असताना
जरी ते सामर्थ्यहीन दिसत होते, तरी परमेश्वराच्या सामर्थ्याने ते जिवंत आहेत. आम्हीही त्यांच्यामध्ये कमजोर आहोत, पण आम्ही
परमेश्वराच्या शक्तिने त्यांच्याबरोबर (येशूंच्या) जगू. आम्ही जिवंत राहू यासाठीच की आम्हांला तुमची सेवा करिता यावी.
[5] आपल्या स्वतःची पारख करा.* की विश्वासात आहात किंवा नाही. तुम्हांला ठाऊक नाहीये काय, की येशू ख्रिस्त तुमच्याठायी
आहेत? तसे नसल्यास, तुम्ही परीक्षेत अपयशी झाला आहा हे त्याचे प्रमाण आहे. [6] माझी आशा हीच आहे, की आम्ही अपयशी
झालो नाही हे तुम्हांला व्यवस्थितपणे कळावे व ते तुम्ही ओळखावे. [7] *आमची प्रार्थना हीच आहे की तुम्ही काहीही अयोग्य करू
नये यासाठी नाही की तुम्ही सिद्ध दिसावे, पण यासाठी की तुम्ही भलेपणाची व हितकार्ये करावीत, मग अपयशी दिसत (भासत)
असला तरीही. [8] कारण आम्ही सत्याविरूद्ध काहीच करू शकत नाही, केवळ सत्याच्या पक्षातच काही करू शकतो. [9] *जेव्हा
आम्ही कमजोर ठरतो, तुम्ही बलशाली असतां आणि तेव्हा आम्हांला आनंद मिळतो. आमची प्रार्थना हीच असते की तुम्ही पूर्ण
प्रकारे योग्य व्हावे.*. [10] *यामुळे आता मी तुमच्या गैरहजेरीत लिहीतो आहे, अशासाठीच की जेव्हा मी तुमच्याकडे येईन तेव्हा मला
माझा अधिकार वापरून, कठोर होऊन तुमच्याशी कडकपणाचा व्यवहार करावा लागू नये. परमेश्वराने तुम्हांला परिपक्व (तयार)
करण्यासाठी माझ्या सुपूर्द केलेले आहे, तुमचा विनाश करण्यासाठी नव्हे.
[11] शेवटी बंधूभगिनींनो आनंदी रहा, सिद्ध व्हा.*, हिंमत बाळगा, मेळाने एकमन व्हा आणि प्रेम व शांतीचा परमेश्वर.* तुमच्यासह

---

2:3). ते ख्रिस्तांच्या सामर्थ्याविषयीही साशंक होते. ख्रिस्त देखील त्यांना त्याच्यासारखेच दुर्बल व कमजोर भासत होत (ख्रिस्त सामर्थ्यहीन अवस्थेत क्रूसावर खिळले गेले होते). परंतु पौल त्याच्यामध्ये (चर्चत) ख्रिस्तांच्या पुनरूत्थानाच्या सामर्थ्यासह जिवंत होता. जर त्यांनी आपली चूक कबूल केली नाही तर, पौल तेच पुनरूत्थित सामर्थ्य त्याच्यासमक्ष प्रस्तुत/प्रगट करणार होता.

***13:5-6** *"स्वतःची...करा"*- ते पौलाला पारखू पाहात होते. त्यांना या गोष्टीचे प्रमाण हवे होते की ख्रिस्त त्याच्याद्वारे त्याच्याशी बोलतात (वचन 3). पौल म्हणतो की, जर त्यांनी स्वतःला पारखले तर बरे होईल! जर यात ते यशस्वी झालेत आणि त्यांना याविषयी पूर्ण खात्री आहे की ख्रिस्त त्याच्याठायी आहे तर, त्यांना कळावे की त्यांचा आतंरिक पिता - 1 करिं 4:15देखील पारखला गेल्यानंतर खरा ठरला होता. हे पारखले जाणे म्हणजे होते तरी काय? शिष्यांनी स्वतःला का पारखावे, कसे पारखावे? त्याचा हेतू हा असतो की, आपण पाहावे की, स्वतः आपण विश्वासात कायम आहे की नाही - म्हणजे परमेश्वराचे सत्य मान्य करून, जेव्हा आपण 'विश्वास' ठेवला होता, त्याच विश्वासात आजही आपण आहोत की नाही! विश्वासाने जीवन जगतो आहोत की नाही? आपण केवळ नावापुरते-नामधारी शिष्य तर नाही? आपण स्वतःला कसे पारखावे? अंतःकरणात डोकावून पाहून की, तेथे काय आहे? (जर आपण असे केले तर रोम 7:18,21सारखे काहीं प्राप्त करू) केवळ भावनिक रीतिने आपण आपली पारख करू नये, कारण आपल्या भावना वर-खाली होत असतात आणि त्या आपल्या आतंरिक जीवनाची खरी अवस्था दाखवू/सांगू शकत नाहीत. आपण आपल्या कृत्यांद्वारे आणि परमेश्वराच्या वचनाप्रत, आज्ञापालन किंवा आज्ञाभंगाच्या आधारे आपली पारख करावयास हवी. आपल्याला ठाऊक आहेच की झाडावरून फळाची पारख होत असते (मत्त 7:16-20; इब्री 6:9-10). जर आपल्याला ख्रिस्तांचा अनुभव नाही, आणि जर आपण त्याच्याप्रत आज्ञाधारक नाही, जर आपले जीवन व विचार बायबलविरूद्ध आहे, तर, आपण कसे म्हणू शकतो की आपण ख्रिस्तांचे आहोत? पण, याउलट, जर आपल्याला खात्री आहे की, ख्रिस्तांशी आपला काही अनुभव आहे, त्यांचे म्हणणे आपल्याला मान्य करावयाचे आहे (जरी कधी तरी आपले प्रयत्न अपयशी ठरू शकतो); तसेच अपराध क्षमेकरता जे काही करावयाचे आहे ते आपण केले आहे, तर मग, आपण असे म्हणू शकतो की ख्रिस्त आमच्या अंतःकरणात वास करतात - 1 योहान 5:9-13; 2:4; 3:10,14,24."विश्वास आहे की नाही"-हे ओळखून घेण्यासाठी, आपण ते सर्व काही करावे जे करण्याची नितांत गरज आहे - इब्री 6:11; 2 पेत्र 1:10. जर आपण यामध्ये 'पास' झालो नाहीत तरी निराश होण्याचे कारण नाही, आपल्याला संपूर्ण रीतिने अंतःकरण परिवर्तनाची गरज आहे. "येशू ख्रिस्त तुमच्याठायी आहे"- योहान 17:23; रोम 8:9-10; कल 1:27; प्रकटी 3:10.

***13:7-9** येथे पुन्हा त्यांना आपल्या विचारांत वसवितो. त्याची हार्दीक इच्छा हीच आहे की, त्यांनी परमेश्वराशी योग्य संबंध ठेवावेत, स्वतःवर त्यांना शंका असली तरी. त्यांनी पूर्ण प्रकारे परमेश्वरायोग्य व्हावे हीच त्याची मनीषा होती. जर ते परमेश्वराप्रत खरे व दृढतेने कायम राहिलेत तर तो त्याच्यासाठी पायदळी (पायाखाली) तुडविला जाण्यासाठीही तयार होता. प्रत्येक गोष्टीत तो सत्याकरताच जिवंत राहू इच्छित होता (1 करिं 9:23; 2 तीम 2:10).

***13:9** :12; 1 करिं 4:9-13.

**"योग्य व्हावे"*- 7:1; मत्त 5:48चे नोट्स. आपण स्वतःकरता व दुसऱ्यांकरता "पूर्ण आतंरिक समज" बाळगण्याचे लक्ष्य पुढे ठेवावे."

***13:10** वचन 2; 1 करिं 4:21.

***13:11** *"सिद्ध व्हा"*- वचन 9;7:1. पाहा मत्त 5:48.स्वतः प्रत व इतरांप्रत आपला हेतू आतंरिक परिपक्वता हाच असावा.

असेलच.
[12] पवित्र चुंबनाने * एकमेकांशी भेटा.
[13] सर्व पवित्र जन तुम्हांला सलाम सांगतात.
[14] *प्रभू * येशू ख्रिस्तांचा * अनुग्रह, परमेश्वराचे प्रेम आणि पवित्र आत्म्याची सहभागिता तुम्हां सर्वांसह कायम असो.

* *"प्रेम व शांतीचा परमेश्वर"*- इब्री 13:20; 1 योहान 4:8.

***13:12*** *"चुंबनाने"*- रोम 16:16.

***13:14*** वचन सत्याने परिपूर्ण आहे. येशू या वचनात आहे. ते प्रभू आणि ख्रिस्त दोन्हीही आहे प्रेषि 2:36.

* *"प्रभू"*- लूक 2:11; फिलि 2:10-11;

* *"ख्रिस्तांचा"*- मत्त 1:1चे नोट्स. दयेमुळे अपराधी वाचतात; विश्वासी आशीर्वाद प्राप्त करतात (8:9; योहान 1:14-17; गल 1:6). ख्रिस्त दयेचा उगम आहे, म्हणजेच, येशू परमेश्वर आहे. फिलि 2:6पाहा. या वचनात परमेश्वर पित्याविषयी देखील आहे. परमेश्वराने ख्रिस्त येशूंना पाठविले (योहान 3:16; रोम 5:8; 1 योहान 4:10). परमेश्वराच्या प्रेमाविषयी वचन 11 पाहा. हे वचन परमेश्वराचे प्रेम दर्शविते. परमेश्वराच्या प्रेमामुळे, ख्रिस्त आले व त्यांनी आपली द्या प्रगट केली. त्याच्या दयेमुळे परमेश्वराचे प्रेम, विश्वासींबरोबर कायम असते. येथे, या वचनात पवित्र आत्मा देखील आहे. योहान 14:16-17चे नोट्स. त्याचे व्यक्तीत्व येथे आहे. आपण व्यक्तीशी सहभागिता ठेवू शकतो, अचेतन प्रभाव किंवा सामर्थ्याशी नव्हे. पवित्र आत्म्याद्वारे, परमेश्वर विश्वासींठायी वसतात. त्याच्याद्वारे आपली सहभागिता पिता परमेश्वर आणि ख्रिस्त येशूंबरोबर आहे (1 योहान 1:3). या वचनात त्रिएकत्व आहे. "उद्धाराच्या कार्यात", "पवित्र केले जाण्यात" व "विश्वासींच्या आशीर्वादात", प्रत्येकाची आपली भूमिका व स्थान आहे - मत्त 3:16-17 यात त्रिएकत्वावरचे नोट्स.